**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**TARUN BHARAT**
**Mumbai**

**FEBRUARY 1992**

मुंबई तरुण भारत ■ मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी १९९२ ■



जळगाव येथील सगीरा शेखला तिच्या घरी डॉ भरत व स्मिता वतवानींनी आणल्यावरचे प्रकाशचित्र.

# मनोरुग्णांना संजीवनी

ज्या मनोरुग्णांना समाजाने झिडकारले त्यांना समाजात परत आणण्याचे आणि मानाचे स्थान मिळवून देण्याचे फार मोठे खडतर कार्य गेली जवळ जवळ ५ वर्ष वतवानी जोडपे करीत आहे. रस्त्यावर भटकणाऱ्या मनोरुग्णांना कुणाचाच आसरा नाही, खायला पोटभर अन्न नाही आणि उपचार करावयास डॉक्टर नाहीत अशांना एक सुंदर जीवन जगण्याचा अधिकार आहे, जेवढा इतर सर्वसामान्य जनतेला आहे. अशा व्यक्तींचा सर्वसामान्य जीवन जगणे हा मानवी अधिकारच आहे. या पाच वर्षांच्या काळात पाच हजारांपेक्षा जास्त मनोरुग्णांना बरे करण्याची किमया या डॉक्टर पती-पत्नीने साधली आहे.

अलकोहोल, ब्राऊन शुगर, मेंटली वीक, आत्महत्येचा प्रयत्न, वेड लागणे, आणि नोकरी न मिळणे अशा अनेक केसेस या डॉक्टर पती-पत्नीने यशस्वीपणे हाताळल्या आहेत. हे मनोरुग्ण मानसिक रोग असल्यामुळे रस्त्यावर येतात. बाकी त्यांना काहीच रोग नसतो. यात चांगल्या घरातील लोकांचा जास्त भरणा असतो. हा रोग कोणालाही होऊ शकतो.

हे दोघेही डॉक्टर पती-पत्नी मुंबई विद्यापीठाचे एम. डी. आहेत. स्मिताला सुवर्णपदक मिळाले आहे. भरत यांचे दोन्ही भाऊ डॉक्टरच आहेत. स्मिताचे वडील व एक भाऊ डॉक्टर आहे. १९८७ साली भरत यांनी पदवी घेऊन प्रॅक्टिस सुरू केली, तर स्मिता सुरूवातीला सायन व कूपर इस्पितळांत या विषयावर लेक्चर देत असे. एम. डी. करताना ही दोघे एकत्र होते. इथेच ते दोघे एकमेकाच्या प्रेमात पडले. पुढे मग ते विवाहबद्ध झाले. मुंबईत मनोरुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांची संख्या फार कमी आहे. नर्सिंग होमदेखील अवघी चार-पाचच आहेत. लोकांचा फकीर, महाराज, बुवा यावर जास्त विश्वास असतो. या दोघांनी स्वतः बोरिवलीला श्रद्धा नर्सिंग होम दोन वर्षांपूर्वी सुरू केले., तेथे कमीतकमी पैशात मनोरुग्णांना हे पती-पत्नी सेवा उपलब्ध करून देतात. मनोरुग्णांना कोणी वाली नाही. समाजात त्यांना झीडकारले जाते. त्यांना नवीन जीवन देण्याचा प्रयत्न या पती-पत्नींचा सुरू असतो. रोज त्यांच्याकडे सरासरी ३ ते ४ पेशंट येतात. रुग्णाला औषधे वर्ष दोन वर्ष द्यावी लागतात. सातत्याने औषध घेणे ते महत्वाचे असते.

मुंबई महाराष्ट्राशिवाय कडप्पा, बिहार आंध्र प्रदेश गुजराथ कलकत्ता आणि काश्मिर येथूनदेखील मनोरुग्ण वातवानी यांच्याकडे आले आहेत. या पती-पत्नींना कुठेही जाता-येता रस्त्यावर, प्लॅटफॉर्मवर गल्लीबोळांत अथवा हायवेर असे मनोरुग्ण दिसले तर ते त्यांना आपल्या नर्सिंग होममध्ये घेऊन येतात. योग्य उपचार करून त्यांचा घरचा पत्ता काढून त्यांना घरी पाठवून देतात. नोकरीच्या अमिशाने बरेच जण मुंबईत येतात. नोकरी मिळत नाही व जाताना गाडीही मिळत नाही, त्यामुळे ते चक्रात अडकतात व मनोरुग्ण होऊन बसतात. बोरिवली येथील प्लॅटफॉर्मवर विनोद गोयल या मनोरुग्णाला पती-पत्नीने बघितले त्यांनी त्याला धरून आपल्या नर्सिंग होममध्यें आणले. राजस्थानमधील विनोद चार वर्षांपासून या रोगाचा आहारी गेला होता.



उत्तर प्रदेशचा राजेंद्र शर्मा त्यांना रस्त्यावर सापडला. त्याच्यावर उपचार केल्यानंतरचे शर्माचे प्रकाशचित्र.

नोकरीच्या अमिशाने मुंबईत आला व मुंबईत बसला. तो बी. एस. सी झाला होता. या दोघांनी त्याला या आजारातून बरा केला. मग राजस्थानांत त्याच्या घरी संपर्क साधून त्याच्या भावाला बोलावून घेतले मग विनोदला घरी पाठवले दहिसर येथे रेणुका नावाची एक स्त्री त्यांना सापडली, ७ महिन्यांचा तिचा मुलगा गेल्यामुळे तिच्या डोक्यावर परिणाम झाला होता. ९ महिने ती घरातून बेपत्ता झाली होती. अखेर यवतमाळ येथील तिचा पत्ता शोधून तिला त्यांनी घरी पाठवले. हैद्राबाद येथील रेवलम्मा हिलादेखील त्यांनी बरे करुन परत हैद्राबादला पाठवले. त्यावेळी रेवम्माला बघायला गाव जमा झाले होते आणि घरच्यांचा आनंद तर काही औरच होता. अमरावतीचा हेमंत ठाकरे हा जे. जे. स्कूल आर्टसचा फाईन आर्टसमधील सुवर्णपदक विजेता विद्यार्थी नंतर त्याला

**सुहास जोशी**

तिथेच नोकरी मिळाली. पण मनोरुग्णाचा पेशंट झाल्यामुळे त्याला नोकरीतून कमी केले.

डॉक्टरांकडे ठाकरे यांचा मित्र होता त्यांनी डॉक्टरांच्या कानावर ही गोष्ट घातली त्याचा केसचा डॉक्टरांनी अभ्यास केला. गंमत म्हणजे ठाकरेला पूर्णपणे बरे करण्यांत डॉक्टरांना यश आले. विशेष म्हणजे त्याला परत कामावर घेण्यांत आले. आज ठाकरे डॉक्टरांच्या नर्सिंग होममध्ये राहून त्यांना मदतदेखील करतो. ठाकरेवर इलाज करावयांस जवळ जवळ आठ महिने लागले. शक्यतो तरुण पेशंट हे डॉक्टर पती-पत्नी घेतात. दारु पिणाऱ्या रुग्णांना ते घेत नाहीत. साधारण महिना-दोन महिन्यांत मनोरुग्ण बरा होतो. पोलीसांचे चांगले सहकार्य या दोघांनाही मिळते. बरे झालेले मनोरुग्ण व त्यांचे नातेवाईक यांचे मोलाचे सहकार्य डॉक्चरांना मिळते. मनोरुग्णांना बरे करणे यावर बराच खर्च होतो.

सुरुवातीचे दहा दिवस मनोरुग्णांची परीक्षाच असते. परंतु या दहा दिवसांत या डॉक्टर पती-पत्नींची जणू काही अग्नीपरीक्षाच असते: नर्सिंग होमच्या आजूबाजूचेदेखील लोक डॉक्टरांना म्हणावे तसे सहकार्य करत नाहीत. त्यांना एक स्वतःची मुलगी आहे व शिवाय एक मुलगा आणि मुलगी त्यांनी दत्तक घेतली आहे. या मुला-मुलींकडे ते लक्ष देतात. हे रुग्ण एकमेकांत मारामाऱ्या करतात. चोऱ्या करतात. काही वेळा त्यांना मारावयास लागत, बांधून ठेवायला लागत, हा मनोरुग्ण बरा झाला की जाताना आम्ही व सर्व स्टाफ त्याला सेंड ऑफ देतो. भरतला व्यवसाय सुरू करुन पाच वर्ष झाली. तर दोघे पती-पत्नी या व्यवसायांत ३ वर्ष काम करत आहेत. एखादा मनोरुग्ण पळून जातो तेंव्हा त्यांना तीव्र दुःख होते.

अंधेरी व विरार दरम्यान मनोरुग्णांवर उपचार करणारे हे एकमेव नर्सिंग होम आहे. या मनोरुग्णांची माहिती हे डॉ. पती-पत्नी मिळवण्याचा प्रयत्न करतात. तो आल्यावर त्याचा फोटो काढून ठेवतात व जाताना नवे रुप दिल्यावर त्याचा परत फोटो काढतात. मनोरुग्णांना घरी जेव्हा पाठवतात तेव्हा घरच्यांचा आनंद, त्यांचे आनंदाश्रू यातच सारे काही या पती-पत्नींना मिळून जाते. हे समाजकार्य करत असताना या दोघांना बऱ्याचदा स्वतःचा पैसा व बहुमूल्य वेळ वाया घालवावा लागतो. असे असूनदेखील त्यांच्या समाज सेवेला खीळ बसत नाही. आमची विद्या आमची प्रेरणा आहे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून या पती-पत्नींची यशस्वी वाटचाल चालू आहे.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAMNA**
**Mumbai**

**MAY 1992**

सामना

सामना मुंबई, सोमवार, दि. २५ मे १९९२ - पान ३

# वेड : वेड्यांच्या पुनर्वसनाचं!

संजय ढाळे



आपल्या रुग्णालयात वाटवाणी दांपत्य रुग्णांना आपुलकीने भोजन भरवितांना. (छाया : प्रवीण काडकर)



रस्त्यावर भटकणाऱ्या मतिमंदांचे आयुष्य बदलविणारे वाटवाणी दांपत्य

**MAHARASHTRA News**

**MARATHI**


**AAJ DINANK Mumbai**

**SEPTEMBER 1993**

शनिवार, ११ सप्टेंबर १९९३

# आज दिनांक

# खिलौना जानकर तुम तो...



**रस्त्याच्या कडेला स्वत:मधेच हरवलेला एखादा वेडा नजरेआड करून आम्ही सहज पुढे जातो. भरत आणि स्मिता वाटवानी या डॉक्टर दांपत्याला हे जमत नाही. त्यातूनच 'श्रद्धा पुनर्वसन केंद्र' आकाराला येते. वाट हरवलेल्या मनोरुग्णांना मायेची सावली मिळते. या मनोरुग्णांसोबत घालवलेले हे काही क्षण-**

**श्रद्धा पुनर्वसन केंद्र**
दूरध्वनी : ८५५०२०, ८५४३३३



छाया / प्रवीण वराडकर

'खामोशी'मधली मनोरुग्णांना बरं करताना स्वत:च वेडी होणारी वहिदा लक्षात राहिली. वेड्यांना बरं करणं ही फारच मानसिक गुंतागुंतीची कामगिरी असणार याची तेव्हा खात्री झाली. त्यानंतर प्रेमभंग झालेला शायर संजीवकुमार-मुमताजच्या प्रेमाचं औषध घेऊन बरा होताना पाहिला. वेडा असा असतो आणि मनोरुग्णाला बरं करताना प्रेमाची गुंतवणूक करावी लागते हे मनावर ठसलं.

"माफ करा, तुम्ही चुकताय! चित्रपटातून दाखवले जाणारे मनोरुग्ण आणि त्यांना बरं करण्यासाठी वापरले जाणारे मार्ग साफ चुकीचे आहेत. वेड लागणं म्हणजे काय, याविषयी सर्वसामान्य अजूनही अंधारात आहेत." वाटवानी दांपत्य गेली सहा-सात वर्षं झपाटल्यागत हे काम करत आहे. त्यांच्या पुनर्वसन केंद्राचं नावच मुळी 'श्रद्धा' आहे.

"शारीरिक आजार, मग तो कॅन्सर असो किंवा साधा ताप, आम्ही लगेच धावपळ करतो. मानसिक आजार ही संकल्पना मात्र आपल्यात तितकीशी रुजलेली नाही. मनोरुग्ण हा शब्द उच्चारायला जणू आपली जीभ चाचरते. मनोविकार हा भयंकर रोग आहे असं मानण्याकडे साधारण कल आढळतो. अज्ञानापोटी याकडे दुर्लक्ष करणारेही कमी नाहीत." डॉ. भारत वटवानी आपल्या 'श्रद्धा नर्सिंग होम'मधे बसलेले! बाजूलाच त्यांच्या पत्नी काळजीपूर्वक सगळं ऐकत असतात.

मनोरुग्णांचं पुनर्वसन त्यांच्या आयुष्याचा ध्यास आहे. त्यांच्या व्यक्तिगत आयुष्याच्या सगळ्या सीमारेषा या ध्यासाने पुसट केल्या आहेत. आतापर्यंत दोनशेच्या आसपास मनोरुग्ण त्यांनी पोटच्या पोराप्रमाणे जपत पुन्हा माणसात आणले आहेत. यातल्या प्रत्येकाची आठवण त्यांच्या मनात ताजी आहे...

श्रीनगरचा राजा एका धनाढ्य बापाचा बेटा. पदवीधर. मध्य प्रदेशचा राजेंद्र एका शेतकऱ्याचा मुलगा. जहांगिर आर्ट गॅलरीच्या समोर कोसळलेला हेमंत ठाकरे जे. जे.चा विद्यार्थी होता. सौराष्ट्राचा लक्ष्मण वाघेला बेकारीने पिचलेला...

"वेड कुणालाही लागू शकतं. मानसिक धक्का बसणं किंवा अति ताण पडणं हे यामागचं एकमेव कारण नाही. मुळात वेड लागणं ही मेंदूत होणारी 'बायोकेमिकल' प्रक्रिया आहे. मेंदू काम करेनासा होतो. माणूस स्वत:च्या नकळत बडबडू लागतो. भरकटतो. चालत चालत मग तो कुठे येऊन ठेपेल याचा नेम नाही."

डॉक्टर बोलता बोलता मला पांडुरंगकडे घेऊन जातात. बाकीचे मनोरुग्ण लगेच डॉक्टरांभोवती आशाळभूतासारखे गोळा होतात. त्यांचं लक्ष वेधू पाहतात. हात जोडतात. काहीबाही पुटपुटतात. माणसांत येण्यासाठी ते आसुसलेले असतात.

"मी पांडुरंग... पांडुरंग कडणे..." पहिल्यांदाच त्याला आपलं पूर्ण नाव आठवतं.

'कुठून आलास? कशासाठी?' डॉक्टर विचारतात.

"मी.मी... बाळूने मारलं मला. पळून आलो." बाळू कोण हे पांडुरंगलाच माहिती. त्याच्या डोळ्यात बाळूची भीती मात्र दिसते.

"दहा दिवसांपूर्वी हा आम्हाला कचऱ्यात अर्धनग्न अवस्थेत आढळला. माझ्या वॉचमनने याला पाहिलं. त्याला इथे आणलं, तेव्हा त्याच्या डोळ्यात फक्त शून्यच दिसत होतं. काहीच बोलत नव्हता. डॉक्टरांच्या बोलण्यात पांडुरंगविषयीची कणव दिसत होती. पांडुरंगला आता घरी जायची आस लागलेली दिसते. आज तो ठीकठाक आहे, पण दहा दिवसांपूर्वी...

"पांडुरंग नव्हे, तर सगळेच असे रस्त्याच्या बाजूला अतिशय वाईट अवस्थेत पडलेले आढळतात. कुणाचंच त्यांच्याकडे लक्ष नसतं. दिवसदिवस त्यांनी आंघोळ केलेली नसते. मरणोन्मुख अवस्थेला ते आलेले असतात. आम्ही त्यांना इथे आणतो. स्वच्छ आंघोळ घालतो. प्रतिकाराची त्यांच्यात शक्तीच नसते. एखादा आक्रमक निघतोही. आम्ही त्यास गुंगीचं इंजेक्शन देतो." ही झाली उपचाराची पहिली पायरी.

महिला रुग्ण असेल तर स्मिता पुढाकार घेते. त्यांच्या या सहकार्यानेच तर भारत वाटवानीचा हुरूप वाढलाय.

कॉलेजच्या दिवसात हे दोघेजण एकत्र आले आणि अशा उदात्त हेतूसाठी त्यांनी नातेवाईकांच्या विरोधाची पर्वा न करता स्वत:ला वाहून घेतलं. स्मिताला अशी आयुष्याची खाजगीपणाच्या खुणा पुसणारी वाट पत्करण्याचं अजिबात दु:ख नाही.

या मनोरुग्णांशी त्यांचं नातं नेमकं कसं असतं?' स्मिता वाटवानी मणिबेनच्या पाठीवरून हात फिरवत असतात. त्याचवेळी मी त्यांना हा प्रश्न टाकला.

"ही मणिबेन. म्हणजे आम्हीच तिला हे नावं दिलं. ती सापडली कांदिवलीला. कुठे राहतेस असं विचारलं तर कांदिवलीच सांगते. आता हिचं घर शोधायचं तरी कसं?" मणिबेन स्मिताली बिलगलेली असते.

'तुमचं नातं...' पुन्हा एकदा माझा प्रश्न.

"नातं हळूहळू तयार होतंय, पण कुणात गुंतून पडता येत नाही. भावना बाजूला ठेवाव्या लागतात. तो राजेंद्र फार गोड पोरगा होता; कलावंत मनाचा. बरा झाला आणि निघून गेला. आमची आठवण तो आजही ठेवून आहे. काश्मीरचा राजा दोन वर्षांनंतरही आम्हाला नियमित पत्रं पाठवतोय. त्याचे वडील तर आम्हाला देवासमानच मानतात. हा पांडुरंगही बरा होईल. हेच तर आमचं समाधान आहे. त्यासाठी अलिप्त राहावंच लागतं." स्मिता सांगते.

"आम्ही प्रत्येकाला हळूवारपणे त्याचं नाव, पत्ता विचारतो. चिकाटीने हे प्रश्न पुन्हा पुन्हा करावे लागतात. उत्तरं मिळतातच असं नाही. मिळाली तर अर्धवट मिळतात. चुकीची मिळतात. आता ही मुलगी बरी होऊनही आमच्याबरोबरच राहतेय. तिचा स्वीकार करणारं कुणीच नाही. एकदा एक रुग्ण आम्हाला राजकोटला घेऊन गेला. त्याच्या घरच्यांनी सरळ हात झटकले."

"ती दमयंती बरी होऊन घरी गेली. त्यानंतर महिन्याभरातच पुन्हा पळून गेल्याचं समजलं."

वाटवानी दांपत्य आपल्या परीनं या मनोरुग्णांना आधार देतंय. त्यांची इच्छाशक्ती अफाट आहे, पण त्यांच्या काही मर्यादा आहेत. या केंद्रासाठी लागणारा पैसा त्यांना प्रायव्हेट प्रॅक्टिसमधून उभा करावा लागतो. एक मनोरुग्ण शोधून बरा करेपर्यंत तीस दिवसांचा वेळ आणि तीन हजारांचा खर्च तर किमान होतोच होतो. जागेच्या अडचणीमुळे ते एकावेळी फक्त पाच ते दहा पेशंटच ठेवू शकतात. अर्थात समस्या फक्त आर्थिक नाही.

"आर्थिक मदत करणारे बरेच आहेत. ज्यांना आमच्या प्रामाणिकपणाविषयी शंका नाही, ते नेहमीच आमच्या पाठीशी उभे राहतात. आमच्या उपचारांनी बरे होणाऱ्यांचे आशीर्वाद आणि काही भल्या माणसांचा मदतीचा हात आम्हाला पुरेशी आर्थिक ताकद नसतानाही पुढे वाटचाल करण्याची हिंमत देतात."

"पण एकूणच मुंबईकर मला उदासीन वाटले. आमच्या कामाला पाठिंबा सोडा, शंका घेणारेच जास्त आहेत. अशांनी आमचं काम पाहावं इतकंच मी सांगेन. तुम्ही आमच्यावर शंका घेत नाही. तर माणसातल्या चांगलपणावरच संशय व्यक्त करता. 'पणे सकाळ'मधे आमच्याविषयी लेख छापून आला, त्यानंतर शेकडोंनी कौतुकाची पत्रं आली. मुंबईतलं चित्र नेमकं उलट! याचा अर्थ काय? मुंबईकर फार व्यावहारिक होत आहेत असा तर नाही ना!" वाटवानींच्या प्रश्नातच कदाचित उत्तर असावं, पण स्वत:ला प्रश्न विचारायला आपल्याजवळ वेळ आहे कुठे? वाटवानी दांपत्याचा स्वर कडवट झालेला असतो.

"मनोरुग्ण तुम्ही आम्ही कुणीही होऊ शकतं. मनोविकारांविषयी तुम्ही इतकी अनास्था का दाखवता? आज कॅन्सरग्रस्तांसाठी, अंधांसाठी संस्था आहेत. मनोरुग्णांसाठी का नाहीत? अर्थात आम्हा डॉक्टरांचाही दोष आहे. आम्ही या मुद्यावर एकत्र येण्याची गरज आहे. इथल्या पुनर्वसन संस्थाही बऱ्या झालेल्या मानसिक रुग्णांना दाखल करण्याआधी बारीक चौकशी करतात. हे कशासाठी? या रुग्णांच्या मदतीसाठी आम्ही एक चित्रप्रदर्शन करतोय. देशभरातले नामवंत चित्रकार यात सहभागी होत आहेत. मुंबईचेही आहेत. इतकाच की त्यांनी 'हो' म्हणताना आधी बाकीची नावं पाहिली. इतर राज्यातले चित्रकार उस्फूर्तपणे तयार झाले."

उस्फूर्तपणाचा आमच्यातला अभाव हे कुठल्या रोगाचं लक्षण?

■ प्रशांत ढवण

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAANJH LOKSATTA**
**Mumbai**

**OCTOBER 1993**



सांज लोकसत्ता

REGD. NO. MH/BY/SOUTH/307/92. वर्ष ३ : अंक १४१ मुंबई; सोमवार, दि. १८ ऑक्टोबर १९९३ किंमत १ रु. ५० पैसे, पृष्ठे १६

# रस्त्यावरच्या मनोरुग्णांना नवजीवन देणारे श्रद्धा नर्सिंग होम!

**मनोरुग्णांसाठी काम करणाऱ्या श्रद्धा रिहॅबिलीएशन फौंडेशनतर्फे आजपासून आर्टिस्ट सेंटर या ठिकाणी विविध नामवंत कलाकारांच्या कलाकृतींचे 'श्रद्धा समर्पण' हे प्रदर्शन आयोजित केले आहे. या निमित्ताने श्रद्धा नर्सिंग होमच्या कार्याचा हा परिचय.**

बोरिवली पश्चिमेचं श्रद्धा नर्सिंग होम. नर्सिंग होमपाशी पोचले तर मुख्य दरवाजाला कुलूप लावलेलं. मला पाहताच एकजण पुढे आला. कुलूप उघडून आत घेतलं. बसायला सांगितलं. त्या मुलाचं वागणं थोडं झाकोळलेलं वाटलं. पण येणाऱ्या-जाणाऱ्यांची नीट विचारपूस करीत होता.

इतक्यात डॉ. भरत आणि डॉ. स्मिता वाटवानी आले. अतिशय हसऱ्या चेहऱ्याचे हे तरुण दांपत्य. आधी आपण हॉस्पिटलमध्ये फिरू. म्हणजे आम्ही पेशंट कशाप्रकारचे ट्रीट करतो, कुठच्या अवस्थेत पेशंट येतात, ते कळेल, असं डॉ. वाटवानी म्हणाले. छोटंसच चार रूमचं हॉस्पिटल. पण पेशंटनी भरलेलं होतं. एक मुलगी आम्हाला पाहताच पायाला हात लावून वाकून नमस्कार करायला वाकली ती बराच वेळ उठायलाच तयार नव्हती.

दुसरी एक बाई पुढे आली. म्हणाली, मी इथली डॉक्टर आहे. वेलकम टू अवर हॉस्पिटल. आमचा चहा आत्ताच संपला. तुम्ही लोकांनी लेट का केला? माझा बेड बघा, 'मी कुठे झोपते ते बघा. आता जाऊ नका आणि गेलात तर लवकर परत या.

तितक्यात आणखी एकजण धावत आली. म्हणाली, 'अहो, माझ्या तीन दिरांची एकदम लग्नं आहेत. परवाच लग्नं लागणार आणि मी घरची इथे असून कसं चालेल? माझ्याशिवाय त्यांची लग्नं होतीलच कशी? मला तुमच्याबरोबरच घेऊन चला. तुम्ही मला घरी पोचवा.

तिला हो-हो म्हणत डॉक्टरांनी मला दुसऱ्या रूममध्ये नेले. तिथे अंगावर असंख्य जखमा असलेल्या एका पेशंटला सलाईन चालू होतं. जखमांतून रक्त वाहात

डॉ. भरत वाटवानी

होतं. जरा अंगाला हात लावला तर विव्हळत होता. पण बडबडतसुद्धा होता.

डॉक्टर म्हणाले, नुकताच रस्त्यावरून उचलून आणलाय. तीन-चार दिवस सलाईनवरच ठेवावा लागेल. कुणी आपल्याच धुंदकीत, कुणाची अखंड बडबड, तर काहीजण विचारीत होते असंख्य प्रश्न! हे सगळं पाहून डॉक्टरांच्या कन्सल्टिंग रूममध्ये आले आणि मिनिटभर सुन्न झाले.

हे सारे मनोरुग्ण. प्रकृतीने ठाकठीक, पण मनाने ढासळलेले, मनाचा तोल सुटलेले.

असे का? या प्रश्नावर अनेक कारणं डॉक्टरांनी सांगितली. त्यातलं वैज्ञानिक दृष्टिकोनातून प्रमुख कारण म्हणजे मेंदुतले **डोपामिन** या केमिकलचे प्रमाण वाढले की, मानसिक संतुलन बिघडते आणि नॉर्मलपेक्षा वेगळ्या क्रिया, विचार माणूस करू लागतो.

मानसिक ताणामुळे संतुलन बिघडण्याचा संभव असतो. हा तणाव कुणाच्या मृत्युमुळे, प्रेमभंग झाल्यामुळे, गरोदरपणात किंवा अन्य वेळी काही मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांमुळे येतो.

तिसऱ्या प्रकारात जन्मजात वेडगळपणा येतो. तो कुटुंबात कुणाला असेल तरी येऊ शकतो. सतत वैफल्य येत असलं तरी मानसिक तोल जातो. हे वैफल्य किंवा उदासीनता काही आपल्याला कमी आहे किंवा कमी मिळतं म्हणूनच येतं असं नाही. काही सुखवस्तू लोकांतही उदासीनता आढळते. पैसा, कपडे, खाणं म्हणजेच

**नीता खांडेकर**

जगणं नाही. मनाच्या गरजा पुऱ्या होणं, एकमेकांची मन सांभाळणं महत्त्वाचं असतं. तसं घडलं नाही तर एखाद्याचा मानसिक तोल ढळतो.

सतत दारूच्या सेवनाने आणि ब्राऊनशुगर घेण्याच्या सवयीने पण मनोरुग्णता येते.

अशा वेळी पेशंट काहीही कारण नसताना रागावतो, हसतो, सतत गाणे म्हणतो किंवा अखंड बडबडतो. कधी कधी मारतोसुद्धा. कपड्यांवर कपडे घालणे किंवा कपडे काढूनच टाकणे, सारखं घाबरणे, प्रत्येक गोष्टीचा, वस्तूचा, माणसाचा संशय घेणे, हातातली वस्तू फेकून देणे किंवा आपल्या सगळ्या वस्तू आपल्या पँटच्या-शर्टच्या खिशात कोंबणे. स्त्रिया या वस्तू पर्समध्ये किंवा गाठोडं करून त्यात ठेवतात. त्या वस्तू मुळीच किमती नसतात. आकडे, पिना, बटणं, सुई-दोरा, कागद, प्लॅस्टिकच्या पिशव्या अशा या किरकोळ वस्तू असतात. हत्याराशी खेळणे, केलेली क्रिया किंवा बोलणे, दुसऱ्या मिनिटाला

डॉ. स्मिता वाटवानी

विसरून जाणे असं जेव्हा होतं तेव्हा मानसोपचार तज्ज्ञांकडे नेऊन ट्रीटमेंट देणं हे अत्यंत जरुरीचं असतं. शिवाय घरातल्या आणि आजूबाजूच्या लोकांनी टिंगलटवाळी न करता, न हसता, सहानुभूती, प्रेम दाखवून अशा रुग्णाची काळजी घेतली पाहिजे. अतिशय महत्त्वाचे म्हणजे, लोक काय म्हणतील म्हणून घरच्या लोकांनीही पेशंटला लपवून ठेवू नये. शक्यतो लवकर मनोरुग्णांच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करावं.

मानसिक संतुलन बिघडलेली संतोषी जोशी

बरी झालेली संतोषी जोशी

डॉ. भरत वाटवानी म्हणाले, कचऱ्याच्या कुंड्यांजवळ धुंडून काहीतरी खात असणारी लोकं ही भिकारी नसतात. तर ते मनोरुग्णच असतात. भिकारी कधीच कचऱ्यातल्या वस्तू उचलून खात नाही.

श्रद्धा नर्सिंग होममध्ये मनोरुग्णांना बरं करणं हा डॉक्टरांनी घेतलेला वसा आहे. इथे प्रायव्हेट पेशंट तर येतातच. पण डॉक्टर पती-पत्नी जेव्हा बाहेर जातात तेव्हा रस्त्याच्या कडेला पडलेल्या या मनोरुग्णांना गाडीत घालून आणतात. साफ-सुथरं करून त्यांना धुवून, तीन-चार दिवस सलाईनवरच ठेवतात. जरूर असेल ते औषधोपचार करतात. पेशंट लगेच बोलायला लागतो असे मुळीच नाही. मग त्या व्यक्तीच्या बाबतीत मानसिक संतुलन बिघडण्याची जी कारणं घडली असतील याचा शोध घेणं सुरू होतं. योग्य ती औषधं देऊन त्याला बोलतं करून मनातलं काढून घेतलं जातं, याला महिना-दीड महिना लागतोच. मग त्याचा पत्ता काढून, पेशंट जिथे राहात असेल तिथे तो पूर्ण बरा झाल्यावर पोचवला जातो.

पुरुष पेशंट असेल तर स्वतः डॉक्टर किंवा सुरक्षा-कर्मचारी त्याला घरी पोचवतात. स्त्री पेशंट असेल तर डॉ. स्मिताच पोचवायला जातात. आंध्रप्रदेश, कर्नाटक, बिहार, ओरिसा, गुजराथ, वेस्ट बंगाल, तामिळनाडू, गोवा, पुणे आणि मुंबईतलेही कितीतरी पेशंटस् डॉक्टर पती-पत्नींनी बरे करून आपापल्या घरी पोचवले आहेत.

बाहेरगावांहून येणाऱ्या पेशंटबद्दल बोलताना डॉक्टर म्हणाले, मानसिक संतुलन बिघडलं की असे लोक घरातून बाहेर

(पान सोळा पाहा)

## (पान तेरा वरून) रस्त्यावरच्या मनोरुग्णांना नवजीवन

पडतात, मिळेल त्या गाडीत बसतात आणि अशा गाड्या बदलत, टी. सी., पोलिसांचे धक्के खात, काय जे गाडीत, प्लॅटफॉर्मवर पडलेले असेल ते खात ते मुंबईत पोचतात. नागालँडमधला आर्मी ऑफिसरचा मुलगा, डॉक्टरांना कचऱ्याच्या पेटीजवळ मिळाला. बी. एससी. झालेला दिलीपसिंग गुसेन जेव्हा पूर्ण बरा झाला तेव्हा त्याच्या पत्त्यावरून वडिलांना बोलावण्यात आले. अजूनही त्या आर्मी ऑफिसरची पत्रं येतात. आता तो खूपच चांगला आहे.

यापुढची तीन उदाहरणे विचार करायला लावणारी आहेत. सुधीर महादेव फडके. व्ही. जे. टी. आय.मधून बी. ई. झालेला. महानगरपालिकेत वॉटर सप्लाय प्रॉजेक्टस् आणि इतर खात्यात १९७५ ते १९८६ पर्यंत व्यवस्थित नोकरी करत होता. अचानक मानसिक तोल गेला, बायको सोडून गेली. आई-वडील आधीच गेलेले. घरचं प्रेमाचं कुणीच नाही. वेडाच्या धुंदीत कुणाला तरी सही देऊन, ब्लॉकही गमावून बसला आणि त्याच्या घरासमोरच्याच कचऱ्याच्या कुंडीपाशी डॉक्टरांना मिळाला. उपचार चालू करून बरा झाल्यावर ही कहाणी डॉक्टरांना समजली, पोलिसांच्या मदतीने त्याचा पहिला ब्लॉक ताब्यात मिळवला. आता डॉक्टर मुंबई महानगरपालिकेत त्याला परत नोकरी मिळवून देण्याच्या प्रयत्नात आहेत.

**संतोषी जोशी** ही निरागस चेहऱ्याची मुलगी, तारुण्याचे हसण्या-खेळण्याचे दिवस. पण अखंड बडबडत रस्तोरस्ती फिरायची. **शाकेब आलम** हा बी. एससी. ॲग्री. मुलगा पाटण्याचा. हुषार म्हणून नावाजलेला. एक दिवस घरातून बाहेर पडला. डॉक्टरांना सापडला तो पूर्ण कोसळलेल्या मनःस्थितीत. या आणि अशा बऱ्याचजणांच्या आपल्या जिवाला टोचणी लावणाऱ्या कथा.

मणीबेन तिच्या दोन लहान नातवंडांना घेऊन गटारापाशी राहायची. मानसिक संतुलन बिघडलेली, छोट्याला तहान लागल्यावर गटारातलंच पाणी पाजायची. काही दिवसातच ते मूल मेलं. जवळची दुसरी मुलगी कशी वाचली हा न सुटणारा प्रश्न. डॉक्टरांनी मणीबेन आणि त्या मुलीला उचलून आणलं. ट्रीटमेंटनंतर दोघीही चांगल्या आहेत. मुलगी तर नॉर्मलच होती. डॉक्टरांनी तिला शाळेत घातलीय. सगळा खर्च तर डॉक्टरच करताहेत. पण लवकरच छोटीला घर मिळवून देण्यासाठीही त्यांचा प्रयत्न चालू आहे.

असे हे श्रद्धा नर्सिंग होम. ही महाराष्ट्रातली एकमेव संस्था आहे जी रस्त्यावरच्या मनोरुग्णांना आसरा देतेय, इलाज करतेय. आत्तापर्यंत डॉक्टरांनी दीडशेच्यावर पेशंट बरे केलेले आहेत.

सध्याची जागा हॉस्पिटलला खूप अपुरी पडतेय. खाजगी पेशंटकडून फक्त पैसे घेतले जातात. त्या पैशाचा विनियोग रस्त्यावरून आणलेल्या पेशंटसाठी केला जातो. दोन्ही वेळेस जेवण, चहा, खाणं आणि औषधोपचार, कपडे, तेल, साबण हे सर्व काही पेशंटस्ना पुरवलं जातं.

डॉक्टर म्हणाले, बऱ्या झालेल्या पेशंटस्ना त्यांचा वेळ जाण्यासाठी आणि मन कशात तरी गुंतून राहायला हवं म्हणून आवडीचे काम देतो. खरं तर स्त्रियांसाठी शिवणकाम किंवा आणखी काही वेगळे उद्योग आणि पुरुषांसाठी कारपेंटरी वगैरे सुरू करायला हवीय. पण जागेअभावी ते शक्य होत नाही.

पेशंट कधी तुम्हाला मारण्याचा प्रयत्न करतात का? असे विचारल्यावर डॉक्टर म्हणाले, भानात नसतात तेव्हा ॲटॅक करण्याचा प्रयत्न करतात. मग त्यांना बांधून ठेवून सडेटीव्ह सुरू करतो. त्या अमलाखाली मग जास्त गडबड करत नाहीत.

आमच्या इथला कुणीही स्टाफ, मानसिक अवस्था ठीक नाही म्हणून कारणाशिवाय रागाने बोलत नाही की हसून चेष्टा उडवत नाही. औषधं, नीट जेवणखाण आणि खूप काळजी घेऊन आम्ही पेशंट बरे करतो. कित्येक पेशंटस्ना बरे झाल्यावर घरी गेल्यावर सुद्धा औषधे पुरवतो.

हल्लीच्या डॉक्टरांचा कल बंगले, गाड्या, प्रॉपर्टी जमवण्याकडे असतो. अशाच वेळी एक डॉक्टर दांपत्य निस्पृह बुद्धीने, सेवाभावी वृत्तीने, या कार्यात झोकून देऊन, एका सामाजिक प्रश्नाला आपल्या ज्ञानानी, प्रयत्नानी उत्तर शोधताहेत. त्यांच्या कष्टाला तर तोड नाहीच. पण मानवतेलाही आवाहन आहे. शासनाने अशा चांगल्या उपक्रमाला मदत आणि जनतेने होईल तितका आर्थिक हातभार, वस्तू, धान्य जमेल ते यथाशक्ती देऊन या कार्याला आपुलकीची पावती म्हणून सहकार्य करण्याची गरज आहे.

पत्ता- डॉ. भरत आणि डॉ. स्मिता वाटवानी. श्रद्धा नर्सिंग होम, शांती आश्रमच्या मागे, ऑफ इस्कर रोड, बोरिवली (पश्चिम), दूरध्वनी- ८५८३३३, ८५५०२०, घरचा- ८०१२७७१, ८०१७५२१.

Shraddha Rehabilitation Foundation
*Dedicated to the mentally - afflicted destitutes on the streets of Bombay*

*Garnet,*
*Behind Shanti Ashram,*
*Off Eksar Rd., Borivli (W),*
*Bombay - 103.*
*Phones: 855020/854333*

**MAHARASHTRA**

**News**

**MARATHI**

**MAHARASHTRA TIMES**

**Mumbai**

**OCTOBER 1993**

१७ ऑक्टोबर १९९३

रविवार महाराष्ट्र टाइम्स

# ‘श्रद्धा समर्पण’ प्रदर्शन

श्रीराम खाडिलकर

श्रद्धा फाऊंडेशन या बोरिवलीच्या संस्थेच्या मदतीसाठी ‘श्रद्धा समर्पण’ या नावाने एका कलाप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून, यानिमित्ताने अनेक नामवंतांची चित्रे एकत्रितपणे पाहण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

मानसिक आजाराने त्रस्त झालेल्या मनोरुग्णांवर उपचार करून, त्यांना पूर्वीसारखे जीवन जगता येईल, असे बरे करण्याचे काम श्रद्धा फाऊंडेशन ही संस्था करते. या संस्थेला आपली स्वतःची इमारत दहिसर येथे उभारायची आहे. यासाठी निधीसंकलन केले जात आहे. या प्रदर्शनातील चित्रे विकून सुमारे पंचवीस लाख रुपये जमावेत, असा प्राथमिक अंदाज आहे.

जहांगीर आर्ट गॅलरी आणि आर्टिस्ट्स् सेंटर अशा दोन ठिकाणी उद्यापासून हे प्रदर्शन सुरू होत आहे.

महाराष्ट्र टाइम्स
१७ ऑक्टोबर १९९३.

श्रीराम खाडिलकर

# ‘श्रद्धा समर्पण’ प्रदर्शन

श्रद्धा फाऊंडेशन या बोरिवलीच्या संस्थेच्या मदतीसाठी ‘श्रद्धा समर्पण’ या नावाने एका कलाप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून, यानिमित्ताने अनेक नामवंतांची चित्रे एकत्रितपणे पाहण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

मानसिक आजाराने त्रस्त झालेल्या मनोरुग्णांवर उपचार करून, त्यांना पूर्वीसारखे जीवन जगता येईल, असे बरे करण्याचे काम श्रद्धा फाऊंडेशन ही संस्था करते. या संस्थेला आपली स्वतःची इमारत दहिसर येथे उभारायची आहे. यासाठी निधीसंकलन केले जात आहे. या प्रदर्शनातील चित्रे विकून सुमारे पंचवीस लाख रुपये जमावेत, असा प्राथमिक अंदाज आहे.

जहांगीर आर्ट गॅलरी आणि आर्टिस्ट्स् सेंटर अशा दोन ठिकाणी उद्यापासून हे प्रदर्शन सुरू होत आहे.

## [illegible]

मद्रासच्या वीव्हर्स सर्व्हिस सेंटरमध्ये काम करणाऱ्या के. एस. राव आणि डी. रवी यांच्या चित्रांचे प्रदर्शन सध्या जहांगीर आर्ट गॅलरीत भरले आहे.

या दोघा चित्रकारांच्या चित्रांमध्ये राव यांची चित्रे अधिक सरस वाटतात. राव यांची चित्रे मानवाकृतींच्या रचना असलेली आहेत, तर रवी यांची चित्रे गूढ आहेत. राव यांच्या चित्रांमधील मानवाकार घनतेचे दर्शन घडवितात. तर रवी यांच्या रंगचित्रांमध्ये मुद्राचित्रात असावा, तसा पोत आढळतो. फारसे आकर्षक असे या प्रदर्शनात दिसत नाही.

## नेहरू सेंटरमध्ये गटप्रदर्शन

चार युवा कलाकारांचे पहिलेच गट-प्रदर्शन आजपासून वरळीच्या नेहरू सेंटर आर्ट गॅलरीत भरत आहे. शनिवारपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात जलरंग, तैलरंग आणि ॲक्रॅलिक रंगामध्ये काढलेली सुमारे पंचवीस चित्रे बघायला मिळणार आहेत.

यशवंत सोनावणे, विनायक जगदाळे, गणेश चौगुले आणि सयाजीराव नांगरे या चार तरुण कलाकारांपैकी जगदाळे वगळता बाकीचे तिघे शाळेत शिक्षक आहेत. जगदाळे फक्त चित्रकारीच करतात.


सोनावणे आणि चौगुले यांच्या रंगलेपनात जोरकसपणा आहे, तर जगदाळे यांच्या चित्रातील रंगलेपनात सराईतपणा आहे. नांगरे हे जलरंगाच्या छटा नेमक्या ठिकाणी मर्यादित स्वरूपात लावू शकतात. पण रंगलेपनाचे हे चौघांचेही तंत्र चित्राच्या केवळ काही भागातच जाणवते.

## राणे यांची चित्रे

दत्तप्रसन्न राणे या मुंबईतील कलाकाराने काढलेल्या मोठ्या आकारातील रंगचित्रांचे प्रदर्शन सध्या जहांगीर आर्ट गॅलरीत भरले आहे.

मोठ्या आकाराचे कॅनव्हास या कलाकारने जेवढ्या सफाईदारपणे रंगविले आहेत, तेवढ्याच ताकदीने त्यांनी लहान आकारातील चित्रेही रंगविली आहेत. मानवाकारांचे चित्रण करताना बाह्यरेषा त्यांनी काळ्या रंगाने सर्वात शेवटी काढली आहे आणि त्यापूर्वी चित्रात रंग भरताना तपकिरी रंगाला प्राधान्य देऊन, इतर रंगांचा मोजकाच पण प्रभावी वापर केला आहे.

राणे यांच्या चित्रांत खाणे-पिणे करीत असलेल्या, एकमेकांशी खेळत असलेल्या आणि वाद्ये वाजविणाऱ्या मानवाकृतींचे दर्शन घडते.



दत्तप्रसन्न राणे यांची कलाकृती

## महालसामध्ये सोनी

पृथ्वी सोनी या कलाकाराने काढलेल्या रंगचित्रांचे प्रदर्शन सांताक्रुझ विमानतळाजवळच्या सेन्टॉर हॉटेलमधील महालसा आर्ट गॅलरीत भरले आहे.

अभिनेते दिलीपकुमार यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे शुक्रवारी उद्घाटन झाले. येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत हे प्रदर्शन चालणार आहे.

पृथ्वी सोनी यांच्या या प्रदर्शनात सुमारे पंचवीस रंगचित्रे असून, रंगीत फोटो काढावा त्याप्रकारे आपली चित्रे रंगविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. भरपूर रंगांचा आणि रंगछटांचा वापर हे त्यांच्या चित्रांचे वेगळेपण आहे. चित्रातील महत्त्वाचा तपशील काढताना ते

चित्रशिल्प

फोटोसारखे दिसेल, याची काळजी ते एकीकडे घेतात. मात्र दुसरीकडे चित्रातली पार्श्वभूमी किंवा उर्वरित भाग तेवढ्याच कौशल्याने रंगविताना दिसत नाहीत. सोनी यांनी मनजीत बावा यांचेकडे चित्रकलेचे धडे घेतले आहेत, असे असले, तरीही बावा आणि सोनी यांच्या चित्रणात जमीन-अस्मानाचा फरक आहे.

## शामेन्द्र यांचे प्रदर्शन

शामेन्दू यांच्या रंगचित्रांचे प्रदर्शन येत्या मंगळवारपासून जहांगीर आर्ट गॅलरीत भरत आहे. येत्या २५ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात त्यांनी तैलरंगात काढलेली चित्रे मांडली जाणार आहेत. यापूर्वी त्यांनी जलरंगातील चित्रांचे प्रदर्शन भरविले होते.

## प्रभा जैन यांचे प्रदर्शन

प्रभा जैन यांनी पोर्सिलिनमध्ये घडविलेल्या अंतर्गत सजावटयोग्य कलावस्तूंचे प्रदर्शन सध्या बजाज आर्ट गॅलरीत भरले असून, ते १८ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे.

कागद, प्लॅस्टर, माती, लाकूड अशा माध्यमात नेहमीच सजावटीसाठी योग्य वस्तूंची निर्मिती केली जाते. पण पोर्सिलिन हे माध्यम याबाबत तसे दुर्मिळच. पण प्रभा जैन यांनी पाने-फुले, केकमध्ये कौलारू टुमदार घर करावे, तसे घर, अशा अनेक वस्तू पोर्सिलिनमध्ये करून, त्या रंगविल्या आहेत. त्यांची कलाकुसर दाद द्यावी अशी आहे.

## पाल यांचे शिल्पप्रदर्शन

कलकत्ता निवासी आणि बडोदा येथील सयाजीराव विद्यापीठात शिल्पकलेचे शिक्षण घेतलेल्या प्रदीप रूद्र पाल या कलाकाराच्या शिल्पांचे प्रदर्शन सध्या जहांगीर आर्ट गॅलरीत भरले आहे.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**LOKSATTA**
**Mumbai**

**OCTOBER 1993**


# लोकसत्ता

मुंबई, पुणे आणि नागपूर येथून एकाच वेळी प्रकाशित

वर्ष ४७ : अंक २७५ मुंबई; रविवार, दि. १७ ऑक्टोबर १९९३ ● सर्वाधिक वाचकांचे सर्वांगीण मराठी दैनिक ● किंमत २ रु. (पृष्ठे १६) **** शहर आवृत्ती


## 'जहांगीर'मध्ये 'श्रद्धा समर्पण' जंगी प्रदर्शन व लिलाव

मुंबईतील रस्तोरस्ती भटकणाऱ्या, उकिरड्यावर फेकलेले अन्न खाणाऱ्या, मलीन कपड्यांतील मनोरुग्णांना माणसांत आणण्याचे प्रयत्न करीत असलेल्या डॉ. भारत वाटवानी यांच्या श्रद्धा रिहॅबिलेशन फौन्डेशन विस्तार प्रकल्पासाठी येत्या १८ ते २४ ऑक्टोबर रोजी जहांगीर कला दालनात 'श्रद्धा समर्पण'नावाचे भले मोठे चित्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

या चित्रप्रदर्शनात सुप्रसिद्ध चित्रकार प्रफुल्ल मोहन्ती (लंडन), कृष्णा रेड्डी (न्यूयॉर्क), जी. एस. आडिवरेकर, एस. एम. बोलेकर, प्रभाकर बर्वे, अमित अंबाला, बैसाख भट्टाचार्जी अशा देशविदेशातील सुमारे १४० कलावंतांची चित्रे मांडण्यात येणार आहेत. या चित्रांचा २१ ऑक्टोबर रोजी सायं. ५ ते ७ च्या दरम्यान लिलाव केला जाणार आहे.

लिलावाच्या वेळी क्रीडा व सांस्कृतिक खात्याचे मंत्री अरुण दिवेकर, खासदार सुरेश कलमाडी, सिने अभिनेते खासदार सुनील दत्त, डिंपल कापडिया. अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, अनुपम खेर, एस. के. बिर्ला आणि गो. रा. खैरनार आदी नामवंत मंडळी उपस्थित राहणार आहेत.

● **नलिनी भागवत**

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**SAMNA**

**MARCH 1997**


सामना

रविवार, दि. ९ मार्च १९९७ - ७


# मनोरुग्णांचा आधार 'श्रद्धा'



डॉ. भरत आणि डॉ. स्मिता रुग्णाची प्रेमळपणाने चौकशी करताना.

पाच वर्षांपूर्वीची गोष्ट.

योगीनगर, बोरिवली पश्चिम. मुंबईतील एक उपनगर. याच योगीनगर-मध्ये माझं घर. जवळच एक मैदान. याच मैदानावर मी राहत होतो. घर असूनही घर नसल्यासारखा. कारण पैशाच्या तंगीमुळे ते घर एकाला मी भाड्याने दिले होते. या भाडेकरूने २५,००० रुपये डिपॉझिट म्हणून दिलेले. शिवाय भाडं २००० रुपये महिन्याला; परंतु मित्राने फसवले. पैसे गेले व दर महिना मिळणारे भाडे एकजण मला न सांगता घेऊन जायचा. पैसा हे सर्वस्व नसावं पण जरूरीपुरता तरी असावा हे कोणालाही पटेल. पण तोही मला मिळत नव्हता. कधीतरी भाडेकरूकडून २०० रुपये आठवड्याला मिळायचे. पण ते लगेच संपायचे. कारण तहान-भूक माणसाला सर्व विसरायला लावते हेच खरं. यामागे माझी कर्मकहाणी सांगण्याचा हेतु नाही. कारण वेगळंच आहे.

मी मनोरुग्ण झालो होतो. त्यामागेही कारण होतं. माझे आई आणि वडील जवळजवळ २० वर्षांच्या अनंत यातनांनंतर कॅन्सरमुळे संपले. पत्नी व मुलगी सोडून गेली. जवळचे मित्र व भाऊ अचानक गेले. प्रचंड मानसिक तणावामुळे मी खचलो. प्रत्येकाला दुःखही असतंच. मान्य; परंतु दुःखालाही मर्यादा असतात. मर्यादा, मग ती कोणतीही असो, ओलांडली गेली की माणूस फरफटत जातो. माणसातलं स्वत्वच हरवतो. माणूस, माणूस रहात नाही. सुख हे माणसाला हवं असतंच! मग ते कौटुंबिक असो, पैशाचं किंवा छंदाचं असो! मीही पूर्वीपासून लिहायचो. माझ्या मित्रांनी, द्वारकानाथ संझगिरी, निखिल वागळे या पत्रकारांनी, मला लिहायला लावलं.

तर काय मी मनोरुग्ण झालो होतो. कारण मला वाटायला लागलं की मी 'वॉशिंग्टन पोस्ट'चा पत्रकार आहे. असं का वाटायला लागलं हे मला अजूनही माहीत नाही. काही गोष्टी माहीत नसलेल्या बऱ्या असतात. परंतु परिस्थितीची जाणीव असावी लागते. तीच जाणीव मी विसरायला लागलो होतो. परिस्थिती माणसाला बदलवते; परंतु मी मानसिक आजारामुळे परिस्थितीच बदलायला लागलो होतो. परिस्थितीचं भान मला राहिलं नव्हतं.

याच अवस्थेत मी पांच वर्षांपूर्वी एके संध्याकाळी योगीनगरच्या मैदानावर बसलो होतो.

क्रिकेट खेळून झालं होते. मी चहा पिण्यासाठी म्हणून मैदानाबाहेर पडलो आणि तेवढ्यात एक गाडी माझ्याजवळ येऊन थांबली. टाय लावलेले एक गृहस्थ उतरले व त्यांनी मला विचारलं, 'तू आजारी आहेस, हॉस्पिटलमध्ये येतोस का?' मी विचारलं, 'तुम्ही कोण?'

ते म्हणाले, 'जवळच माझं नर्सिंग होम आहे तर तिथे तू चल.'

मीही तयार झालो व ते मला त्यांच्या श्रद्धा नर्सिंग होममध्ये घेऊन आले. त्यांची पत्नी डॉ. स्मिता वलवानी व स्वतः डॉ. भरत वलवानी हे नर्सिंग होम चालवितात.

तर काय मला घर मिळालं. डॉ. भरत व स्मिता यांनी मला पहिल्यापासून प्रेमाची, आपुलकीची वागणूक दिली. रोगाचं निदानही केलं व औषधं, इंजेक्शन्स द्यायला सुरुवात केली. मीही त्या औषधांना प्रतिसाद द्यायला लागलो. सहा महिन्यांतच मी बरा झालो. डॉ. पतिपत्नीही म्हणाले, पैसे देऊ नकोस. त्याची जरूरी नाही. मीही विचारात पडलो. डॉक्टर पैसे देऊ नकोस का म्हणतात? कारण पैशाच्या या दुनियेत माणुसकीचा झरा असलेली माणसं विरळाच. डॉ. स्मिता व भरत एक व द्वारकानाथ संझगिरी- माझा मित्र दुसरा.

पैसे द्यावे लागले नाहीत म्हणून मी म्हणत नाही. माणसं प्रेमावर जगतात. शेवटी माणूस हा एकटा! त्याला प्रेमाचीच जरूर. प्रेम तेही निःस्वार्थी या जगात मिळणं महाकठीण. नातेवाईकही तोंड फिरवतात. आईचं प्रेम हे श्रेष्ठ. तसंच प्रेम मला त्यांच्याकडून मिळालं.

प्रेमात श्रद्धा असावी लागते म्हणूनच कदाचित डॉक्टरांनी त्यांच्या नर्सिंग होमचं नाव 'श्रद्धा' ठेवलं असावं.

तर काय श्रद्धेविषयी!

डॉ. भरत व स्मिता वलवानी यांचं श्रद्धा नर्सिंग होम आहे बोरिवली भागात शांती आश्रमाच्या मागे. तसं बघायला गेले तर मुंबईत इस्पितळं भरमसाट, पण श्रद्धा नर्सिंग होम वेगळं. रस्त्यावर राहणाऱ्या मनोरुग्णांसाठी. रस्त्यावर कोणी स्वखुषीने रहात नाही. परिस्थितीच त्याला कारणीभूत ठरते. मुंबईसारख्या मोठ्या औद्योगिक शहरात बहुतेक लोक नोकरीच्या शोधात येतात. आणि फसवले जातात. पैसे, जे काही असतील ते संपतात. परिस्थितीच्या तणावाखाली हे लोक खचून जातात. परिस्थितीमुळे मुख्यतः हे मानसिक तणावाखाली येतात. हताश होतात व रस्त्यावर फिरू लागतात. मग भीक मागणं आलं. अन्नासाठी दाहीदिशा फिरतात. परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेले हे लोक मनोरुग्ण होतात. रेल्वे प्लॅटफॉर्मवर, रस्त्यावर, कचरापेटीजवळ, दाढी वाढलेली, भयाण विमनस्क चेहरा, भुकेमुळे असहाय झालेले हे मनोरुग्ण तुम्हाला दिसलेही असतील. अशाच मनोरुग्णांना डॉक्टर पती- पत्नी शोधतात. त्यांच्याशी प्रेमाने बोलतात. पैशाची कोणतीही आशा न ठेवता त्यांना श्रद्धा नर्सिंग होममध्ये घेऊन येतात. त्यांच्यावर उपचार करतात. त्यांना आसरा, सहारा देतात. त्यांना बरं करतात. शिवाय त्यांचा पत्ता शोधून त्यांना त्यांच्या आप्तस्वकीयांकडे पाठवतात. डॉ. पती-पत्नींनी हे एक व्रतच हाती घेतलंय. समाजसेवेचं व्रत!



पूर्वीचा पांडुरंग





आताचा पांडुरंग

डॉ. भरत व स्मिता शिकत असतानाच एकमेकांच्या प्रेमात पडले व लग्न करायचा निर्णयही त्यांनी तेव्हाच घेतला. हॉस्पिटलमध्ये जाताना त्यांच्या लक्षात आलं की रस्त्यावरच्या कचरा पेटीजवळ, रेल्वे प्लॅटफॉर्मवर स्वतःशीच बडबडणारे, भीक मागणारे, हावभाव करणारे, कचरा पेटीतल्या अन्नावर निवारा करणारे खूपजण मनोरुग्ण आहेत. तेव्हाच त्यांनी या मनोरुग्णांसाठी एक पुनर्वसन केंद्र उघडायचं ठरवलं. श्रद्धा बोरिवलीला आहेच. शिवाय फक्त रस्त्यावरील रुग्णांसाठी दहिसरलाही त्यांनी एक हॉस्पिटल, श्रद्धा पुनर्वसन केंद्र उभारलंय. ते लवकरच सुरू होईल.

सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे मानसिक रुग्णाला समाज आपला मानत नाही. स्वीकारत नाही. समाज झिडकारून टाकतो ते फक्त मानसिक रुग्णालाच! शारीरिक दुखणं, आजार असणाऱ्यांकडे समाज सहानभुतीने बघतो. त्याला जवळ करतो. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. मानसिक तणावामुळेही शारीरिक आजार होतो. शारीरिक आजारामुळेही त्याची मनोवस्था बिघडते. मानसिक रुग्णाला कुष्ठरोग्यासारखं समाजानं टाकल्यामुळे त्याला ना व्यवस्थित व्यवसाय करता येत, ना नोकरी!

म्हणूनच डॉक्टर पतिपत्नींनी कुवतीप्रमाणे त्यांच्या हॉस्पिटलमध्ये खूपजणांना नोकरी दिली आहे. परिस्थितीतील हा बदलच रुग्णाला मदतीचा हात देतो. व्यवसाय असो वा नोकरी, माणूस त्याच्या आजुबाजूच्या परिस्थितीमुळे म्हणजेच राजकारण, पैसे खाणारे आजुबाजूचे लोक मग त्यात त्याचे वरिष्ठ अधिकारी असो वा त्याचे सहकारी असोत, जबरदस्त मानसिक तणावाखाली येतो. कौटुंबिक तणाव म्हणजेच पती- पत्नी यांचे संबंध, मुलांचे, आईवडील व भाऊ- बहीण यांचे संबंध यामुळेही जबरदस्त तणावाखाली माणूस येतो. त्यात सुशिक्षित माणसास देशाची परिस्थिती, राज्य करणाऱ्यांचे गलिच्छ राजकारण, खेडी, शहरातील उद्वेगजनक परिस्थिती यामुळेही नैराश्य, वैफल्य येतं.

**सुधीर फडके**

जवळच्या नातेवाईकाचा मृत्यू हाही माणसास उद्वेगजनक बनवतो. ही परिस्थिती सतत बदलत राहते. या कालचक्राच्या भोवऱ्यात सापडलेला माणूस अत्यंत मानसिक तणावामुळे मनोरुग्ण होतो. म्हणूनच डॉक्टर पतिपत्नींचे मनोरुग्णांना नोकरी देण्यामागचं कारण असावं. मीही व्यवसायाने इंजिनीयर. परंतु मानसिक तणावामुळे नोकरी सोडली परंतु डॉक्टरांनी सहानुभूतीचा हात दिला व मला हॉस्पिटलमध्येच नोकरी दिली.

१७९५ साली पिनेल त्यांनी फ्रान्समध्ये मनोरुग्णांसाठी इस्पितळ उघडलं. या हॉस्पिटलमध्ये दाखल केल्या गेलेल्या मनोरुग्णांना पिनेल यांनी त्यांच्याच हॉस्पिटलमध्ये नोकरी द्यायला सुरुवात केली. असं केल्यावर त्यांच्या लक्षात आलं की या रुग्णांना नोकरी दिल्यावर हॉस्पिटलमधील वातावरण एकदम शांत होते. मनोरुग्णही मन लावून काम करतात. हाच आदर्श डॉ. भरत व डॉ. स्मिता यांनी ठेवला असावा.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**LOKSATTA**
**Mumbai**

**MARCH 2006**

www.loksatta.com
मुंबई; बुधवार, २९ मार्च २००६
मुंबई, पुणे, नागपूर आणि अहमदनगर येथून प्रकाशित
लोकसत्ता

# श्रद्धा पुनर्वसन संस्थेचे कर्जतजवळ उपचार केंद्र

**मुंबई, २८ मार्च/प्रतिनिधी**

रस्त्यावरील निराधार मानसिक विकलांगांवर उपचार करून त्यांना पुन्हा त्यांच्या कुटुंबाकडे सोपविणाऱ्या श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाऊंडेशन संस्थेने आता अशा रुग्णांच्या पुनर्वसनासाठी कर्जतजवळ एक उपचार केंद्र सुरू केले आहे. बाबा आमटे यांचे सुपुत्र प्रकाश आमटे यांच्या हस्ते गुढीपाडव्याला या उपचार केंद्राचे उद्घाटन होणार आहे.

दहिसर येथील एका रुग्णालयातून गेली १७ वर्षे या संस्थेचे कार्य सुरू होते. आतापर्यंत सुमारे नऊशे रुग्णांना या संस्थेने त्यांचे घर परत मिळवून दिले आहे. आता या संस्थेने कर्जतजवळ उभारलेल्या निवारा आणि उपचार केंद्रात मानसिक रुग्णांच्या पुनर्वसनासाठी शेतकी, दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन उपक्रमांचीही मदत घेतली जाणार आहे. सध्या या केंद्रात चाळीस रुग्णांवर उपचार सुरू आहेत. सुमारे ११० रुग्णांसाठी हे केंद्र आधार बनू शकेल, असा विश्वास संस्थेचे विश्वस्त डॉ. भरत वाटवानी यांनी एका पत्रकाद्वारे व्यक्त केला आहे.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**DAINIK LOKMAT**
**Mumbai**

**APRIL 2006**

दैनिक लोकमत

मंगळवार, दि. ११ एप्रिल २००६



पुनर्वसन केंद्राच्या नामफलकाचे अनावरण करताना समाजसेवक प्रकाश आमटे. सोबत डॉ. भरत वतवानी, डॉ. स्मिता वतवानी, आदी.

# मनोविकारग्रस्तांसाठी पुनर्वसन केंद्र

**कर्जत, दि. १० (वार्ताहर)** - कर्जत तालुक्यातील वेणगांवनजीक दिशाशून्य अवस्थेतील फिरणाऱ्या मानसिक आजारग्रस्त, मनोविकारग्रस्त निराधारांचे पुनर्वसन करण्यासाठी उभारण्यात आलेल्या श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे उद्‌घाटन प्रकाश आमटे यांच्या हस्ते समारंभपूर्वक करण्यात आले.

डॉ. भरत वतवानी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. एकता समुहाचे संचालक अशोक मोहनानी यांनी प्रास्ताविकात पुनर्वसन केंद्राची माहिती देताना सुरुवातीला या केंद्रामध्ये २७ पुरुष आणि १७ महिला मनोविकारग्रस्त रुग्ण आहेत असे सांगितले. भरत शहा यांनीही मार्गदर्शन केले.

मानवतावादी प्रकाश आमटे यांनी मनोगतात 'सर्वांनी एकत्र येऊन हे केंद्र चांगल्या प्रकारे चालविले पाहिजे' असे स्पष्ट केले. या वेळी आमटे यांच्या हस्ते फीत कापून केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले. नामफलकाचे अनावरणही आमटे यांच्या हस्ते झाले. डॉ. स्मिता वतवानी यांनी आभारप्रदर्शन केले.

याप्रसंगी हेमल कसा, घनश्याम भीमानी, सुभाष पाटील, व्ही. आर. भीमानी, शंभु गुप्ता, रमेश मुंढे, सुधीर खन्ना, जी. जी. शहा, उर्मी शहा, डॉ. हमीर गालना, बंडू मुंढे, दक्षेस पारीख, गजेंद्र गानला, मावळणकर, नामदेव मोरे, वामन बडेकर, रामदास सावंत, वसंत वाडेकर, बबन जाधव, सीताराम शिंदे, लक्ष्मण वाडेकर, मुकुंद कदम, नरेश जैन, अजय वडनप आदींसह वेणगांव परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAKAL**
**Mumbai - Raigad**

**APRIL 2006**

सकाळ

## श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या उद्‌घाटनासाठी प्रकाश आमटे आज कर्जतमध्ये

मुंबई, ता. २९ : श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या नवीन वास्तूचे उद्‌घाटन उद्या (ता. ३०) समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते कर्जत येथे होणार आहे. कर्जत रेल्वे स्टेशनजवळील मौजे वेणगाव येथे नव्या जागेत हे पुनर्वसन केंद्र स्थलांतरीत होत आहे. उद्‌घाटनाचा हा कार्यक्रम सकाळी ११.३० वाजता होणार आहे.

भरकटलेल्यांना दिशा दाखवण्यासाठी भूतदयेने प्रेरित झालेल्या या पुनर्वसन केंद्राने रस्त्यांवर मानसिक आजाराने त्रस्त व निराधार अवस्थेत पडलेल्यांवर उपचार करून त्यांना त्यांच्या घरांपर्यंत पोहोचविले आहे. १९८८ मध्ये श्रद्धा पुनर्वसन केंद्राची स्थापना झाली. डॉ. भरत वातवानी व त्यांचे सहकारी या केंद्राची धुरा सांभाळत आहेत. या केंद्राने आजवर ८०० हून अधिक मानसिकदृष्ट्या आजारी व्यक्तींवर मोफत उपचार करून त्यांना त्यांच्या घरी पाठविले आहे.

सकाळ

मंगळवार, ११ एप्रिल २००६



श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या नामफलकाचे उद्‌घाटन करताना समाजसेवक प्रकाश आमटे. सोबत डॉ. भरत वतवानी, डॉ. स्मिता वतवानी आदी.

## श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे उद्‌घाटन

कर्जत, ता. १० (बातमीदार) : दिशाशून्य अवस्थेत भटकणाऱ्या मनोरुग्णांचे पुनर्वसन करण्यासाठी कर्जत तालुक्यातील वेणगावनजीक उभारण्यात आलेल्या श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे उद्‌घाटन प्रकाश आमटे यांच्या हस्ते करण्यात आले. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन हे केंद्र चांगल्या प्रकारे चालविले पाहिजे, असे मत आमटे यांनी याप्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. भरत वतवानी, एकता समूहाचे संचालक अशोक मोहनानी, डॉ. स्मिता वतवानी, घनश्याम भिमानी, श्रुती चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**RATNAGIRI TIMES**
**Raigad**

**APRIL 2006**

रत्नागिरी टाइम्स
मंगळवार दि. ११ एप्रिल २००६



नामफलकाचे अनावरण करताना समाजसेवक प्रकाश आमटे, सोबत डॉ. भरत वतवानी, डॉ. स्मीता वतनवानी आणि
(छाया: विजय मांडे, कर्जत)

# श्रध्दा पुनर्वसन केंद्राचे प्रकाश आमटे यांच्या हस्ते उद्घाटन

कर्जत, १० एप्रिल (वार्ताहर) - कर्जत तालुक्यातील वेणगावनजिक दिशाशून्य अवस्थेत फिरणाऱ्या मानसीक आजारग्रस्त मनोविकार त्रस्त व निराधारांचे पुनर्वसन करण्यासाठी उभारण्यात आलेल्या 'श्रध्दा पुनर्वसन' केंद्राचे उद्घाटन प्रकाश आमटे यांच्या हस्ते समारंभपुर्वक करण्यात आले.

डॉ. भरत वतवानी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. एकता समुहाचे संचालक अशोक मोहनानी यांनी प्रास्तावीकात पुनर्वसन केंद्राची माहिती देताना सुरुवातीला या केंद्रामध्ये २७ पुरुष मनोविकार त्रस्त रुग्ण आहेत, असे सांगितले. भरत शहा यांनीही मार्गदर्शन केले.

समाजसेवक व मानवतावादी प्रकाश आमटे यांनी आपल्या मनोगतात सर्वांनी एकत्र येवून हे केंद्र चांगल्या प्रकारे चालविले पाहिजे, असे स्पष्ट केले. यावेळी आमटे यांच्या हस्ते फीत कापून केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. नामफलकाचे अनावरणही आमटे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. स्मीता वतवानी यांनी आभार प्रदर्शन केले.याप्रसंगी हेमल कसा घनशाम भिमानी, सुभाष पाटील, व्ही. आर. भिमानी, शंभु गुप्ता, रमेश मुंढे, सुधीर खन्ना, जी. जी. शहा, उर्मी शहा, डॉ. हमीर गाल्ना, बंडु मुंढे, दक्षेस पारीख, गजेंद्र गानला, मावळणकर, नामदेव मोरे, वामन बुडेकर, रामदास सावंत, वसंत वाडेकर, बबन जाधव, सीताराम शिंदे, लक्ष्मण वाडेकर, मुकुंद कदम, नरेश जैन, अजय वडनप, आदिंसह वेणगाव परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**NAVA KAAL**
**Mumbai**

**APRIL 2006**



रविवार

नवाकाळ

मुंबई, २ एप्रिल, २००६


# रस्त्यावर भरकटणाऱ्या मनोरुग्णांसाठी 'श्रद्धा' एक आशेचा किरण!

मुंबई, शनिवार- मनोरुग्ण! व्यावहारिक जगाच्या पलीकडे, स्वत:च्या भावविश्वात रमणारे, समोर कोणीतरी असल्याचा आभास करत बडबडणे, एकच कृती सारखी सारखी करणे या मोजक्या काही मनोरुग्णांच्या समस्या आहेत. रस्त्यावर नकळत नजरेस येणारे हे मनोरुग्ण हे समाजातील उपेक्षित घटक आहेत. बसस्थानक, रेल्वे स्थानक व रस्ते आदी परिसरात हमखास आढळणारे हे मनोरुग्ण स्वत:च्या तंद्रीत मग्न असतात. या मनोरुग्णांना मदतीचा हात दिला. श्रद्धा पुनर्वसन केंद्राने! भारतातील रस्त्यांवर फिरणाऱ्या मनोरुग्णांसाठी वाहून घेतलेल्या या केंद्राच्या फार्मचा उद्घाटन सोहळा गुरुवारी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांचे सुपुत्र डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते पार पडला.



डॉ. भरत वाटवानी व डॉ. स्मिता वाटवानी यांच्या अथक प्रयत्नाने हे श्रद्धा पुनर्वसन केंद्र उभे राहिले आहे. मनोविकार तज्ज्ञ असलेल्या वाटवानी दाम्पत्यांनी या रुग्णांसाठी काही तरी करायचा मनात निर्धार केला होता.

मध्य रेल्वेच्या कर्जत स्थानकापासून २ किमी अंतरावर असणाऱ्या वैनगावात हे पुनर्वसन केंद्र उभे राहिले आहे. १९८८ मध्ये दहिसर येथे दोन मजल्याच्या इमारतीमध्ये सर्वप्रथम श्रद्धा पुनर्वसन केंद्राची सुरुवात झाली. सामाजिक जाणिवेतून सुरुवात झालेल्या केंद्रात अगोदर फक्त ३० रुग्णांची सोय होती. रस्त्यावर फिरणाऱ्या मनोरुग्णांना या केंद्रात आणले जायचे. २ ते ३ महिने औषधोपचार करून त्यांना घरी सोडण्याची व्यवस्था या केंद्रातून विनामूल्य सेवा दिली जायची.

डॉ. वाटवानी दाम्पत्याला अजूनही यापेक्षा मोठे काही तरी करायची इच्छा होती. मित्र परिवार व बँकेच्या सहकार्याने डिसेंबर २००४ मध्ये त्यांनी कर्जत येथील वैनगावात सुमारे साडेसहा एकर जमीन विकत घेतली. मनोरुग्ण स्वबळावर पायावर उभे राहण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या 'आनंदवन'च्या धर्तीवर हे फार्म विकसित करण्याचे डॉ. भरत वाटवानी यांनी ठरविले. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे उद्घाटन झाले. बाबांची आज एक इच्छा या केंद्राद्वारे पूर्ण झाली. बाबांनी कुष्ठरोगी व इतर रुग्णांसाठी बरेच कार्य केले पण मनोरुग्ण मात्र तेवढे राहिले होते, असे डॉ. प्रकाश आमटे भाषणात म्हणाले. वर्ध्याला एका कामानिमित्त आलेले डॉ. भरत वाटवानी हे 'आनंदवन'ला बाबा आमटे यांना भेटण्यासाठी गेले. पण बाबा यावेळी हेमलकासा येथे माझ्याकडे होते. हेमलकासा येथील परिसर पाहून प्रभावित झालेले डॉ. वाटवानी यांनी मनोरुग्णांसाठी असाच उपक्रम करण्याचा निर्धार केल्याचे प्रकाश आमटे यांनी पुढे सांगितले.

> **'स्किझोफ्रेनिया'**
>
> वैद्यकीय परिभाषेत मनोरुग्णाला 'स्किझोफ्रेनियो पेशंट' संबोधले जाते. ज्या रोगामध्ये विचार, भावना व कृती यामध्ये फारकत पडत जाते असा हा मानसिक रोग अशी स्किझोफ्रेनियाची व्याख्या आहे.

## कुक्कुटपालन व शेती

कर्जतच्या जमिनीवर मनोरुग्णांना स्वयंरोजगाराचे साधन म्हणून कुक्कुटपालन, शेती व दुग्धव्यवसाय आदींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बहुतेक रुग्ण ग्रामीण भागातील असल्याचे ते हे सहज शिकतील, असे डॉ. वाटवानी म्हणाले. सध्या या केंद्रात २५ पुरुष व १७ स्त्रिया आहेत. यात बहुतेक महाराष्ट्रातील आहे.

## डॉक्टरांची मेहनत

मनोरुग्णांकडून सहजासहजी माहिती काढणे अवघड असल्याचे येथील निवासी डॉक्टरांनी सांगितले. रस्त्यावर भटकत असणाऱ्या या मनोरुग्णांना येथे आणल्यावर येथे त्यांची स्वच्छता होते. जेवायला दिले जाते. पण सुरुवातीला कधी कधी हे मनोरुग्ण रागात येऊन आमच्यावर हल्लाही करतात. पण नंतर हळूहळू प्रेमाने आम्ही त्यांच्याकडून नाव, पत्ता आदी माहिती काढण्यास सुरुवात करतो. पण यात बराच वेळ जातो.

श्रद्धा पुनर्वसन केंद्रांची त्या रुग्णाला घरच्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी असते. पण हा मनोरुग्ण कधीही पूर्ण माहिती सांगत नाही. कधी जिल्हा तर कधी तालुका! अशा वेळी रुग्णाचे घर शोधणे कठीण असल्याची खंत या निवासी डॉक्टरांनी व्यक्त केली. श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या ताफ्यात चेतन पाटील, डॉ. जिन्टो अब्राहम, ध्रुव बढेकर, अनुप के. के. व जोसी असा अनुभवी सहकाऱ्यांचा समावेश आहे.

श्रद्धा पुनर्वसन केंद्र स्थापन झाल्यापासून आजपर्यंत ८०० मनोरुग्णांना त्यांच्या घरी सुखरूप पोहोचविले आहे. समाजात मनोरुग्णांकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे मदतीचा ओघही कमी असल्याचे डॉ. वाटवानी यांनी सांगितले. तुम्हाला कोणा मनोरुग्णाला जर श्रद्धा केंद्रात आणायचे असेल किंवा आर्थिक मदत करायची असेल तर पुढील पत्त्यावर संपर्क साधू शकता.


श्रद्धा पुनर्वसन केंद्र
वैनगाव, कर्जत (पू.).
मोबाईल- ९८५०६८१७८१, ९२२६२२७११४
कार्यालय श्रद्धा मानसरोवर
ऑफ न्यू लिंक रोड,
बोरिवली (प.)-४००१०३
दूरध्वनी- ९८९२५९३४३७
२८९५५०२०/ २८९१५४५१
५५७३९२६९/५६८५२६२८

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**RATNAGIRI TIMES**
**Raigad**

**JANUARY 2008**






सोमवार दि. २८ जानेवारी २००८

# खोपोलीत मनोरुग्णांच्या मदतीसाठी तरुणाई रॅम्पवर थिरकली

खोपोली, २७ जाने. (प्रवीण जाधव) - ...

खोपोलीत काल २६ जानेवारीला श्रध्दा पुनर्वसन केंद्र (वणेगाव) कर्जत या मनोरुग्णांच्या मदतीसाठी खोपोलीतील तरुणांच्या ग्रुपने एक कार्यक्रम करीत त्यातून मिळालेला नफा रु. ५५५५५/- रु. संस्थेच्या अध्यक्षांना सुपूर्द केले. माजी नगराध्यक्ष सुनिल पाटील यांचे हस्ते मदत स्वीकारताना संस्थेचे अध्यक्ष डॉ. भरत वाटवानी हे दिसत असून सोबत सर्व मदतगार तरुण दिसत आहेत. (छाया : प्रवीण जाधव)

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**ANAND NAGARI**
**Jalna**

**NOVEMBER 2010**

दैनिक
# आनंद नगरी

गुरुवार, ४ नोव्हेंबर २०१० पान ८

## माणूसपण हरवलेल्यांचा शोध घेणारी 'श्रध्दा'

**अच्युत मोरे**

**जालना–** शहरातील रस्त्यांवर कळकट किंवा फाटकेतुटके कपडे अंगावर असलेली व्यक्ती दिसली तर तिच्याकडे न बघता वाट वाकडी करून जाणे, हीच जगाची रीत आहे. परंतु, मुंबई येथील 'श्रध्दा रिहॅबिलिटेशन फाऊंडेशन' ही संस्था मात्र अशा फाटक्या मनोरुग्णांकडे जाऊन मदतीचा हात पुढे करीत मानवतेचा संदेश देत आहे.


मनोरुग्ण अवस्थेत — उपचारानंतर परिवारासोबत

धावपळीच्या युगात चांगल्या माणसासोबत दोन गोष्टी बोलायला कुणाला वेळ नसतो, त्यात मनोरुग्णांना कोण विचारणार? परंतु, मुंबईचे समाजसेवक डॉ. भरत वटवानी व त्यांच्या पत्नी डॉ. स्मिता वटवानी यांनी मनोरुग्णांना शोधून त्यांच्यावर उपचार करून त्यांना त्यांच्या गावी सोडण्याचे काम हाती घेतले आहे. देशात कुठेही मनोरुग्ण रस्त्यावरून फिरतांना दिसला तर त्याला मदतीचा हात देऊन माणसात आणण्याचे काम श्रध्दा फाऊंडेशनच्या वतीने करण्यात येते. गेल्या २२ वर्षांपासून डॉ. भरत वटवानी व त्यांच्या पत्नी डॉ. स्मिता वटवानी सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत.

चांगल्या माणसांची सेवा करणारे आपल्याला पाहायला मिळतात. परंतु, मनोरुग्णांकडे कुणीही लक्ष देत नाही. अशा मनोरुग्णास दोन घासांऐवजी मार मात्र हमखास मिळतो. हे विदारक दृष्य वटवानी परिवाराला पाहवेना. म्हणून त्यांनी सहा वर्षांपूर्वी वेनगाव, कर्जत, जि. रायगड येथे श्रध्दा रिहॅबिलिटेशन फाऊंडेशनची स्थापना केली.




मनोरुग्ण अवस्थेत — उपचारानंतर परिवारासोबत

या फाऊंडेशनच्या माध्यमातून मनोरुग्णास संस्थेत आणले जाते व त्यांच्यावर उपचार करून त्यास पुन्हा गावी सोडले जाते. फाऊंडेशनच्या स्थापनेपासून डिसेंबर २००९ पर्यंत १ हजार ५०० रुग्णांवर उपचार करून त्यांना गावी नेऊन सोडण्यात आले आहे. तर जानेवारी २०१० पासून ऑक्टोबर २०१० पर्यंत २०२ मनोरुग्णांवर उपचार त्यांनी केले आहेत. रुग्णांची सेवा करण्यासाठी डॉ. वटवानी दाम्पत्यासह इतर दोन निवासी डॉक्टर व १० सामाजिक कार्यकर्ते कार्यरत आहेत. ज्या ठिकाणी मनोरुग्णांची संख्या जास्त असेल तेथे जनजागृती करून मनोरुग्णांवर उपचार करण्यास प्रवृत्त केले जाते. या संस्थेत केवळ अनाथ मनोरुग्णांवरच उपचार केले जातात. ज्या मनोरुग्णांचे नातेवाईक आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, त्यांना मात्र इथे प्रवेश दिला जात नाही. या ठिकाणी केवळ अनाथ व गरीब व्यक्तींनाच प्रवेश देऊन कपडे, जेवण व वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. त्यामुळे ज्यांचे या जगात कुणी नाही, त्यांची 'श्रध्दा' आहे, असे म्हटले जाते. मानवी जन्म मिळूनसुद्धा मुक्या प्राण्यांपेक्षाही हीन जीवन जगणाऱ्या व्यक्तींना किंवा मनोरुग्णांना श्रध्दा फाऊंडेशन माणूस म्हणून जगण्याची उमेद देत आहे. श्रध्दा फाऊंडेशनच्या वतीने वेनगाव, कर्जत, जि. रायगड व बोरीवली, मुंबई–०२२–२८९५५०२०, ६५८५२६२८ येथे मनोरुग्णांवर विनामूल्य उपचार केले जातात. या अभिनंदनीय कार्याबद्दल सर्वच स्तरातून श्रध्दा फाऊंडेशनचे कौतुक होत आहे.

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**DIVYA MARATHI Jalgaon**

**JANUARY 2015**


दैनिक
दिव्य मराठी
दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र
yamarathi.com जळगाव शनिवार, २४ जानेवारी २०१५


# दीड वर्षांनी मनोरुग्ण युवकाची कुटुंबीयांसोबत गाठभेट

## कर्जत येथील श्रद्धा फाउंडेशनचा पुढाकार

संदीप जोशी | मुक्ताईनगर



दीड वर्षांपासून बेपत्ता झालेल्या रुईखेडा येथील मनोरुग्ण युवकाची अखेर गुरुवारी आपल्या कुटुंबीयांसोबत भेट घडून आली. कर्जत (जि. रायगड) येथील श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशनच्या संस्थेने घेतलेल्या पुढाकारामुळे मनोरुग्ण युवकाचा चेन्नई ते मुक्ताईनगर असा प्रवास पूर्ण झाला. तालुक्यातील रुईखेडा येथील किसन शेकोकार दीड वर्षांपूर्वी सावदा येथे विवाहसोहळ्यासाठी आले होते. सोबत त्यांनी आपला मनोरुग्ण मुलगा प्रमोद शेकोकार (वय ३५) यालाही नेले होते. मात्र, लग्नाच्या गर्दीत प्रमोद बेपत्ता झाला होता. बराच शोध घेऊनही तो न सापडल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली होती. अखेर श्रद्धा फाउंडेशनच्या पुढाकाराने गुरुवारी त्याची कुटुंबीयांसोबत भेट घडून आली.

## प्रमोदचा सावदा ते चेन्नई रेल्वे प्रवास

सावदा येथे लग्नाच्या गर्दीतून प्रमोदने थेट सावदा रेल्वेस्थानक गाठले. तेथून रेल्वेने प्रमोद थेट चेन्नई येथे पोहोचला. चेन्नई रेल्वेस्थानकाच्या परिसरात फिरत असताना 'हेल्पिंग हॅण्ड' या एनजीओच्या पदाधिकाऱ्यांनी त्याला आपल्या संस्थेत नेले. या संस्थेत प्रमोदवर सुमारे वर्षभर औषधोपचार करण्यात आला. दोन महिन्यांपूर्वी प्रमोदला कर्जत येथील श्रद्धा फाउंडेशनच्या मनोरुग्ण पुनर्वसन केंद्राकडे सोपवण्यात आले. फाउंडेशनमध्येही प्रमोदवर दोन महिने उपचार करण्यात आले. औषधोपचारानंतर प्रमोद बरा झाला. त्यानंतर त्याने आपल्या घराचा पत्ता संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना सांगितला. त्यानुसार फाउंडेशनचे पदाधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते चेतन दिवाण यांनी प्रमोदला घेऊन मुक्ताईनगर पोलिस ठाणे गाठले.

## संस्थेची पार्श्वभूमी अशी

कर्जत येथील श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशन ही मनोरुग्णांची मोफत सेवा आणि औषधोपचार करणारी संस्था आहे. डॉ. भरत वटवाणी व डॉ. स्मिता वटवाणी यांनी रायगड येथे साडेसहा एकर जागेवर मनोरुग्णांसाठी हे पुनर्वसन केंद्र सुरू केले आहे. कुठल्याही शासकीय अनुदानाशिवाय केवळ दानशूरांच्या मदतीवर संस्थेचे कार्य चालते. आजपर्यंत देशभरातील सुमारे चार हजार मनोरुग्णांवर औषधोपचार करून संस्थेतर्फे घरी सोडण्यात आले आहे.

## ४५ भाविक कार्यकर्ते

मुंबई येथील श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशनच्या कर्जत येथील मनोरुग्ण पुनर्वसन केंद्रात ४५ भाविक कार्यकर्ते काम करतात. या ठिकाणी आलेला मनोरुग्ण पूर्णपणे बरा झाल्यानंतर त्याला कुटुंबीयांकडे सोपवले जाते. गुरुवारीच मुक्ताईनगरसह मूर्तिजापूर, वर्धा, केळीगव्हाण (ता.जालना) येथील रुग्णांनाही घरी सोडण्यात आले आहे. चेतन दिवाण, सामाजिक कार्यकर्ते, कर्जत

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**SAMNA**

**DECEMBER 2015**

UNIVERSAL EDITION
सामना
सर्वांसाठी सर्वकाही

जगातील सर्वाधिक चर्चिले जाणारे एकमेव वृत्तपत्र

Thursday, December 17th, 2015

संस्थापक संपादक : बाळ ठाकरे | संपादक : उध्दव ठाकरे | कार्यकारी संपादक : संजय राऊत



# मनोरुग्णांना ‘श्रद्धा’चा मदतीचा हात!

**मुंबई**

पोलिसी बळाच्या जोरावर गोरगरीबांच्या घरांवर बुलडोझर

कश्मीर टेररिस्ट नव्हे, टुरिस्ट स्पॉट झालेले त्यांना पाहायचे होते!

शेतकऱ्यांच्या वेदनेवर शिवसेनेची फुंकर

गरीबांवरील शस्त्रक्रियेसाठी तारीख पे तारीख

**पुणे**

वैचारिक संघर्ष करा; पण सुडाचे राजकारण नको

रेसकोर्सवर राष्ट्रवादीचे ‘पॉवर’ प्रदर्शन

सेवासदन संस्थेतील ५१ मुलींना विषबाधा

निवडणुकीमुळे उत्तम साहित्यिक संमेलनाध्यक्षपदापासून दूर

कराड, दि. १७ (सा. वा.) – आप्तेष्टांनी नाकारलेले किंवा बेपत्ता झालेले मनोरुग्ण गावागावांत पाहायला मिळतात. या मनोरुग्णांना मदतीची गरज असताना समाज मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. रस्तोरस्ती, दारोदार भटकून हे मनोरुग्ण आपले पोट भरतात. कचऱ्याच्या पेटीत खाद्य शोधतात. कुणी आपुलकीने दिलेच तर ते चार घास पोटात घालून रस्त्यावरच दिवस-रात्र काढतात. अशा मनोरुग्णांना ‘श्रद्धा रिहॅबिलिटेशन फौंडेशन’ने मदतीचा हात दिला आहे.

‘श्रद्धा फौंडेशन’ या स्वयंसेवी संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी ॲम्ब्युलन्ससह कराडमध्ये फिरून पाच महिला व सात मनोरुग्ण पुरुषांना ताब्यात घेतले. उपचार व पुनर्वसनासाठी त्यांना कर्जत येथील श्रद्धा रिहॅबिलिटेशन फौंडेशन येथे नेण्यात आले आहे. कर्मचारी सकाळपासून शहरातील रस्त्यांवर फिरून मनोरुग्णांची माहिती घेत होते. मनोरुग्ण जेथे आहेत त्या ठिकाणी जाऊन त्यांना ताब्यात घेतले. शहरातून बारा मनोरुग्ण घेऊन सायंकाळी रुग्णवाहिका कर्जतला रवाना झाली.

श्रद्धा रिहॅबिलिटेशन फौंडेशनच्या टीममध्ये सामाजिक कार्यकर्ते चेतन दिवाण, समाधान पालकर, सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा राठी असून, यांना अनेक भाषा अवगत असल्याने वेगवेगळ्या भागांतून आणलेल्या रुग्णांवर उपचार करणे सोपे जाते.

## उद्योजक देसाई यांची देणगी

कराडमधील उद्योजक दत्ता देसाई यांना श्रद्धा फौंडेशनच्या कार्याविषयी ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश आमटे यांच्याकडून माहिती मिळाली होती. देसाई यांनी पुनर्वसन केंद्राला भेट देऊन अडीच लाख रुपयांची देणगी दिली. श्रद्धा फौंडेशनने कराडमधील रस्त्यांवर भटकत फिरणाऱ्या मनोरुग्णांवर उपचार करावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## संपूर्ण उपचार मोफत

कर्जत (जि. रायगड) येथे साडेसहा एकर क्षेत्रात विस्तारलेल्या ‘श्रद्धा रिहॅबिलिटेशन फौंडेशन’ या पुनर्वसन केंद्राची स्थापना डॉ. भरत वाटवाणी व डॉ. स्मिता वाटवाणी यांनी २००६ मध्ये केली आहे. त्यापूर्वीही त्यांच्याकडून सन १९८८ पासून मनोरुग्णांवर उपचार करण्याचे काम सुरू होते. येथे सर्व उपचार मोफत करण्यात येतात, तसेच उपचारानंतर रुग्णांना त्यांच्या घरी पोहोचविण्यात येते.

# MAHARASHTRA News

MARATHI

MAHARASHTA TIMES
Mumbai

MARCH 2016

maharashtratimes.com | www.mtonline.in

मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र

# महाराष्ट्र टाइम्स

नोंदणी क्र. एमसीएस/०६३/२०१५-१७. आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ९२४९/६२.

मुंबई। मंगळवार, २२ मार्च २०१६ । पाने १२ + मुंबई टाइम्स। शहर आवृत्ती *। ₹ ४.०० किंवा ७.०० द टाइम्स ऑफ इंडियासहित



## आगळी वेगळी 'घरवापसी'!

■ डॉ. शुभा थत्ते

**स्क्रिझोफ्रेनिया झालेल्या रुग्णांना अनेकदा ना घरच्यांचा आधार मिळत, ना समाजाचा. अन्न, ठिकाणाच्या शोधामध्येही मंडळी दारोदार, रस्त्यांवर भटकत असतात. अशा मंडळींना आधार देण्याचे काम श्रद्धा पुनर्वसन केंद्र गेली ११ वर्षे करत आहे. डॉ. भरत व डॉ. स्मिता वाटवानी या केंद्राच्या माध्यमातून करत असलेल्या रुग्णसेवेविषयी...**







ही राजकारणातली 'घरवापसी' नव्हे तर गंभीर मानसिक आजारामुळे घरदाराला मुकलेल्या रुग्णांना त्यांच्या मुलामाणसांकडे पोहोचविणे, हे विस्मयजनक काम करत आहेत डॉ. भरत व डॉ. स्मिता वाटवानी. हे सायकॅट्रिस्ट जोडपे. तेही गेली तब्बल ११ वर्षे! त्यापूर्वी १९८८ साली त्यांनी दहिसर येथे कामाला सुरुवात केली होती पण. नंतर २००४ साली रुग्णसेवेत आयुष्य घालवलेल्या बाबा आमटे यांच्याशी चर्चा करून त्यांच्या आशीर्वादाने कर्जत येथे काम सुरू केले. आपण रस्त्यावर भटकणारी, केसांच्या जटा झालेली, फाटकेतुटके कपडे घातलेली तर काही वेळा ठार नागडी असणारी, कचरा विचकून खाण्यासाठी काही मिळेल का, हे शोधत असणारी माणसे पहातो . बहुतांशी लोक नाकाला रुमाल लावून, कपाळाला आठ्या घालून दूर होतात. पण त्या माणसांना त्याचे काही भानही नसते. कारण ती त्यांच्या जगातच वावरत असतात. स्किझोफ्रेनिया या गंभीर आजारामुळे व त्यावर औषधोपचार न झाल्यामुळे छिन्नविछिन्न झालेल्या या व्यक्ती असतात. त्यांनाही जवळची मायेची माणसे, आईबाप, भावंडे असतात. पण, आजारामुळे भान न राहून दिसेल त्या वाहनात बसून घरापासून दूर भटकत जातात, कोणी दिले तर खातात, नाहीतर कचराकुंड्यांत शोधतात. अशा माणसांची कोणी माहिती दिल्यास श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी, स्वयंसेवक येऊन त्याच्या व्हॅनमध्ये घालून कर्जत येथील त्यांच्या केंद्रावर घेऊन जातात. त्यांची स्वच्छता करून औषधे सुरू करतात. साधारण महिन्याने तो माणसात आला की त्यांच्याकडे काम करणारे सोशल वर्कमध्ये पदवी असणारे कर्मचारी त्याचा पत्ता शोधून पत्रव्यवहार करतात व स्वखर्चाने त्याला त्याच्या घरी पोचवितात. हे सगळे प्रयत्न खरोखर थक्क करणारे आहेत. हे सर्व एवढ्यावरच थांबत नाही तर त्या गावातील माणसांना एकत्र करून चित्राद्वारे हा कसा आजार आहे व तो औषधाने आटोक्यात येऊ शकतो, हा महत्त्वाचा संदेश दिला जातो. भारतातील आरोग्यव्यवस्था इतकी प्राथमिक अवस्थेत आहे की अशा रुग्णांना उपचारासाठी कित्येक ठिकाणी जवळजवळ १०० किमीपर्यंत मदत उपलब्ध नसते. या आजाराचे प्रामाण १ टक्का इतके आहे म्हणजे भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात किती रुग्ण असतील, याची कल्पना करा आणि त्याबद्दल इतकी अनास्था! कित्येक गावांमध्ये असा काही आजार असतो, याची जाणिवही नसते. त्यामुळे आजाराला सुरुवात होऊन ती व्यक्ती विचित्रपणे वागू लागली की इतर बुवा, जादूटोणा उपायांना सुरुवात होते व त्यामुळे फरक न पडल्याने त्याला वाळीत टाकल्यासारखेच केले जाते. अशीच ही माणसे घरापासून दूर भटकत रहातात. श्रद्धा पुनर्वसन केंद्राकडून रुग्णाच्या घरच्या मंडळींना गोळ्या कशा द्यायच्या, हेही शिकवले जाते. घर सोडल्यापासून त्याच्यात झालेला लक्षवेधक बदल दिसत असल्याने घरची माणसे औषधांच्या बाबतीत जागरूक रहातात. पुढील २ वर्षे त्या रुग्णांचे औषधांचे पार्सल दर दोन महिन्यांनी नियमितपणे येत रहाते व रुग्णात होणारा बदल सातत्याने दिसत असल्याने हा आजार आटोक्यात येऊ शकतो, यावरचा कुटुंबाचाच नव्हे तर गावाचा विश्वास वाढतो. मानसिक आरोग्य क्षेत्रामधली ही किती भरीव कामगिरी व तीही कोणताही गाजावाजा न करता, बडेजाव न मिरवता!

कर्जत येथील या पुनर्वसन केंद्राला भेट देताना जी गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे तेथील कार्यकर्त्यांची कामाची बांधिलकी! अतिशय तुटपुंज्या मदतीवर चालणाऱ्या या केंद्रामध्ये २४ सोशल वर्कची पदवी असणारे कार्यकर्ते आहेत. ते जाणिवपूर्वक वेगवेगळ्या प्रांतातील आहेत, ज्यायोगे रुग्णांना त्यांच्या घरी पोहोचवताना मदत होते. त्याशिवाय २० जणांची टीम, २ निवासी डॉक्टर व ७/८ रुग्ण असे आहेत की त्यांच्या कुटुंबाचा शोध न लागल्याने किंवा त्यांनी स्वीकार करण्यास नकार दिल्याने त्यांना तिथे सामावून घेतले आहे. ते इतर कामांमध्ये मदत करतात. एकावेळी तिथे सुमारे ३० ते ४० स्त्रिया व ८०ते १०० पुरुष असतात. त्यांना वेळच्यावेळी औषधे देणे, नाश्ता, जेवण, स्वच्छतेकडे व सुरक्षिततेकडे लक्ष ठेवणे या सर्व गोष्टी येथील कर्मचारी मोठ्या मायेने करतात. स्वत: डॉ. भरत त्यांच्या बोरीवलीच्या घर व हॉस्पिटल येथून आठवड्यातून २ वेळा केंद्रात जाऊन रुग्णांना तपासतात व घरी पाठवण्याजोगे झाले आहेत का ते ठरवतात. तेथे भाजीपाला लावला आहे व २५ गायीही ठेवलेल्या आहेत कारण येणारे बहुसंख्य रुग्ण अगदी लहान खेडेगावातील असल्याने त्यांना या कामाची माहिती व त्यात रस असतो व ते ही कामे करू लागतात. आम्ही गेलो त्या दिवशी ३ रुग्ण आपापल्या गावी परतणार होते. संस्थेचे काम माहीत असल्याने लोक रस्त्यावर हिंडणारी अशी व्यक्ती दिसल्यास फोन करून कळवितात. पण आपणहून मनाने अशा कामासाठी कोणी पैसे किंवा वस्तूरूपाने मदत करत नाही. त्यांचा तिथे असतानाचा खर्च व नंतर २ वर्षांची औषधे याबद्दल डॉ. भरत यांना विचारता ते म्हणाले, घरवापसीच्यावेळी त्यांच्या कुटुंबाचा मिळणारा दुवा हीच मिळकत. कारण बहुतेक सर्व कुटुंबांकडे त्याचे पोट भरण्याइतकीही साधने नसतात. गेल्या ९ वर्षांत श्रद्धा पुनर्वसन केंद्राने सुमारे ५००० स्त्रीपुरुषांना आपल्या माणसांकडे पोहोचविले आहे. या ५००० लोकांमधील बहुसंख्य अगदी लहान गावांमधून आलेली व भारताच्या सर्व प्रांतातून आलेली दिसली. अगदी झारखंड, ओरिसा, बांगलादेश व १ इराणचाही! तेथे खरी आंतरभारती होती. टाटा पॉवर, सेल ( Steel Authority of India Ltd. ) यासारख्या काही कंपनी, मंडळींनी व तेथील निवासी जागा बांधण्यासाठी काही दानशूर लोकांनी देणगी दिलेली दिसली. पण एकंदर सर्व व्यवस्था एखाद्या आश्रमासारखी, केवळ गरजा भागण्यापुरता खर्च अशी दिसली. कायमस्वरूपी राहण्यासाठी स्किझोफ्रेनिक रुग्णांसाठी काही बांधण्याचा विचार आहे का, हे विचारताच डॉ. भरत म्हणाले की शारीरिक व्यंगाच्या व्यक्तीला कुटुंब घरातच आसरा देते ना? मग मानसिक आजार असलेल्या मंडळींचा योग्य तो सांभाळ करणे ही त्या कुटुंबाची व आजुबाजूच्या समाजाची जबाबदारी आहे. कारण सध्या उपलब्ध असलेल्या औषधांनी आजार बराच आटोक्यात येतो. समाजापासून त्यांना दूर ठेवले तर मध्ययुगातील मनोरुग्णालयांपासून आपण काय प्रगती केली ?

असा हा आगळावेगळा सेवाभावी आश्रम. एकदा जरूर जाऊन पहाण्यासारखा व आपल्यापरीने होईल तितकी मदत करण्याजोगा. (देवस्थानांना देणगी देण्यापेक्षा खचितच) कारण हे खरे सत्पात्री दान होईल.

**संस्थेबद्दल अधिक माहितीसाठी वेबसाइट** : www.shraddharehabilitationfoundation.org

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**DIVYA MARATHI Nasik**

**APRIL 2018**

दैनिक दिव्य मराठी

22-Apr-2018
नाशिक सिटी Page 8

समाजभान | श्रद्धा फाउंडेशनच्या स्वयंसेवकांचे महत्कार्य; वर्षभरापासून प्रतीक्षेत असलेल्या बिहारमधील कुटुंबीयांच्या भावना अनावर

# दोन महिने रस्त्यावर पडून, 'श्रद्धा'मुळे सापडले घर

प्रतिनिधी । नाशिक

शबनम अवघ्या तिशीतील तरुणी.. बिहारमधील पाटणा जिल्ह्यातील रहिवासी... नातेवाईकांकडे जाते असे सांगून घरातुन निघाली ती घरी परतलीच नाही. घरात एकुलती एक बहीण एकाएकी दिसेनाशी झाल्याने तिचे तिघे भाऊ सैरावैरा शोध घेत होते. पोलिसांत तक्रार दिली. वर्तमानपत्रात बातम्या दिल्या. मात्र तिचा शोध काही लागेना...दुसरीकडे शबनम बिघडलेल्या मानसिक स्थितीत देवळाली कॅम्पच्या रस्त्यावर राहत होती. तिची अवस्था अक्षरश: भटक्या जनावरासारखी झाली होती. काही स्वयंसेवकांच्या निदर्शनास ही बाब आली अन् त्यांनी याबाबत कर्जतच्या श्रद्धा फाउंडेशनला ही बाब कळवून तिच्यावर उपचार केले. डोळ्यात तेल घालून शबनमच्या प्रतीक्षेत असलेल्या तिच्या कुटुंबीयांच्या भावना तिला बघून अनावर झाल्या.

देवळाली कॅम्प परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून एक तरुणी रस्त्यावर बेवारस अवस्थेत असल्याचे परिसरातील रहिवाशांच्या लक्षात आले. मानसिक संतुलन ढासळलेले असल्याने त्या मुलीला बोलताही येत नव्हते. त्यामुळे तिला तिच्या घरापर्यंत कसे पोहोचवावे असा प्रश्न होता. कॅम्प परिसरात राहणारे मनप्रितसिंग लांबा ऊर्फ बॉबी आणि निम्मी सुधा सिंग यांनी तिला जवळपास महिनाभर जेवण-खावण दिले. त्यानंतर मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या सुलक्षणा आहेर या दोघांनी संपर्क साधला.

सुलक्षणा व हितेश बनसोडे यांनी पुण्यातील बापूसाहेब दगडे पाटील यांच्याशी संपर्क साधून रुग्णवाहिकेची मदत घेतली. तेथून पुढे मुंबईतील श्रद्धा फाऊंडेशनमध्ये या मुलीला त्याच रात्री उपचारार्थ नेण्यात आले. तेथे मानसोपचारतज्ज्ञांनी तिच्यावर उपचार केल्यावर ती हळूहळू बोलू लागली. तोडक्या-मोडक्या हिंदीत तिने तिचे नाव शबनम सांगितले. तिच्या घराचा पत्ताही सांगितला. मात्र, ती घरातुन बाहेर कशी पडली आणि नाशिकमध्ये कशी आली याबाबत मात्र तिला काहीही आठवत नाही.



देवळाली कॅम्प परिसरातील रस्त्यावर बसलेल्या शबनमची विचारपूस करताना श्रद्धा फाऊंडेशनची स्वयंसेविका.



आईशी भेटण्याचा भावनिक क्षण.

## तिच्या आगमनाचा क्षण अन् आनंदाश्रूंचे संमेलन

शबनमवर महिनाभर उपचार करु बिहारमधील मांजरा या गावी स्वयंसेवकां तिला नेले. तिकडे मांजरा गावी शबनमचं आई, तिन्ही भाऊ डोळ्यांत तेल घालून तिचं वाट बघत होते. देवांकडे तिच्यासाठी नवर करण्यात आले होते. श्रद्धाच्या स्वयंसेवव शबनमला घेऊन तिच्या घरी पोहचलं तेव्हा अक्षरश: तिची आई, 'भावांनी हंबरड फोडला. वर्षभरानंतर ती घरी परतल्यामुळं सर्वांनाच आनंदाश्रू अनावर झाले होते मोठ्या प्रतीक्षेनंतर घर पुन्हा मिळाल्यां शबनलाही भावना अनावर झाल्या होत्या श्रद्धा फाउंडेशनचे स्वयंसेवक हे य कुटुंबासाठी देवदूत बनून आले होते. त्यामुळं त्यांनी या स्वयंसेवकांसह श्रद्धाचे संस्थापव डॉ. भरत वाटवाने यांचे आभार मानले.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAKAL**
**Nasik**

**APRIL 2018**

सकाळ

Nashik, 22 April, 2018

# पोटच्या पोरीला पाहून फोडला हंबरडा...

काही सुखद

## नाशिकला सापडलेल्या मनोयात्री परविनाची दोन वर्षांनी बिहारमध्ये घरवापसी

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २० : नाशिक रोड रेल्वेस्थानकाच्या परिसरात बऱ्याच दिवसांपासून कचराकुंडीच्या आसपास भटकणाऱ्या मनोरुग्ण तरुणीकडे एकजण सर्वांसारखे पाहून दुर्लक्ष करू शकला नाही. त्याने कोल्हापुरातील पेर्नोली (ता. आजरा) येथील माणुसकी फाउंडेशनच्या अमित प्रभा वसंत यांना दूरध्वनी करून तिची माहिती दिली. त्यानंतर व्यक्ती व सुहृद व्यक्तींच्या समन्वयातून दोन वर्षांपूर्वी बेपत्ता झालेली तरुणी बरी होऊन १० एप्रिलला बिहारमधील तिच्या घरी सुखरूप पोचली.

अमित यांनी नाशिकच्या कार्यकर्त्या सुलक्षणा आहेर यांना ६ फेब्रुवारीला दूरध्वनीद्वारे तिची माहिती दिली. त्याचसोबत खर्चासाठी थोड्याफार पैशांची तजवीज करून, कर्जतचे प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. भरत वाटवाणी यांच्या श्रद्धा फाउंडेशनमध्ये उपचारांची व्यवस्था केली. सुलक्षणा आहेर यांनी फक्त आपले 'परविना' हे नाव सांगणाऱ्या तरुणीला ताब्यात घेऊन पुढचे दोन दिवस तिची देखभाल केली. दरम्यान, नाशिकचे नागरिक बापूसाहेब दगडे यांनी रुग्णवाहिकेची व्यवस्था करून दिल्याने तिला ८ फेब्रुवारीला कर्जत येथे उपचारांसाठी दाखल केले.

स्किझोफ्रेनियाचे निदान झालेल्या 'परविना'ने दोन महिन्यांच्या यशस्वी उपचारांनंतर आपले खरे नाव 'रिझवाना अन्सारी' व बिहारच्या पाटणा जिल्ह्यापासून आठ किलोमीटरवरील मेवेर या गावाची असल्याचे सांगितले.



पटना (बिहार) : नाशिकमध्ये सापडलेल्या परविना तथा रिझवना कुटुंबियांसह. उजवीकडून श्रद्धा फाऊंडेशनच्या फरझाना, रिझवाना आई जरिना खातून व कुटुंबीय.

तीन वर्षांपूर्वी एका विदुराशी झालेल्या लग्नानंतर दिल्लीत सासरच्या कौटुंबिक वादातून मनावर परिणाम झाल्याने रिझवाना माहेरी आली होती. माहेरी उपचार सुरू असताना एका नातेवाइकाच्या घरून ती अचानक बेपत्ता झाली. पाटणा पोलिसांत तक्रार दिल्यानंतर काही दिवसांनी हताश कुटुंबीयांनी तिला अल्लाहच्या भरवशावर सोडून शोध थांबविला. मात्र तिला अनपेक्षितरीत्या नाशिकमधून बिहारच्या कुटुंबात सुखरूप पोचविण्यात १० एप्रिलला कोल्हापूरचे माणुसकी फाउंडेशन, नाशिकची अनाथांची आधार संस्था व कर्जतचे श्रद्धा फाउंडेशन या सामाजिक संस्था यशस्वी ठरल्या. दोन वर्षांपूर्वी बेपत्ता झालेल्या मुलीला सुखरूप घरी परतलेली पाहून आई जरीना खातून व वडील मोहम्मद अन्सारी यांनी तिला कवटाळून हंबरडा फोडला.

“ आमची संस्था दहा वर्षांपासून भटक्या मनोविकारग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी काम करते. या रुग्णांना मनोरुग्ण म्हणणे बरेचसे अमानवीय आहे. सर्व प्रकारच्या प्रलोभनांपासून मुक्त झालेल्या या 'मनोयात्रीं'कडे समाजाने जबाबदारीने पाहण्याची आवश्यकता आहे.



-**अमित प्रभा वसंत**, माणुसकी फाउंडेशन, कोल्हापूर

“ दोन वर्षांनंतर आपल्या कुटुंबात रिझवानाला पोचवून समाधान मिळाले. दोन वर्षांत मुलीला काय काय सहन करावे लागले असेल हा तिच्या कुटुंबीयांचा प्रश्न अनुत्तरित करणारा होता.

-**फरझाना अन्सारी**, श्रद्धा फाउंडेशन, कर्जत

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**PUDHARI**
**Raigad**

**JULY 2018**

www.pudhari.com

स्थापना १९३९

पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

रायगड

रविवार, २९ जुलै २०१८ । स्थापना वर्षे ८० । मुंबई आवृत्ती वर्ष १० वे । मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोल

# दुभंगलेल्या मनांना जोडणारा मनोरुग्णांचा मित्र डॉ. भरत वाटवानी




कर्जत पासून जवळच असलेल्या वेणगाव येथे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. भरत वाटवानी यांनी रस्त्यावर भटकणाऱ्या निराधार मनोरुग्णांवर उपचार करण्यासाठी १९८८ मध्ये श्रद्धा पुनर्वसन केंद सुरु केले. सुरवातीस अवघ्या २० मनोरुग्णांवर उपचार करणाऱ्या केंद्राची व्याप्ती वाढत जाऊन २०१७ पर्यंत देशभरातील ९०४२ मनोरुणांवर उपचार करून त्यापैकी ७ हजारापेक्षा जास्त रुग्णांना बरे करून त्यांच्या कुटुंबीयांचा शोध घेऊन त्यांच्या स्वाधीन करण्यात यशस्वी झाले आहेत. त्यांच्या या समाजाप्रती असलेल्या भव्य कार्याची दखल घेऊन त्यांना रेमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झाला असल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरु आहे.

**हेमंत देशमुख, कर्जत**

सुमारे तीस वर्षा पूर्वी डॉ. भरत वाटवानी आणि त्यांची पत्नी यांना एक व्यक्ती वडापाव खाल्ल्यानंतर रस्त्यावर पडलेल्या नारळाच्या करवंटीत नाल्यामधील पाणी पितांना दिसून आला. ते दृश्य पाहून डॉ. भरत वाटवानी यांचे मन हेलावले. त्यांनी त्वरित त्या मनोरुग्णाची भेट घेऊन त्याला स्वतः बरोबर येण्यास राजी केले. आणि त्याच्यावर उपचार करत त्याला सहा महिन्यात बरे केले. आणि तेथूनच त्यांच्या कामाला खऱ्या अर्थाने सुरवात झाली. याच दरम्यान डॉ. भरत वाटवानी यांनी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांची आनंदभुवन येथे भेट घ्यायचे ठरवले. आणि ते प्रवासाला निघाले. मात्र आनंदभुवन येथे पोहोचले असता बाबा आमटे हेमलकसा येथे असल्याचे समजले. त्यामुळे डॉ. वाटवानी हे त्याच सायंकाळी पुढच्या प्रवासाला निघाले . त्याच वेळेस रस्त्यात एक साखळ दंड बांधलेला माणूस दिसला. डॉ. वाटवानी यांनी सुरवातीस तशीच गाडी पुढे नेली मात्र नेहमीच दुसऱ्यांच्या सहवेदना जाणून घेणाऱ्या वाटवानी यांनी गाडी परत फिरवून त्या मनोरुग्णाला आपल्या गाडीत बसविले आणि हेमलकसाला गेले. तेथे बाबा आमटे आणि त्यांचा मुलगा प्रकाश आमटे यांची भेट घेतली. आणि बरोबर गाडीत बसवून आणलेल्या मनोरुग्णाचे साखळ दंड तोडून टाकण्यास मदत करावी अशी विनंती केली. त्याला तात्काळ प्रतिसाद देत प्रकाश आमटे यांनी स्वतः छिन्नी हातोडा घेऊन ते साखळ दंड तोडले. त्यानंतर सर्व झोपी गेले.

सकाळी वाटवानी पहाटे उठवल्यावर बघतात तर काय बाबा आमटे हे रडताना दिसून आले. ते पाहून वाटवानी गहिवरले आणि त्यांना या मागचे कारण विचारले असता बाबा म्हणाले की हा समाज किती निर्दयी आहे. एक माणूस दुसऱ्या माणसाला असा कसा वागवू शकतो. तरी तुम्ही यासाठी काहीतरी नक्की करा.

> डॉ. बाबा आणि प्रकाश आमटे यांच्या पासून खरी प्रेरणा मिळाली. आमच्या कार्याची दखल घेऊन जो रेमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झाला यामुळे आमची काम करण्याची शक्ती अधिकच वाढण्यास मदतच झाली आहे. लोकांनी मनोरुग्णांना मानसोपचार तज्ज्ञांकडे उपचार करण्यासाठी न्यावे. करणी, जादूटोणा, भगत अंधश्रद्धा पासून दूर राहावे.
>
> **-डॉ . भरत वाटवानी, मानसोपचार तज्ज्ञ, रेमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त**

त्यांच्या या वाक्याने भारावलेले वाटवानी यांनी यातून प्रेरणा घेऊन कर्जत वेणगाव येथे १९८८ मध्ये श्रद्धा पुनर्वसन केंद्र उभारले.

मनोरुग्ण होण्या मागची अनेक कारणे आहेत. जीवनात येणारे अपयश, नात्यांमधील विरह अथवा एखाद्या भूमिकेत स्वतः ला बघणे, समरस होणे आणि स्वतःच्या वास्तववादी जीवनाचा विसर पडणे असे मनोरुग्णांचे प्रकार आहेत. या मनोरुग्णांना त्या काळात कुटुंबीयांचा हवे तसा आधार मिळत नाही. लोकांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोनही चुकीचा असल्याने या मनोरुग्णांवर त्याचा अधिकच विपरीत होतो असे हे रुग्ण अचानक कुटुंबातून बाहेर पडतात. तर काहींना नातेवाईकच घराबाहेर सोडून देतात. आणि तेथूनच या मनोरुग्णांच्या आयुष्याची फरफट सुरु होते. अशा या रस्त्यावर फिरणाऱ्या मनोरुग्णांना डॉ. वाटवानी यांचे पुनर्वसन केंद्रातील कर्मचारी त्याच्या खास गाडीतून केंद्रात आणतात. त्यांची स्वच्छता करतात. आणि त्यानंतर डॉ. वाटवानी या मनोरुग्णांना जाणून घेऊन त्यांच्या वेदना समजून घेतात. आणि योग्य उपचार करतात. यातील काही रुग्ण दहा बारा महिन्यात बरे होतात. तर काहींना बरे व्हायला अनेक वर्ष लागतात.

त्यानंतर बरे झालेल्या रुग्णांच्या घरचे पत्ते शोधून त्यांना त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात येते. यावेळेस काही विचित्र अनुभव तर काही मन हेलावणाऱ्या प्रसंगांना श्रद्धा फाऊंडेन्शनच्या कर्मचाऱ्यांना सामोरे जावे लागते. काही कुटुंबे या रुग्णांनाची जबाबदारी घेण्यास नकार देतात तर काही कुटुंबियांना अचानक आपल्या पासून अनेक वर्षांपूर्वी आपला हरविलेला माणूस परत मिळतो हे पाहून अश्रूंचा बांध फुटतो शब्दच फुटत नाही. हे पाहून श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे कर्मचारीही हेलावून जातात. मात्र आलेल्या प्रसंगांना सामोरे जात यातील चांगल्या गोष्टीतुन प्रेरणा घेऊन हे या केंद्रांचे काम अखंडित सुरु आहे. त्यामुळेच डॉ. भरत वाटवानी रेमन मॅगसेसे पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**PRAHAAR Mumbai**

**JULY 2018**


शब्दांना सत्याची धार

# प्रहार

मुंबई ■ रविवार, २९ जुलै २०१८ ■ RNI Reg.No.: एमएचएमएआर/२००५/१८६८१ ■ वर्ष १४ ■ अंक २८५ ■ पाने १६






## मनोरुग्णांचा डॉक्टर मित्र
# डॉ. भरत वाटवानी

» संतोष पेरणे, नेरळ

१९८९ मध्ये मानसोपचार तज्ज्ञ म्हणून एमडी झाल्यानंतर डॉ. भरत वाटवानी यांनी समाजाची रस्त्यावर फिरणाऱ्या मनोरुग्णांविषयीची दृष्टी बदलून टाकली आहे. मुंबईमधील आपला व्यवसाय सांभाळत कर्जतसारख्या ग्रामीण भागात येऊन मनोरुग्णांवर उपचार करणारे केंद्र उभारावे आणि त्या केंद्रात मागील १३ वर्षांत शेकडो रुग्णांना बरे करणारे आणि ते देखील रुग्णांच्या नातेवाइकांचा पत्ता नसताना. हा प्रवास थक्क करणारा असून डॉ. भरत वाटवानी यांच्या या माणुसकी देणाऱ्या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली असून ३१ ऑगस्ट रोजी आशिया खंडातील प्रतिष्ठेचा रॅमन मॅगसेसे पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

सामाजिक कार्याची आवड असलेले डॉ. वाटवानी यांना थोर समाजसेवक बाबा आमटे यांच्याकडे जाऊन मनोपचार तज्ज्ञ झाल्यानंतर काय केले पाहिजे, याचे मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांनी गडचिरोलीचा प्रवास सुरू केला. जंगलातून बाबा आमटे यांना भेटायला जाण्यासाठी प्रवास करीत असताना डॉ. वाटवानी यांना एक मनोरुग्ण दिसला. लोखंडी साखळ्यांनी हातपाय बांधलेल्या त्या मनोरुग्णाची चौकशी केली आणि वाटवाणी यांची गाडी पुढे गेली. सायंकाळी काळोख पडू लागल्याने १५ किलोमीटर अंतर कापून गेल्यानंतर पुन्हा वाटवानी मागे आले. त्या रस्त्यावर पडून असलेल्या मनोरुग्णाच्या कपड्यांना घाण वास येत होता. पण त्याचे कपडे काढून आपल्याजवळील चादरीमध्ये लपेटून त्यांनी त्या मनोरुग्णाला हेमलकसा येथे नेले. तेथे डॉ. प्रकाश आमटे यांनी दीड तासांच्या मेहनतीनंतर लोखंडी साखळ्या तोडल्या. हे सर्व बाबा आमटे पाहत होते. त्या मनोरुग्णाला घालायला कपडे देऊन रात्री एका ठिकाणी झोपायची सोय करून डॉ. वाटवानी झोपी गेले. सकाळी ट्रेन असल्याने लवकर उठून तयारी करीत असताना रात्रभर बाबा आमटे हे त्या मनोरुग्णाच्या लोखंडी साखळ्या घालून तेथे पडून होते. त्यावेळी बाबा आमटे यांना बघून डॉ. वाटवानीही स्तब्ध झाले. त्यावेळी बाबा आमटे यांनी भरत तू या क्षेत्रात काम करायला हवे असे सुचविले. नंतर काही दिवस तेथे थांबून बाबा आमटे यांचा शब्द प्रमाण मनात त्या साखळी बांधून ठेवलेल्या मनोरुग्णाला पुन्हा उभे केले. त्यावेळी तो विज्ञान शाखेचा पदवीधर असल्याचे नंतर कळले होते. ही सर्व घटना बाबा आमटे यांच्यासमोरची असल्याने त्यांचे आशीर्वाद घेऊन नंतर मुंबई गाठली आणि मनोपचार तज्ज्ञ म्हणून पैशाच्या मागे न जाता मनोरुग्णांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्धार केला आणि झपाटून कामाला लागण्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे डॉ. भरत वाटवानी.



बाबा आमटे यांनी मनोरुग हा संसर्गजन्य रोग नाही. त्यांना आपलेसे कर असे असा सल्ला दिल्यानंतर १९८९ मध्ये कामाला सुरुवात करणारे डॉ. वाटवानी दाम्पत्य थांबलेच नाही. डॉ. वाटवानी आणि त्यांच्या पत्नी डॉ. स्मिता यांनी मानसोपचार तज्ज्ञ म्हणून मुंबईत प्रॅक्टिस सुरू केली. एके दिवशी मुंबईमध्ये एका हॉटेलात चहा प्यायला बसले होते. डॉ. भरत आणि स्मिता या वाटवानी दाम्पत्याला एक तरुण गटारातील पाणी पीत होता आणि रस्त्यांवरील लोकांवर नारळ फेकून मारत होता. हे पाहून आपला पेशंट समजून डॉ. वाटवानी दाम्पत्याने त्याला सोबत घेतले. त्याच्यावर आठ दिवस उपचार केल्यानंतर तो आंध्र प्रदेशातील असल्याचे समजले. त्यावेळी त्याच्या पालकांना बोलावून घेतले. त्यानंतर तो पॅथॉलॉजी शिक्षण पूर्ण करणारा तरुण असल्याचे तसेच तो तीन महिन्यांपूर्वी हरवला असल्याचे समजले. आपल्या त्या पहिला पेशंटवर, मनोरुग्णांवर यशस्वी उपचार केल्यानंतर या दाम्पत्याने आपल्या मुंबईमधील पाच बेडच्या रुग्णालयात जागा कमी पडते. म्हणून दहिसर येथे एक बंगला भाड्याने घेतला. तेथे उपचार सुरू असताना परिसरातील सुशिक्षित लोकांना मनोरुग्णांचा त्रास होऊ लागला. त्यांनी आमची मुले आणि बायका मनोरुग्ण होतील, अशी भीती व्यक्त केली. शेवटी डॉ. वाटवानी दाम्पत्याने दहिसरमधील दवाखाना बंद करून जागेचा शोध सुरू केला. त्या रहिवाशांनी पोलिसात तक्रार केली. मात्र, मनोरुग्णांवर उपचार करून ते समाजाची सेवा करीत असल्याचे न्यायालयाने त्या उचभ्रू लोकांना फटकारले होते. मात्र, १३ मनोरुग्णांवर उपचार घेत असताना दहिसरमधील लोकांनी माणुसकीला काळिमा फासला. पण वाटवानी दाम्पत्य मागे सरले नाही.



पण स्वतःला शहरी समजणाऱ्यांनी त्यांना अक्षरशः हाकलून लावले. ही खंत मग २००५ मध्ये कर्जतच्या वेणगाव भागात प्रशस्त जागेत श्रद्धा फाऊंडेशन स्थापन झाले आणि त्यातून रि-हॅबीटेशन सेन्टर २००५ मध्ये आकाराला आले. पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते उद्घाटन होऊन सुरू झालेल्या श्रद्धा फाऊंडेशनने मग मागे वळून पाहिले नाही. दहिसरसारखा त्रास कर्जतमध्ये डॉ. वाटवानी यांना झाला नाही. कारण ग्रामीण भागातील लोकांना मनोरुग आजाराची थोडीशी माहिती होती. सुरुवातीला तर श्रद्धा फाऊंडेशनची रुग्णवाहिका मनोरुग शोधण्यासाठी कर्जत तालुक्याच्या रस्त्यांवर फिरू लागली. रस्त्यावर, रेल्वे स्टेशन, सार्वजनिक ठिकाणी मनोरुग्ण दिसला की त्याला हाताला धरून, त्याच्या मनातील भीती दूर करून, त्याच्या आजारावर उपचार करायचे आहेत, असे सांगून त्याची तयारी झाल्यानंतर आणले जाऊ लागले. पहिल्या वर्षी जेमतेम ३३ मनोरुग्णांवर उपचार करून त्यांना पुन्हा समाजाच्या मुख्य प्रवाहात नेण्याचे काम श्रद्धा फाऊंडेशनमध्ये झाले.

मग ट्रस्टमध्ये डॉ. वाटवानी आणि त्यांना मदत करणारे सहकारी यांच्याकडून मनोरुग्णांवर उपचार सुरू झाले. नंतर श्रद्धा फाऊंडेशनच्या रुग्णवाहिकेला कर्जतबाहेर मनोरुग्ण शोधण्यासाठी जावे लागू लागले. आज परिसरातील दोन-तीन जिल्ह्यातील रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी मनोरुग्ण शोधून सापडत नाहीत. असे कार्य डॉ. वाटवानी यांनी कर्जतच्या श्रद्धा फाऊंडेशनमध्ये मागील १३ वर्षांत केले आहे. या काळात देशातील २६ राज्यांतील आणि नेपाळ देशातील तब्बल ५४६३ मनोरुग्णांना श्रद्धा फाऊंडेशनमध्ये बरे करता आले आहे आणि पुन्हा मुख्य प्रवाहात जगण्याची उमेद निर्माण करण्यात डॉ. वाटवानी यशस्वी ठरले आहेत. त्याचवेळी नेपाळ या परराष्ट्रातील काही मनोरुग्ण देखील डॉ. वाटवानी यांच्यामुळे बरे झाले आहेत.



मनोरुग्णाला पुन्हा समाजात माणुसकी मिळवून देणारे डॉ. भरत वाटवानी यांच्या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. आशिया खंडातील नोबेल समजल्या जाणाऱ्या फिलिपाईन्समध्ये दिल्या जाणाऱ्या रॅमन मॅगसेसे पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली आहे. ३१ ऑगस्ट रोजी प्रतिष्ठेचा हा पुरस्कार स्वीकारताना डॉ. वाटवानी यांच्यामुळे कर्जतकरांची मान देखील अभिमानाने उंचावणार आहे.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**RAIGAD TIMES**
**Raigad**

**JULY 2018**

Reg no . MAH/MAR/36261/13/1/2010

# रायगड टाइम्स

वर्ष । ९ । अंक । ८३ । पाने । ८
शुक्रवार, दिनांक २७ जुलै २०१८

Website raigadtimes.co.in Epaper epaper.raigadtimes.co.in
जिल्ह्याचे हक्काचे व्यासपीठ
मूल्य - ३ रु.

## कर्जत : डॉक्टर भरत वाटवानी यांना मॅगसेसे पुरस्कार जाहीर



। रायगड टाइम्स।

कर्जत । रायगड जिल्ह्यातील कर्जतमधील वेणगाव या ठिकाणी श्रद्धा फाऊंडेशन या संस्थेचे फाऊंडर ट्रस्टी डॉ. भरत वाटवानी यांनी सुरु केलेल्या सामाजिक कार्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली आहे. त्यांना सन २०१८ चा रेमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झाला आहे. फिलिपाईन्स देशातील मनाली येथे ३१ ऑगस्ट रोजी पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.


सविस्तर बातमी पान ८ वर

### मनोरुग्णांना जगण्याची उमेद देणारे...

# डॉ.भरत वाटवाणी यांना मॅगसेसे पुरस्कार

## रायगडच्या शिरपेचात रोवला मानाचा तुरा; कर्जतकर खूश







। रायगड टाइम्स ।

**कर्जत । रायगड जिल्ह्यातील कर्जतमधील वेणगाव या ठिकाणी श्रद्धा फाऊंडेशन या संस्थेचे फाऊंडर ट्रस्टी डॉ. भरत वाटवाणी यांनी सुरु केलेल्या सामाजिक कार्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर दाखल घेतली गेली आहे. त्यांना सन २०१८ चा रेमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झाला आहे. फिलिपाईन्स देशातील मनाली येथे ३१ ऑगस्ट रोजी पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.**

बारा वर्षांपूर्वी वेणगाव येथे समाजसेवक डॉ. भरत वाटवानी आणि त्यांच्या युनिटने सन २००५ रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर श्रद्धा फाऊंडेशन रिहॅबिलिटेशन या संस्थेची स्थापन करुन मनोरुग्णांची सेवा करण्याचे व्रत घेतले. रस्त्यावर आणि रस्त्याच्या आजूबाजूला मनोरुग्ण फिरत असतात. त्यांना उचलून ते आपल्या संस्थेत अनंतात आणि त्यांच्यावर उपचार सुरु केले जातात. पुन्हा त्या मनोरुग्णाला त्या आजाराबाहेर काढून समाजात जगण्याची उमेद देतात.

श्रद्धा फाउंडेशनच्या संस्थेमध्ये ३० जनांची टिम कार्यरत असून २००६ रोजी ४७ मनोरुग्णांवर उपचार करतात. या संस्थेने सन २०१८ पर्यंत देशातील २६ राज्य तसेच जगातील बांग्लादेश, नेपाळ आणि इराण या देशातील मनोरुग्ण असे मिळून आतापर्यंत ५४६३ मनोरुग्णांवर उपचार केले आहेत. ते मनोरुग्ण ज्या अवस्थेत फिरताना, पडलेल्या अशा पद्धतीत इतरत्र भटकणाऱ्या मनोरुग्णांना ॲम्ब्युलन्समध्ये टाकून संस्थेत आणून उपचारानंतर ते मनोरुग्ण यांना बरे केले जाते. ते बरे झाल्याची खात्री झाल्यानंतर त्याला त्याच्या मुल गावी परिवाराकडे सुपूर्द करण्याचे पवित्र कार्य डॉ.भरत वाटवाणी यांची संस्था गेली बारा वर्षे कर्जतमध्ये करीत आहे.

आंतराष्ट्रीय पातळीवर डॉ. भरत वाटवानी यांनी समाजिक हित आणि देशहितासाठी करत असलेल्या व्रताची दखल घेतली आहे. फिलिपाईन्सने १९५८ रोजी भारतातील भूदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे यांना पहिला रेमन म्यागेसेस पुरस्कार प्रदान केला होता. त्यानंतर भारत देशातील अनेक समाजिक कार्यावर श्रद्धा ठेवून काम करणाऱ्या महान व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

असेच कार्य कर्जतमध्ये डॉ. भरत वाटवानी यांचे सुरु असल्याने त्यांना त्यांच्या कार्याची पोचपावती आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतल्याने त्यांचे सर्व क्षेत्रांतून कौतुक होत आहे.

**MAHARASHTRA**

**News**

**MARATHI**

**MAHARASHTRA TIMES**

**Mumbai**

**AUGUST 2018**




मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र

रविवार

महाराष्ट्र टाइम्स

www.maharashtratimes.com

आंतरराष्ट्रीय युवा दिन

मुंबई । रविवार, १२ ऑगस्ट २०१८ । पाने १६ + संवाद । शहर आवृत्ती ** । ₹ ५.०० किंवा ८.०० द टाइम्स ऑफ इंडियासहित



शर्मिला कलगुटकर

Sharmila.kalgutkar@timesgroup.com


मानसिक आजार असलेल्या रुग्णांना अनेकदा स्वीकारले जात नाही. तिथे रस्त्यावर विमनस्क अवस्थेमध्ये फिरणाऱ्या, हरवलेल्या मनोरुगणांकडे कोण लक्ष देणार? अशा सुमारे सात हजार मनोरुग्णांना मानसोपचार तज्ज्ञ डॉ. भरत वाटवानी यांनी वैद्यकीय उपचार देऊन, बरे करून, पुन्हा त्यांच्या कुटुंबासोबत जोडून दिले. त्यासाठी कर्जत येथे स्थापन करण्यात आलेल्या 'श्रद्धा' या संस्थेचा पसाराही दिवसोंदिवस वाढतो आहे. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या कामाची दखल घेत त्यांना जागतिक प्रतिष्ठेचा 'मॅगसेसे' पुरस्कार जाहीर झाला आहे.

# हा पुरस्कार त्यांचाच!

चॅट रूम

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAMNA**
**Mumbai**

**AUGUST 2018**

▶वर्ष: २६, अंक १६१, मुंबई, शुक्रवार ३ अगस्त २०१८ ▶पेज १६ ▶मूल्य: ₹ २

दोपहर का

# सामना

संस्थापक संपादक : बाल ठाकरे



शिवसेनापक्षप्रमुख उद्धव ठाकरे से 'मातोश्री' निवासस्थान पर रेमन मैगसेसे पुरस्कार विजेता डॉक्टर भरत वाटवानी ने मुलाकात की। इस दौरान उनका सत्कार किया गया। इस मौके पर विधायक विलास पोतनीस, प्रकाश सुर्वे, विभाग संगठक रश्मि भोसले, नगरसेविका शीतल म्हात्रे, दीपा पाटील, मिलिंद म्हात्रे तथा शिल्पा पितले उपस्थित थीं।
फोटो : प्रभाकर वराडकर

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**LOKMAT**
**Pune**

**AUGUST 2018**

महाराष्ट्राचा मानबिंदू
# लोकमत
पृष्ठे : १२+४+४ = २०, किंमत: ₹ ५.००
मुंबई, रविवार, दि. ५ ऑगस्ट २०१८


## माणसाला माणूसपण देण्यासाठी जगलो - भरत वाटवानी

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : आयुष्यात जे काही केले, ते माणसाला माणूसपण देण्यासाठी केले. सुरुवातीला वेगळे काम करीत असल्याने त्रास झाला, पण समाजात राहणाऱ्या एका व्यक्तीला तरी आपण बरे करु शकलो पाहिजे, या विश्वासाने काम सुरु केले, असे प्रतिपादन शनिवारी 'रॅमन मॅगेसेसे' पुरस्कार जाहीर झालेले मानसोपचार तज्ज्ञ डॉ. भरत वाटवानी यांनी केले.

मलबार हिल येथील सह्याद्री अतिथीगृहामध्ये शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा, उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे 'रॅमन मॅगेसेसे पुरस्कार विजेते २०१८ सन्मान सोहळा' शनिवारी आयोजित करण्यात आला होता. या वेळी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते डॉ. भरत वाटवानी आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांना सन्मानित करण्यात आले.


भरत वाटवानी म्हणाले, आज वेगवेगळे आजार अनेकांना होतात. मात्र, अजूनही आपण मानसिक आजाराचे रुग्ण आहोत हे मानायला




पटकन तयार होत नाही. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमात मानसिक आजाराबाबत धडे देणे, विद्यार्थ्यांना मानसिक स्वास्थ्याबाबत आणि मानसिक आजाराबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

सोनम वांगचुक म्हणाले, शिक्षणात सुधारणा करण्याचा प्रयत्न करत आहे. लडाखमध्ये शिक्षण व्यवस्था सुधारित आहे. शिक्षणात सुधारणा होणे काळाची गरज आहे. मातृभाषेतून मुलांना शिक्षण द्यावे, यासाठी आपण आग्रही असणे आवश्यक आहे. मनात इंग्रजी भाषा किंवा अन्य कोणत्याही भाषा येत नाहीत म्हणून न्यूनगंड बाळगता कामा नये. गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात काम करीत असताना, बदलत्या शिक्षण पद्धतीप्रमाणे बदल केला आहे.

विनोद तावडे म्हणाले, शिक्षण क्षेत्रात काळानुरुप बदल होत आहे, पण येणाऱ्या काळात शिक्षण क्षेत्राला पुढे नेताना सोनम वांगचुक आणि डॉ. भरत वाटवानी यांच्यासारख्यांची महाराष्ट्राला गरज आहे. समाजातील प्रत्येकामधील भावनिक बुद्ध्यांक वाढविण्यासाठी या दोघांनी महाराष्ट्राचे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून काम करावे, जेणेकरुन त्यांच्या कामामुळे अनेकांना प्रेरणा मिळेल.



'श्रध्दा' च्या आवारातला योगासनांचा वर्ग

# माणसांना माणसात आणताना...

**स्वत:ची ओळख, भोवतालाचं भान हरवून बसलेले, गलिच्छ आणि लाजिरवाणं जीणं जगणारे रस्त्यावरचे मनोरुग्ण. त्यांना पुन्हा 'माणसात' आणण्याचा एक जाणता प्रयत्न... प्रतिष्ठेचा रेमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झालेले डॉ. भरत वाटवानी यांनी निवडलेल्या अनोख्या वाटेवरुन चालताना...**

आनंद अवधानी

आपण कोणत्याही मोठ्या शहरात रस्त्याच्या कडेला बसलेली माणसं पाहतो. वाढलेले केस, वाढलेली दाढी, मळून काळे झालेले कपडे, शून्यात हरवलेली नजर आणि अस्ताव्यस्त व्यक्तिमत्त्व. आपल्यासाठी रस्त्यावर पडलेले अनाहूत दगड नि अन्य सटर-फटर वस्तू आणि ही माणसं सारं काही सारखंच असतं. कधी आपल्याला ते भिकारी वाटतात तर कधी दारूडे वाटतात; पण यातली बरीच माणसं प्रत्यक्षात दोन्हीही नसतात. ते असतात मनोरुग्ण.

'श्रद्धा' ही संस्था गेली अनेक वर्षं अशा व्यक्तींसाठी काम करते. रस्त्याच्या कडेला 'पडलेली' ही माणसं उचलून आपल्या केंद्रात आणायची, त्यांच्यावर मानसिक आणि शारीरिक उपचार करायचे, त्यांना बोलतं करून त्यांच्या घरचे, गावचे पत्ते मिळवायचे आणि पुन्हा त्यांना त्यांच्या कुटुंबात नेऊन सोडायचं, असं 'श्रद्धा'च्या कामाचं स्वरूप आहे. रस्त्यावरच्या मनोरुग्णांच्या प्रश्नाची तीव्रता आणि भयावहता पाहता या कामाचं सामाजिक मोल खूप मोठं आहे. डॉ. भरत आणि डॉ. स्मिता वाटवानी या मनोविकारतज्ज्ञ असलेल्या डॉक्टर जोडप्याने सुरू केलेलं आणि चालवलेलं हे काम आहे. हे दोघे सायकॅट्रिस्ट या कामाकडे कसे वळले याची कहाणी मोठी विदारक आहे.

१९८८च्या सुमाराची गोष्ट. वाटवानी पती-पत्नी बोरिवलीच्या एका रेस्टॉरण्टमध्ये जेवायला गेले होते. तिथे बसलेले असताना रस्त्याच्या दुसऱ्या बाजूच्या फुटपाथवर एक व्यक्ती बसलेली त्यांना दिसली. त्या व्यक्तीचे हावभाव पाहिल्यावर डॉक्टर वाटवानींच्या लगेच लक्षात आलं, की ही व्यक्ती मनोरुग्ण आहे. रेस्टॉरण्टमधल्या आनंदी मूडमध्येही त्यांच्यातला डॉक्टर त्यांना स्वस्थ बसू देईना. त्यानंतर जे घडलं ते डोळ्यांवर विश्वास बसू नये असं होतं.

अचानकपणे त्या माणसाने जवळची नारळाची करवंटी उचलून गटारात बुडवली आणि ते घाण पाणी तो चक्क पिऊ लागला. मग मात्र आपण काय करतो आहोत हे कळण्याच्या आत तो रुग्ण बसला होता तिथे डॉक्टर पोहचले. त्याला उचलून त्यांनी त्यांच्या खासगी नर्सिंग होममध्ये दाखल केलं. लगेचच उपचार चालू केले. तो स्क्रिझोफ्रेनिक होता. काही दिवसांत त्याच्यात सुधारणा दिसू लागली. तो जरा जरा बोलू लागला. त्याने सांगितलं की, तो बी.एस्सी.पर्यंत शिकलेला आहे, तेव्हा डॉक्टरांना खरा धक्का बसला. उच्च शिक्षण घेतलेला माणूससुद्धा केवळ मानसिक आजारामुळे रस्त्यावर येऊ शकतो? इतकं गलिच्छ आणि लाजिरवाणं आयुष्य त्याच्या वाट्याला येतं? हा रुग्ण आंध्र प्रदेशमधल्या सधन कुटुंबातला होता. त्याचे वडील तिथल्या जिल्हा परिषदेत अधिकार पदावर होते.

तोपर्यंत मनोरुग्णांच्या अनेक केसेस हाताळलेले डॉक्टर सुन्नपणाच्या पुढची अवस्था अनुभवत होते. त्या आजाराचं हे असं हिडीस रूप त्यांना पहिल्यांदाच दिसत होतं. या मनोरुग्णाकडून घरचा पत्ता मिळवून त्यांनी त्याच्या वडिलांशी संपर्क साधला. ते अक्षरशः पळत आले. वडील आणि मुलाचं ते मीलन पाहिल्यानंतर डॉक्टरांना या प्रकारच्या कामाची एक अंधुक वाट दिसू लागली. आपल्या नर्सिंग होममधली एक कॉट त्यांनी अशा अभागी रुग्णांसाठी ठेवली. त्यानंतर रस्त्याच्या कडेचे मनोरुग्ण जाणीवपूर्वक उचलले जाऊ लागले, त्यांना ॲडमिट केलं जाऊ लागलं आणि ते बरे झाल्यावर त्यांना पुन्हा त्यांच्या कुटुंबाशी जोडलं जाऊ लागलं. डॉक्टर या भेटींना 'री-युनियन' म्हणतात. 'श्रद्धा'च्या कामाची सुरुवात झाली ती अशी. आपली खासगी प्रॅक्टिस सांभाळत एकामागोमाग एक मनोरुग्ण रस्त्यावरून उचलून त्यांना बरं करणं हा डॉक्टरांच्या रुटीनचा भाग झाला. त्यासाठी शक्य तेवढा वेळ ते देऊ लागले. स्वतःच्या उत्पन्नातून पैसे खर्च करू लागले.

'श्रद्धा'च्या कामामध्ये सर्वात मौल्यवान असलेली बाब म्हणजे हे 'री-युनियन'. मानसिक आजारामुळे बिघडलेली रुग्णांच्या आयुष्याची गाडी पुन्हा रुळावर आणणं औषधोपचारांमुळे शक्य आहे; पण त्या व्यक्तींना पुन्हा त्यांच्या मूळ कुटुंबात, त्यांच्या 'आपल्या' माणसांत नेऊन सोडणं हे अधिक महत्त्वाचं आहे. 'श्रद्धा' या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आजपर्यंत दीड हजार ( ताज्या आकडेवारीनुसार सात हजाराहून अधिक) लोकांना पुन्हा त्यांच्या कुटुंबांशी जोडलं आहे.


हळूहळू डॉक्टरांनी कामाची व्याप्ती वाढवली. या रुग्णांसाठी दहिसरला एक स्वतंत्र जागा घेतली. त्यामुळे एकाहून अधिक रुग्णांवर एका वेळी उपचार करणं शक्य झालं. कार्यकर्त्यांची आणि कर्मचाऱ्यांची टीम त्यासाठी तयार केली. यथाशक्ती आपण या क्षेत्रात काम करत राहायचं, हा निर्णय जाणीवपूर्वक घेतला. पुढे कामाचा पसारा वाढत गेल्यावर कर्जत स्टेशनपासून जवळ 'श्रद्धा रिहॅबिलिटेशन सेंटर' ही वास्तू आकाराला आली. या केंद्राचं उद्घाटन २००६ साली डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते झालं.

'श्रद्धा'मध्ये मनोरुग्ण आणल्यानंतर त्यांच्यावर करण्याच्या काही उपचारांच्या पद्धती आहेत. पहिली गोष्ट त्यांची स्वच्छता. त्यांच्या डोक्याचे, दाढीचे सर्व केस काढून त्यांना स्वच्छ अंघोळ घालावी लागते. अनेक महिनेच काय, वर्षंसुद्धा नीट जेवण नसल्यामुळे आणि रस्त्यावरचं काहीही उचलून खाल्लेलं असल्यामुळे त्यांना एकदम नेहमीचं अन्न देऊन चालत नाही. त्याची रिॲक्शन येऊ शकते. त्यांच्या मेंदूमधल्या रसायनांचा गेलेला तोल सावरण्यासाठी काही औषधं दिली जातात, तर शारीरिक स्थिती सुधारण्यासाठी वेगळी औषधं असतात. त्यापूर्वी एचआयव्ही सकट सर्व प्रकारच्या तपासण्या केल्या जातात. दुसरीकडे त्यांच्या भाषेचा अंदाज घेऊन त्या भाषेतले कार्यकर्ते त्यांना बोलतं करायचा प्रयत्न करतात. यासाठी कधी कधी महिनाभरही थांबावं लागतं. ते बोलू लागले की मग ते त्यांची घरची पार्श्वभूमी, शिक्षण, नातेवाईक वगैरे माहिती हळूहळू सांगू लागतात. त्याच्या आधारे ते कोणत्या राज्यातले, कोणत्या गावातले आहेत हे शोधलं जातं. त्यानंतर त्यांच्या आजारातून ते किती बरे झाले आहेत याचा अंदाज डॉक्टर घेतात. एकदा डॉक्टरांनी परवानगी दिली की त्या रुग्णाच्या री-युनियनची तयारी होते. 'री-युनियन' करण्याची स्वतःची अशी पद्धत 'श्रद्धा'ने तयार केली आहे. एक तर मनोरुग्ण जेव्हा रस्त्यावर सापडतो तेव्हा रेकॉर्डसाठी त्याचे फोटो काढले जातात. नंतर त्याच्या तब्येतीमधल्या बदलांची नोंद ठेवली जाते. त्याला कोणत्या औषधांची भविष्यात गरज लागणार आहे याची यादी केली जाते. या सगळ्याची फाइल री-युनियन झाल्यावर त्याच्या नातेवाइकांना दिली जाते. सोबत एका महिन्याची औषधं दिली जातात. त्यानंतर दर महिन्याला 'श्रद्धा'च्या केंद्रांमधून त्या व्यक्तीच्या नातेवाइकांना फोन केला जातो. गरजेप्रमाणे औषधं बदलून पाठवली जातात. प्रश्न जसे या मनोरुग्णांच्या जगण्याचे आहेत तसेच आपण त्यांना विसरण्याचेही आहेत. आपल्या लक्षातच येत नाही, की यांचा आपण विचारच करत नाही. त्यांना न मोजताच आपली जनगणना पूर्ण होते. २०२०च्या महासत्तेकडे वाटचाल करण्याच्या नादात आपण यांना बरोबर घेण्याचं विसरूनच जातो. आपल्या देशात पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त, इतकंच काय पण भिकाऱ्यांसाठीसुद्धा योजना आहेत; पण त्यात या रुग्णांचा उल्लेखदेखील नाही. केंद्र सरकारची नेहरू योजना म्हणते, की गरिबातल्या गरिबांसाठी अंदाजपत्रक बनवलं पाहिजे. पण जी माणसं अस्तित्वात असल्याची नोंदच नाही त्यांचं काय?

डॉक्टर वाटवानींच्या मते रस्त्यावर फिरणाऱ्या मनोरुग्णांची भारतातली संख्या किती तरी लाखांत आहे; पण आपला समाज त्यांचा विचारही करायला तयार नाही. 'श्रद्धा'सारख्या अनेक संस्था निर्माण होतील तेव्हा मुंबईच्या रस्त्यांवरच्या रुग्णांचा प्रश्न काही प्रमाणात सुटेल. याचा अर्थ पूर्ण देशभरातला प्रश्न सोडवण्यासाठी किती संस्थांना किती काम करावं लागेल !

('अनुभव दिवाळी २०११' मधून संपादित साभार)

vatwanibharat@gmail.com
anandawadhani@gmail.com


डॉ. स्मिता आणि भरत वाटवानी

### रस्त्याकडेचं बेवारस आयुष्य

1. रस्त्याकडेच्या मनोरूग्णांमध्ये सर्वाधिक प्रमाण हे स्क्रिझोफ्रेनिक रूग्णांचं असतं. मेंदूतील ज्या रसायनांमुळे आपण नॉर्मल विचार करू शकतो, त्यांचाच तोल बिघडतो. मग माणूस तंद्रीत राहतो, हवेत हातवारे करतो, स्वतःशीच हसतो. अशिक्षित मंडळी याला 'देवीचा कोप' मानतात किंवा कुणाची करणी मानतात. मग अंगारे-धुपारे, देवदेवस्की...
2. आरोप-प्रत्यारोप करणं, रागावणं, बोलणं टाकणं, पाणउतारा करणं, प्रसंगी मारहाण करणं, बांधून ठेवणं असे प्रकार सुरू होतात. त्यातून ती व्यक्ती इतरांपासून तुटते आणि तिचा आजार बळावत जातो.
3. अशातच स्वतःच्या तंद्रीत अशी व्यक्ती घरातून बाहेर पडते. रेल्वेत चढली तर कुठे तरी कोपऱ्यात बसून राहते. अशा व्यक्तींना भान नसतं. मग रेल्वेच्या शेवटच्या स्थानकांवर अशा व्यक्ती पोचतात.
4. यार्डात गाडी पोचल्यावर सफाई कर्मचारी त्यांना गाडीतून हाकलतात आणि हे मनोरूग्ण महानगरांच्या रस्त्यांच्या कडेचा आधार घेतात.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAKAL**
**Pune**

**SEPTEMBER 2018**


www.esakal.com

# सकाळ



'ड्रॅगन'ला दणका
चीनकडून आयात होणाऱ्या २०० अब्ज डॉलरच्या उत्पादनांवर १० टक्के शुल्काची घोषणा अमेरिकेने केली आहे.
१०




धवनचे शतक
आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत हॉंगकॉंगविरुद्ध भारताच्या शिखर धवनचे शतक वैशिष्ट्यपूर्ण ठरले.
११

●पुणे, बुधवार, १९ सप्टेंबर २०१८ ●अग्रलेख : तीन पायांची शर्यत ●पहाटपावलं : दृढनिश्चय किंमत ₹ ४ ● आजचा अंक : पाने २० (१२+८)


# संवेदनांतून जुळले प्रकाशाशी नाते

विशेष




**डॉ. भारत वाटवानी**
मानसोपचारतज्ज्ञ,
सामाजिक कार्यकर्ते


**'सकाळ'चे संस्थापक-संपादक डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्या जयंतीनिमित्त रॅमन मॅगसेसे पुरस्कारविजेते डॉ. भारत वाटवानी यांच्या व्याख्यानाचे गुरुवारी (ता. २०) पुण्यात आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त आपल्या कार्यामागची प्रेरणा कथन करणारा त्यांचा विशेष लेख.**

प्रख्यात मनोविश्लेषक आणि तत्त्वज्ञ कार्ल जंग यांचा मी निष्ठावंत अनुयायी. जंग यांचे अनेक सिद्धांत आदरणीय असून, त्यांचा एकवाक्यतेचा (सिंक्रोनायझेशन) सिद्धांतही त्यापैकीच एक. विश्वात कारणाशिवाय काहीच घडत नाही, असे हा सिद्धांत सांगतो. रॅमन मॅगसेसे पुरस्कार मिळणे हेही याच सिद्धांताचे उदाहरण असल्याचे मी मानतो. लाखो कुष्ठरुग्णांच्या दुःखी जीवनात खऱ्या अर्थाने आनंदवन फुलविणारे बाबा आमटे यांच्याशी माझी भेट २००४ मध्ये असाधारण परिस्थितीत झाली. त्यापूर्वीची तीन वर्षे वाढदिवशी मी शिर्डीला जाऊन साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत होतो. त्या वर्षी मात्र मी बाबा आमटे यांची भेट घेण्याचे ठरविले. कार्ल जंगचा एकवाक्यतेचा सिद्धांत त्या वेळीही अनुभवला. मी आणि माझ्या सहकाऱ्याने 'आनंदवन'ला जाण्यासाठी रेल्वे तिकिटाचे आरक्षण केले होते. मात्र माझ्या मुलांच्या गणिताच्या शिक्षिका रश्मी सुर्वे यांना आमच्या दौऱ्याचा सुगावा लागला. त्यांनी आमच्याबरोबर 'आनंदवन'ला येण्याचे जाहीर केले. त्यामुळे मी मोटारीने जाण्याचे ठरविले. सुर्वे यांच्यामुळेच हे 'गणित' जमले. आम्ही बाबांच्या 'आनंदवन' या कुष्ठरुग्णांसाठीच्या भव्य पुनर्वसन केंद्रात पोचलो. मुंबई ते नागपूर हे तब्बल एक हजार किलोमीटरचे अंतर. 'आनंदवन' नागपूरच्या जवळच. समाजाने नाकारलेल्या कुष्ठरुग्णांसाठी बाबांनी उभारलेल्या 'आनंदवना'ची संपूर्ण रचना आणि भव्यता पाहून आम्ही अचंबित झालो. दुर्दैवाने, त्या वेळी बाबा तेथे नव्हते. मात्र आमच्याकडे मोटार होती. त्याबद्दल सुर्वे मॅडमचे आभारच मानायला हवेत. त्यांच्यामुळेच आमच्या या दौऱ्याला वेगळे वळण मिळाले.

बाबा तेव्हा हेमलकसामध्ये होते. त्यामुळे, आम्ही तेथून ३५० किलोमीटर अंतरावरील हेमलकसाला जाण्याचे ठरविले. हेमलकसाच्या साधारण १०० किलोमीटर अलीकडे आम्हाला रस्त्याच्या कडेला हाता-पायांत बेड्या ठोकलेला मनोरुग्ण दिसला. हिंसक वृत्तीमुळे स्किझोफ्रेनियाच्या या रुग्णाच्या हाता-पायांत बेड्या ठोकलेल्या होत्या. माझ्या सहकाऱ्याने त्याला सोबत येण्याविषयी विचारणा केली. त्याने नकार दिला. त्याला आमच्यासोबत घ्यावे की नाही, या द्विधा मनःस्थितीत मी १५ ते २० किलोमीटर गेलो. मात्र अखेर माझ्या सदसद्विवेकबुद्धीनेच हा तिढा सोडवला. अंतरात्म्याचा आवाज ऐकत मी परत फिरलो. तो मनोरुग्ण घाणेरडा दिसत होता. आम्ही त्याच्या शरीराभोवती चादर गुंडाळली व त्याला मोटारीत बसवले. तोपर्यंत बाबा किंवा प्रकाश आमटेंबरोबर आमची भेटही झाली नव्हती. अशा परिस्थितीत त्यांची प्रतिक्रिया काय असेल, या विचाराने मी थोडासा निराश झालो. हेमलकसाला पोचल्यावर मी त्यांना आमच्या कार्याची कल्पना दिली. त्याचप्रमाणे, हेमलकसाच्या वाटेवर विचित्र परिस्थितीत सापडलेल्या या निराधार मनोरुग्णाबद्दलही सांगितले. मी प्रकाश आमटेंना मनोरुग्णाच्या हाता-पायांतील बेड्या काढण्याची विनंती केली. त्यानंतर, 'ओपीडी'मध्ये अनेक रुग्ण तपासून थकलेल्या प्रकाश यांनी अत्यंत विनम्रतेने छिन्नी आणि हातोडा घेऊन हळूवारपणे बेड्या काढून त्याची मुक्तता केली. त्यांना बेडी तोडण्यास दोन तास लागले. पहिल्यांदाच भेटत असलेल्या या मानवतादूताच्या महानतेपुढे मी नतमस्तक झालो. शेजारच्याच पलंगावर पहुडलेले बाबा शांतपणे या मुक्तीच्या संपूर्ण प्रक्रियेचे निरीक्षण करत होते.

दुसऱ्या दिवशी पहाटे लवकर उठलो. पाहिले तर बाबा अश्रू ढाळत होते. एखादी व्यक्ती हाता-पायांत बेड्या ठोकल्यावर चालू कशी शकते, या विचाराने आपण रात्रभर झोपलो नसल्याचे त्यांनी सांगितले. बाबांनी तुटलेल्या बेड्या पायांत घालून चालण्याचाही प्रयत्न केला होता. असह्य वेदनांनी चालणे शक्य नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. बाबांची संवेदनशीलता इतक्या पराकोटीची होती. त्यामुळेच मी त्यांच्याकडे आकर्षित झालो. माझ्या कार्याबद्दल समजल्यावर बाबाही माझ्याकडे खेचले गेले. आमच्यातील नाते भावनिकरीत्या अतिशय दृढ होते. एकीकडे माझ्या कामाचे कौतुक करतानाच दुसरीकडे आणखी काम करण्यासाठी ते अधिकाराने रागवायचे. त्यानंतर मलाही अल्पसंतुष्ट न राहता अधिकाधिक काम करण्याची जाणीव व्हायची. आपण मानसिक आजारांना जवळून पाहिल्याचे बाबा सांगायचे. मनोरुग्णांसाठी काहीतरी करण्याचे त्यांचे स्वप्न होते. हे अधुरे स्वप्न मी पूर्ण करावे, अशी त्यांची इच्छा होती. मी माझ्या सर्व विश्वस्तांशी चर्चा केली. माझ्यातील प्रचंड प्रेरणास्रोत पाहून त्यांनी मनोरुग्णांसाठीच्या कार्याचे विस्तारपूर्वक नियोजन करण्याचे ठरविले. त्यातूनच कर्जतला जमिनीची खरेदी करून प्रकल्प उभा केला. या काळात मी बाबा आमटेंच्या संपर्कात असायचो. प्रकल्पाच्या कामावरून ते अनेकदा रागवायचेही. त्यांनी स्वतःवर निवृत्ती लादून घेतली असली, तरी आमच्या प्रकल्पाच्या उद्घाटनाला येण्याच्या कल्पनेने ते आनंदी व्हायचे. दुर्दैवाने प्रकृती ढासळल्याने त्यांना त्या कार्यक्रमाला येता आले नाही. त्याऐवजी त्यांनी प्रकाश आमटेंना पाठविले.



बाबा आमटे यांच्यासमवेत लेखक (डावीकडे).

माझ्यासाठी प्रकल्पाची सुरवात आणि तो स्वावलंबी करण्याचा काही वर्षांचा काळ आयुष्यातील सर्वांत कठीण होता. खरे तर, माझ्यासारख्या शहरी व्यक्तीला मुंबईपासून ९० किलोमीटर अंतरावर कर्जतसारख्या दुर्गम भागात मनोरुग्णांसाठी असा प्रकल्प उभा करणे अवघड होते. प्रकल्प उभारणीतील प्रस्तावित अडथळ्यांमुळे मी ओक्साबोक्शी रडायचो. दर दोन-तीन महिन्यांनी बाबांना भेटण्यासाठी 'आनंदवना'त धाव घ्यायचो. या भेटीत मी बाबांकडून प्रेरणा व नवसंजीवनी घेऊन परतायचो. प्रकल्प उभारणीच्या या निराश करणाऱ्या, अंधारलेल्या वाटेवर एकमेव मार्गदर्शक प्रकाश होता, तो म्हणजे बाबा आमटे. बाबांचा पुढे जात राहण्याचा मंत्र आता आमचाही मंत्र बनला होता. दर पंधरा दिवसांनी प्रकल्पाच्या प्रगतीविषयी त्यांचा फोन येत असे. त्यातून त्यांच्यातील संवेदनशीलता, नम्रता आणि काळजीचेच दर्शन घडे. आभाळाएवढी उंची गाठलेल्या बाबांचा सहवास आणि नम्र आणि हृदयस्पर्शी देहबोली मला आयुष्यात इतर कोणाकडूनही लाभली नाही. मी ऐन तारुण्यात वडिलांना गमावले. या तीव्र धक्क्यातून मला नैराश्य आले आणि मनात आत्महत्येचे विचार येऊ लागले होते. मी भेटलेल्या सर्व ज्येष्ठांमध्ये वडिलांना शोधत होतो. बाबा आमटे भेटले आणि हा शोध संपला. समाजातील तळागाळातील लोकांबद्दलच्या अतीव दयेमुळे बाबा इतरांपेक्षा वेगळे ठरतात. कित्येक वर्षांनंतरही कुष्ठरुग्णांची दयनीय अवस्था वर्णन करताना त्यांना रडू फुटत असे. 'आनंदवना'च्या एका भेटीदरम्यान माझ्या पत्नीने मी दीर्घकाळापासून नैराश्यात असल्याचे बाबांना सांगितले. चेहऱ्यावर मार्मिक हास्यरेषा उमटवत बाबांनी मी कधीच निराश नसल्याचे नमूद केले. याउलट, आपला हा शिष्य अस्वस्थ असून, अंतर्शोध संपेपर्यंत ही अस्वस्थता त्याच्यासाठी चांगलीच असल्याचा दिलासा त्यांनी पत्नीला दिला. बाबांबरोबरच्या सततच्या भेटीगाठींमुळे माझ्या नैराश्याला उतार पडला. त्यानंतर मी इतस्ततः भटकणाऱ्या मानसिक रुग्णांच्या वेदनांशी समरस झालो. इतरांच्या वेदनांची जाणीव, हा बाबा आणि माझ्यातील समान दुवा ठरला.

'आनंदवना'त श्रद्धावन (आमच्या स्वयंसेवी संस्थेचे नाव 'श्रद्धा' आहे.) येथे बाबा आणि साधनाताईंची समाधी आहे. आज बाबा या जगात नाहीत. गेल्या चौदा वर्षांच्या काळातील आमच्या कार्याने मनोरुग्णांच्या अवस्थेत कितपत फरक पडला, हे मला ठाऊक नाही. मात्र आमचा प्रयत्न निश्चितच प्रामाणिक होता. हाच प्रामाणिकपणा आणि निष्ठापूर्वक केलेले प्रयत्न आम्ही बाबांना अर्पण करतो. बाबांच्या अंत्यसंस्कारावेळी कुष्ठरुग्ण, अंध, दिव्यांग, कर्णबधिर धाय मोकलून रडत होते. मीही त्यांच्यातील एक होतो. खरे तर, काही रक्ताबाहेरची नाती आयुष्याला अर्थ देतात. बाबा माझे खरे वडील नव्हते, तरीही आमचे नाते त्यापलीकडचे होते. आमचे अस्तित्वही त्यासाठीच होते.

लेखाच्या सुरवातीला उल्लेख केलेली एकवाक्यता म्हणजे तरी नेमके काय? मी गेल्या काही वर्षांतील रॅमन मॅगसेसे पुरस्कारार्थींची यादी पाहिली. बाबा आमटेंचे गुरू विनोबा भावे यांना १९५८मध्ये हा पुरस्कार मिळाला. त्यानंतर, बाबांना १९८५मध्ये हा पुरस्कार प्रदान झाला. काही वर्षांनी थोर पित्याचा वारसा समर्थपणे चालविणारे प्रकाश आमटे यांचाही या पुरस्काराने गौरव झाला. त्यानंतर माझ्या रूपाने बाबांचा हा दत्तक मुलगाही पुरस्कारार्थी ठरला. मानवी आयुष्य हे अशा प्रकारे एकमेकांशी जोडले जायला हवेच. मॅगसेसे यांचे आमच्यापैकी कुणाशीच रक्ताचे नाते नव्हते. तरीही त्यांनी आम्हा सर्वांनाच एखाद्या माळेप्रमाणे एकत्र गुंफले. 'विश्वात कारणाशिवाय काहीच घडत नाही. आपल्या आयुष्यातील सर्वच प्रसंग, घटना एकमेकांशी जोडलेल्या, पूर्वनियोजित असतातच,' हा कार्ल जंगचा सिद्धांत या उदाहरणातूनच सिद्ध होतो.

अनुवाद : मयूर जितकर

(स)

# MAHARASHTRA News

MARATHI

SAKAL
Pune

SEPTEMBER 2018

www.esakal.com

# सकाळ

●पुणे, शुक्रवार, २१ सप्टेंबर २०१८ ●अग्रलेख : 'भागवत पुराणा'ची फलश्रुती! ●क्रीडा : जीवनज्योत यांच्या 'द्रोणाचार्य'साठी 'अर्जुनां'चे तीर किंमत ₹ ५ ● आजचा अंक : पाने १८ (१०+८)+ फॅमिली डॉक्टर पुस्तिका



**सिंधूवर मदार**

पी. व्ही. सिंधू; तसेच किदांबी श्रीकांत यांनीच चीन ओपन स्पर्धेतील भारताचे आव्हान कायम ठेवले आहे.


९

**आयोगावर दबाव**

वित्त आयोगावर असलेल्या दबावाची प्रचिती आली, अशी टीका राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

८





शिवाजीनगर : डॉ. नानासाहेब परुळेकर जयंती कार्यक्रमात गुरुवारी बोलताना सामाजिक कार्यकर्ते डॉ. भारत वाटवानी.

## समाजसेवेसाठी अंतरात्म्याचा आवाज ऐका

### रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भारत वाटवानी यांचे तरुणाईला आवाहन

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २० : गरिबी, दारिद्र्य आणि प्रचंड दु:ख आपल्या भोवताली आहे. आपणही याच समाजाचा भाग आहोत. त्यावर फुंकर घालायची असेल, तर तरुणांनो उभे राहा. त्यासाठी तुमच्या अंतरात्म्याचा आवाज ऐका आणि सेवा करा, हेच सत्य आहे, अशा शब्दांत रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते भारत वाटवानी यांनी गुरुवारी तरुणाईला सेवाधर्म बजावण्याचा सल्ला दिला.

'सकाळ'चे संस्थापक संपादक डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्या १२१ व्या जयंतीनिमित्त 'सामाजिक बदलांमागील प्रेरणेचा प्रवाह' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी सकाळ माध्यम समूहाच्या संचालक मृणाल पवार, संपादक सम्राट फडणीस उपस्थित होते. वाटवानी यांनी यादरम्यान त्यांच्या श्रद्धा रिहॅबिलिटेशन संस्थेने केलेल्या कार्याची दृकश्राव्य माध्यमातून उपस्थितांना माहिती दिली. आतापर्यंत हजारो मनोरुग्णांवर उपचार करून त्यांना पान ४ वर »

### डॉ. वाटवानी म्हणाले...

- देशात एकूण लोकसंख्येच्या एक टक्के लोक मनोरुग्ण
- मानसिक रोगांबाबत समाजात अद्याप जागृती नाही
- औषधोपचार मिळाल्यास मनोरुग्ण बरे होऊ शकतात
- मनोरुग्णांना समाज स्वीकारायला तयार नाही, हे वास्तव
- मीदेखील मानसिक तणावातून गेलो आहे
- रस्त्यावरील प्रत्येक मनोरुग्णामध्ये मी स्वत:ला पाहतो

e Sakal व्हिडिओ पाहा www.esakal.com



शिवाजीनगर : डॉ. नानासाहेब परुळेकर जयंती कार्यक्रमात पुरस्कार विजेत्यांसोबत डॉ. भारत वाटवानी. या वेळी (डावीकडून) शलाका आणि श्रीपाद घोडके, शंकर टेमघरे, सुरेश भोसले, डॉ. वाटवानी, दत्ता देशमुख, ज्ञानेश सावंत, डॉ. अजय चंदनवाले, मनीषा आणि डॉ. अभिजित सोनवणे व विनायक वाळेकर.

## समाजसेवेसाठी अंतरात्म्याचा आवाज ऐका

» पान १ वरून

मुख्य प्रवाहात आणताना त्यांना कुटुंबाच्या मायेची ऊबही त्यांनी मिळवून दिली. त्या प्रत्येक प्रसंगाचा अनुभव वाटवानी यांनी विशद केला. त्या वेळी उपस्थितांच्या डोळ्यांचा कडा पाणावल्या.

डॉ. वाटवानी म्हणाले, "सनदी लेखापालपासून असंख्य उच्चशिक्षित लोकांना मनोरुग्ण म्हणून समाजाने नाकारले. असे लाखो लोक त्या वेदना, जखमा घेऊन जगत आहेत. गरज आहे, ती त्यांना समजून घेण्याची. त्यासाठी समाजात जागृती होण्याची गरज आहे. जसा मधुमेह, रक्तदाब होतो, तसा मानसिक आजार कुणालाही होऊ शकतो; पण ते मान्य करण्याची कुणाची तयारी नसते. यातून समस्या जटिल होतात आणि त्यातून असंख्य लोक कुटुंबाच्या मायेला पारखी होतात."

"मी मनोरुग्णांवर उपचारास सुरवात केली, त्या वेळी समाजातून विरोधही झाला; पण आतला आवाज ऐकला. काम करीत राहिलो. कोणत्याही फळाची अपेक्षा ठेवली नाही. सुरवातीला बायकोचे दागिनेही विकले; पण कामात खंड पडला नाही. या रुग्णांवर उपचार करून त्यांना त्यांच्या कुटुंबाशी जोडतो, त्या वेळी मिळणारे समाधान आणि त्या कुटुंबाने दिलेली दुवा यांचे मोल कशातच मोजता येणार नाही. देशात अजूनही तीन लाखांहून अधिक मनोरुग्ण रस्तोरस्ती फिरत आहेत. केवळ एक संस्था त्यासाठी पुरेशी पडणार नाही. अनेक स्वयंसेवी संस्थांनी हे काम सुरू केले पाहिजे," असे आवाहन त्यांनी केले.

**पुरस्कार प्रदान...**

स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार कै. ना. अ. पेंडसे पुरस्कृत डॉ. नानासाहेब परुळेकर स्मृती पुरस्कार : पुणे आवृत्तीचे बातमीदार ज्ञानेश सावंत, बीड आवृत्तीचे बातमीदार दत्ता देशमुख, तर पिंपरी आवृत्तीचे उपसंपादक शंकर टेमघरे यांना विशेष पुरस्कार.

### उल्लेखनीय कामगिरीबद्दल पुरस्कार

- जलसंधारण कामामध्ये योगदानाबद्दल विनायक वाळेकर
- आठ अनाथ मुलांच्या शिक्षणाचा खर्च उचलणारे श्रीपाद घोडके आणि त्यांची पत्नी शलाका घोडके
- नदीत बुडणाऱ्या महिलेसह तीन मुलांचा जीव वाचविणारे निवृत्त मेजर सुरेश भोसले.
- ससून रुग्णालय व बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले
- रस्त्यांवरील भिक्षेकऱ्यांवर उपचार करणारे डॉ. अभिजित आणि त्यांची पत्नी मनीषा सोनवणे

### मनोरुग्णांसाठी डॉ. वाटवानींचे कार्य

- गेली ३० वर्षे सेवा. दहिसर येथे २० खाटांच्या हॉस्पिटलपासून सुरवात. बाबा आमटे, प्रकाश आमटेंच्या कार्यापासून प्रेरणा
- श्रद्धा रिहॅबिलिटेशन सेंटरच्या माध्यमातून निराधार व अनाथ मनोरुग्णांचे पुनर्वसन
- आतापर्यंत ७ हजारांहून अधिक मनोरुग्णांवर उपचार करून कुटुंबीयांकडे सुपूर्त
- अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित. आशियातील प्रतिष्ठेचा रॅमन मॅगसेसे पुरस्काराचे यंदाचे मानकरी

### जवानाने सॅल्यूट केला!

काश्मीर येथील एक मुस्लिम मनोरुग्ण मला रस्त्यावर सापडला. त्याच्यावर उपचार केले. ते समजल्यावर भारतीय लष्करात असलेला त्याचा भाऊ मला भेटायला आला. तो म्हणाला, माझ्या भावाला त्यांनी दहशतवादी ठरविले, कारण तो गायब झाला होता. त्यामुळे मलाही टीका सहन करावी लागली; पण केवळ तुमच्यामुळे एक नाही तर दोघांवर लागलेला खोटा आरोप पुसला गेला, असे सांगत त्याने मला सॅल्यूट केला, अशी आठवण डॉ. वाटवानी यांनी सांगितली.

**MAHARASHTRA**

**News**

**MARATHI**

**PUDHARI**

**Kolhapur**

**OCTOBER 2018**

अमृतमहोत्सवी

स्थापना १९३९

# पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

कोल्हापूर

■ सोमवार । दि. १ ऑक्टोबर २०१८ । वर्ष ८० । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोली, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध



कोल्हापूर : रॅमन मॅगसेसे पुरस्कारप्राप्त डॉ. भरत वाटवाणी यांचा मानपत्र देऊन सन्मान करताना महापौर सौ. शोभा बोंद्रे, अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव. यावेळी उपस्थित डावीकडून रितू लालवाणी, अनिल हिराणी, रमेश तनवाणी, ब्रिजलाल लालवाणी, डॉ. संदीप पाटील, ॲड. वसंत सप्रे, व्ही. बी. पाटील, किशोर देशपांडे आदी.(छाया : पप्पू अत्तार)

## समाजाने मनोरुग्णांना आधार द्यावा : डॉ. वाटवाणी

### सिंधी समाजाच्या वतीने नागरी सत्कार

कोल्हापूर : प्रतिनिधी

मनोरुग्ण लोकांना आधार देण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ. भरत वाटवाणी यांनी केले. कोल्हापूर सिंधी समाजाच्या वतीने आयोजित नागरी सत्कार समारंभात ते बोलत होते.

मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. महापौर शोभा बोंद्रे यांच्या हस्ते मानपत्र देऊन डॉ. वाटवाणी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी होते.

डॉ. वाटवाणी म्हणाले, मानसिकदृष्ट्या काही लोक आजारी असल्याने त्यांना मनोरुग्ण म्हटले जाते. त्यांना समाजात जगण्याचा अधिकार आहे. त्यांची हेटाळणी केली जाते. त्यांच्या भावना जाणून घेण्याचा कोणी प्रयत्न करत नाही. डॉ. बाबा आमटे व डॉ. प्रकाश आमटे यांच्या कार्याचा आदर्श घेऊन अशा मनोरुग्णांसाठी आपण कर्जत व दहिसर येथे श्रद्धा संस्थेच्या माध्यमातून उपचार करत आहे. अनेक रुग्ण बरे करून पाठवले आहेत. हे मनोरुग्ण अनेकवेळा चांगल्या कुटुंबातील असल्याची बाब उपचारादरम्यान निदर्शनास आली आहे. आजही समाजात असे फिरस्त, मनोरुग्ण मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका. कोल्हापुरातील विविध सामाजिक संस्थांनी या मनोरुग्णांना जीवनाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा.

**डॉ. वाटवाणी यांचे कार्य कौतुकास्पद : डॉ. योगेश जाधव**

डॉ. वाटवाणी यांचे मनोरुग्णांसाठी सुरू असलेले काम कौतुकास्पद असल्याचे सांगून डॉ. योगेश जाधव म्हणाले, मानसिक रुग्णांचे पुनर्वसन होऊ शकते हे डॉ. वाटवाणी यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे. ३० वर्षे अखंडपणे त्यांनी सेवा करून ७ ते ८ हजार मनोरुग्णांवर उपचार केले आहेत. मनोरुग्ण म्हणून या लोकांना दगड मारले जातात. त्यांना वेडसर असल्याची जाणीव करून दिली जाते, पण, त्यांच्याकडे समाजाचे मानवतेच्या भावनेतून पाहण्याची गरज आहे. कोल्हापूरातील सिंधी समाजाचे काम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. महापौर सौ. शोभा बोंद्रे यांनीही डॉ. वाटवाणी यांच्या कार्याचे कौतुक केले. रमेश तनवाणी यांनी स्वागत केले. डॉ. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. ब्रिजलाल लालवाणी यांनी आभार मानले. यावेळी गांधीनगरच्या सरपंच रितू लालवाणी, व्ही. बी. पाटील, किशोर देशपांडे, चंद्रकांत कलाणी, अनिल हिराणी, ॲड. वसंत सप्रे, अनिल तनवाणी उपस्थित होते.

## माणुसकी जपणाऱ्या कार्यात 'पुढारी' सदैव तुमच्याबरोबर

### डॉ. प्रतापसिंह जाधव यांची ग्वाही : डॉ. वाटवाणी यांची 'पुढारी'ला भेट

कोल्हापूर : प्रतिनिधी

मानसिक संतुलनाअभावी मनोरुग्ण बनलेल्या लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे अतुलनीय कार्य 'रॅमन मॅगसेसे' पुरस्कारप्राप्त डॉ. भरत वाटवाणी हे आपल्या 'श्रद्धा' या सेवाभावी सामाजिक संस्थेच्या माध्यमातून करत आहेत. माणुसकी जपणाऱ्या कार्यात दैनिक 'पुढारी' सदैव तुमच्याबरोबर राहील, अशी ग्वाही मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी दिली.

डॉ. वाटवाणी यांच्या कार्याच्या विस्तारासाठी शासनाच्या विविध योजनांसह सीएसआर फंडाचे पाठबळ मिळवून देण्याची ग्वाही उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांनी दिली.

नागरी सत्कारासाठी रविवारी कोल्हापुरात आलेल्या डॉ. भरत वाटवाणी यांनी दैनिक 'पुढारी'च्या मुख्य कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्यांचे स्वागत डॉ. प्रतापसिंह जाधव व डॉ. योगेश जाधव यांनी केले. पुष्पगुच्छासह दैनिक 'पुढारी'ची अमृतमहोत्सवी वाटचाल यासह विविध विषयांवरील पुस्तके भेट देण्यात आली.

यावेळी 'सावली' केअर संस्थेचे किशोर देशपांडे, रमेश तनवाणी, जीवदया निगेटिव्ह ब्लड ग्रुपचे अनिल कानकेकर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. वाटवाणी यांनी, दैनिक 'पुढारी'ने स्वातंत्र्यपूर्व काळापासून समाजाच्या विविध क्षेत्रांसाठी दिलेले योगदान प्रेरणादायी आहे. संस्थापक संपादक डॉ. ग. गो. जाधव यांनी स्वातंत्र्य लढ्यात दिलेले योगदान, भारतीय सैन्यदलासाठी सियाचीन येथील अतिशय खडतर रणभूमीवर उभारलेले हॉस्पिटल आणि तिसऱ्या पिढीने सुरू ठेवलेले सामाजिक कार्य या गोष्टींचा आवर्जून उल्लेख केला.



कोल्हापूर : 'मॅगसेसे' पुरस्कारप्राप्त डॉ. भरत वाटवाणी यांनी रविवारी दैनिक 'पुढारी'च्या प्रधान कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत चर्चा करताना मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव. शेजारी उपस्थित 'सावली' संस्थेचे किशोर देशपांडे व रमेश तनवाणी. (छाया : पप्पू अत्तार)

**मनोरुग्णांना आधाराची गरज**

डॉ. वाटवाणी यांच्या कार्यामुळे मॅगसेसे पुरस्काराची उंची वाढली आहे, अशा शब्दांत डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करून हे कार्य अधिक व्यापक व्हावे यासाठी या क्षेत्रात कोल्हापुरात सक्रिय असणाऱ्या सावली केअर सेंटरच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, असे सांगितले. डॉ. वाटवाणी यांनी, समाजात मानसिक आजारांचे वाढते प्रमाण, मानसोपचारतज्ज्ञांची कमतरता, कर्जत येथील त्यांच्या संस्थेचे कार्य, कामात येणाऱ्या विविध प्रकारच्या अडचणी, शासकीय स्तरावरील उदासीनता यासह विविध विषयांवर चर्चा केली. मानसिक रुग्णांना औषधापेक्षाही अत्यावश्यक असणाऱ्या मानसिक आधारासाठीचे आवाहन त्यांनी केले.

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**SAKAL Pune**

**MARCH 2019**

सकाळ

# ओतूरला १३ वर्षांनी बहीण-भावांची भेट

## श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशनचा पुढाकार; मुंजेवाडीतील खंडागळे कुटुंब आनंदित

» विधायक

ओतूर, ता. २६ : एखाद्या सिनेमात घडावा असा प्रसंग ओतूर (ता. जुन्नर) येथील आदिवासी भागातील नागरिकांना अनुभवायला मिळाला. ओतूर येथील मुंजेवाडीतील खंडागळे कुटुंबात हा प्रसंग घडला.

येथील विमल गंगाराम खंडागळे ही मनोरुग्ण होती. ती १३ वर्षांपूर्वी जुन्नर तालुक्यातून बेपत्ता झाली. सर्वत्र शोध घेऊनही तिचा काहीच शोध लागला नाही. अचानक १३ वर्षांनंतर मुंबई येथील मुख्य शाखा असलेल्या श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या दोन कार्यकर्त्या विमल खंडागळे सांगत असलेल्या पत्त्यावर ओतूरला घेऊन आल्या. थोडी चौकशी केल्यावर ताटातूट झालेल्या बहीण व दोन सख्ख्या भावांची भेट झाली.

पान २ वर »



ओतूर (ता. जुन्नर) : बहीण भावांची तेरा वर्षांनी भेट घडवून आणलेले शांताराम वारे (उजवीकडून दुसरे), श्रद्धा फाउंडेशनच्या समाजसेविका, विमल खंडागळे (डावीकडून तिसरी) व भाऊ.

### चुकीच्या नावामुळे अडचण

केसरला घेऊन आम्ही ओतूरला आलो व थोडीशी चौकशी करून लगेच शांताराम वारे यांच्याशी संपर्क झाला. मात्र, केसर चुकीचे नाव सांगत असल्यामुळे अडचण निर्माण झाली. मात्र, तिला तिचा भाऊ कोठे कामाला होता, त्या दुकानदाराचे नाव माहीत होते. त्यावरून मग सामाजिक कार्यकर्ते शांताराम वारे यांनी चौकशी केली. देवराम खंडागळे व किसन खंडागळे यांची तेरा वर्षांपूर्वी एक मनोरुग्ण बहीण बेपत्ता असल्याचे समजले. त्यावरून दोन्ही भावांना बोलावले. देवराम खंडागळे व किसन खंडागळे यांनीही बहिणीला ओळखले व तिने ही दोन्ही भावांना ओळखले. त्यानंतर विमल (केसर) खंडागळे हिला तिच्या भावांच्या ताब्यात देऊन तसे कागदपत्र बनवून फॉर्मवर सह्या घेऊन त्वरित परत कर्जत गाठले, असे ज्योती राऊत व ज्योत्स्ना निकंबे यांनी सांगितले.

Pune, District-Today
27/03/2019 Page No. 1

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**LOKMAT**
**Nagpur**

**MAY 2019**

Nagpur, Monday, 13.05.2019

लोकमत



# सहा वर्षानंतर 'ती' परतली

## आईचे अश्रू अनावर : गावकरीही झाले चकित

शिरीष खोबे ।
लोकमत न्यूज नेटवर्क



ममता उईके आई आणि नीला शाहा यांच्यासोबत.

नरखेड : गोंडेगाव येथील ममता रामलाल उईके (३२) हिचे २०१२ मध्ये लग्न झाले. सासरच्या त्रासाला कंटाळून ती माहेरी आली. आईने लग्नासंबंधी घेतलेल्या अयोग्य निर्णयामुळे आई व मुलीत भांडण झाले. रागाच्या भरात ममता घर सोडून गेली. घरच्यांनी सर्वत्र शोध घेतला. ती कुठेही गवसली नाही. ती मृत पावली असावी असे समजून घरच्यांनी ती परत येण्याची आशा सोडली. परंतु तब्बल सहा वर्षांनी ती दारासमोर दिसताच आईने हंबरडा फोडला व आनंदाश्रूंनी वाट मोकळी केली.

आदिवासी कुटुंबातील ममता उईके हीचे लग्न कुटुंबीयांनी काटोल येथील युवकाशी लावून दिले होते. लग्न झाल्यापासून तिला संसारिक जाच होता. कुटुंबीयांनी घेतलेल्या चुकीच्या निर्णयाची माहिती देण्यासाठी ती सहा वर्षांपूर्वी माहेरी आली होती. तिच्या आईने तिला सासरी जाण्याचा सल्ला दिला होता. ते तिला मान्य नव्हते. कुटुंबीयांच्या आग्रहास्तव त्रस्त होऊन ती घरुन निघाली. त्यावेळी तिच्या मनात प्रचंड अस्वस्थता होती. सुखाचा संसार नाही आणि माहेरही नाही, या विवंचनेत तिने प्रवासाला सुरुवात केली. नरखेड येथून रेल्वेगाडीत बसल्यावर ती कुठेतरी पाणी पिण्यासाठी खाली उतरली. याच दरम्यान गाडी निघून गेली. तिचे सामान मात्र गाडीत राहून गेले. या दरम्यान ममताचे रुपांतर एका मनोरुग्णात झाले. भटकंती करीत ती राजस्थान येथे पोहोचली. तिथे एका सद्गृहस्थाने तिला 'अपना घर' या महिलांच्या आश्रमात सोडून दिले. त्यावेळी ती मानसिकदृष्ट्या पूर्णपणे खचली होती.

> ममता मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सुदृढ झाल्यानंतरच तिला गावी पाठविण्याचा निर्णय घेतला. श्रद्धा रिहॅबिलिटेशन सेंटर ही संस्था भारतात रस्त्यावर फिरणाऱ्या निराधार मनोरुग्णांसाठी काम करते. मी या कार्याची प्रेरणा बाबा आमटे यांच्या कार्यातून घेतली आहे.
>
> - डॉ. भरत वाटवाणी,
> श्रद्धा रिहॅबिलिटेशन सेंटर, कर्जत.

साडेचार वर्ष 'अपना घर' येथे राहिल्यानंतर महाराष्ट्रातील कर्जत येथील श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाऊंडेशनने तिला ताब्यात घेत कर्जत येथे आणले. तिच्यावर तिथे उपचार करण्यात आले. काही दिवसातच ती नाव आणि गाव सांगू लागली. संस्थेचे डॉ.भरत वाटवाणी व डॉ.स्मिता वाटवाणी यांच्याकडे तिने घरी परत जाण्याची इच्छा व्यक्त केली. डॉ. वाटवाणी यांनी तिची आरोग्य तपासणी केल्यानंतर ती मानसिकदृष्ट्या योग्य असल्याचा निर्वाळा दिला. या केंद्रातील सामाजिक कार्यकर्त्या नीला शाहा यांच्यासोबत ममताला तिच्या गावी पाठविले. ममता गावात पोहोचताच गावकरी चकित झाले. ती दारात पोहोचताच आईने हंबरडा फोडला.

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**DAINIK HERALD**

**MAY 2019**

दैनिक हेराल्ड




# आरोग्य जगत





# माणुसकीचे क्षितिज रुंदावणारा मनोविकारतज्ज्ञ



**केवळ दोन-तीन रुग्णांची सोय असलेल्या 'श्रद्धा' पुनर्वसन केंद्रापासून आता १५० रुग्णांची सोय होऊ शकेल इतका 'श्रद्धा'चा पसारा वाढला आहे. या आगळयावेगळ्या कामासाठी कार्यकर्ते निवडणे ही एक कसरतच असते. डॉ.वाटवानी म्हणतात, मला फक्त नेमून दिलेले काम करणारी माणसे नको असतात. स्वत:च्या बुद्धीचा, विचारांचा पुरेपूर वापर करून ध्येयपूर्तीच्या दिशेने वाटचाल करणारे सुशिक्षित तरुण मला हवे असतात.**

स्किझोफ्रेनिया दिनानिमित्त शुक्रवार २४ मे रोजी स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशनतर्फे पुण्यात आय.एम.ए. हॉलमध्ये संध्याकाळी पाच वाजता जाहीर व्याख्यान होणार आहे. डॉक्टर भरत वाटवानी 'बेघर मानसिक आजारी व्यक्तींची समस्या' या विषयावर बोलणार आहेत.

आजही आपल्या समाजात मानसिक आजार असलेल्या रुग्णांना सहजपणे स्वीकारले जात नाही. तर मग, रस्त्यावर विमनस्क अवस्थेमध्ये फिरणाऱ्या, हरवलेल्या मनोरुग्णांकडे कोण लक्ष देणार? अशा सुमारे सात हजार मनोरुग्णांना मनोविकारतज्ज्ञ डॉ. भरत वाटवानी यांनी वैद्यकीय उपचार देऊन, बरे करून, पुन्हा त्यांच्या कुटुंबासोबत जोडून दिले. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या कामाची दखल घेत त्यांना जागतिक प्रतिष्ठेचा 'रॅमन मॅगसेसे' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉक्टर वाटवानी यांचा जन्म १९५८ चा. त्याचवर्षी मॅगसेसे पारितोषिक देण्यास प्रारंभ झाला. २०१८ मध्ये मॅगसेसे पारितोषिकाचा हीरक महोत्सव आणि डॉक्टर वाटवानी यांचाही हिरक महोत्सव एकाच वर्षी येणे हा एक योगायोगच समजावा लागेल. डॉक्टर वाटवानी यांना हे पारितोषिक देऊन या समितीने आजपर्यंत आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील दुर्लक्षित राहिलेल्या एका विषयाची दखल घेतली आहे. मॅगसेसेसह अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले गेले आहे.

केवळ दोन-तीन रुग्णांची सोय असलेल्या 'श्रद्धा' पुनर्वसन केंद्रापासून आता १५० रुग्णांची सोय होऊ शकेल इतका 'श्रद्धा'चा पसारा वाढला आहे. या आगळ्यावेगळ्या कामासाठी कार्यकर्ते निवडणे ही एक कसरतच असते. डॉ.वाटवानी म्हणतात, मला फक्त नेमून दिलेले काम करणारी माणसे नको असतात. स्वत:च्या बुद्धीचा, विचारांचा पुरेपूर वापर करून ध्येयपूर्तीच्या दिशेने वाटचाल करणारे सुशिक्षित तरुण मला हवे असतात.

आजपर्यंत डॉ. वाटवानी यांनी हजारो रुग्णांना बरे करून घरी पाठवले आहे. परंतु ते आजही अस्वस्थ आहेत. भारतातील विविध शहरांतील



रस्त्यावर चार लाखांपेक्षा जास्त मनोरुग्ण भटकत आहेत. त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही, ही खंत त्यांना आहे. डॉ. वाटवानी म्हणतात, एकूण वैद्यकीय व्यवसायच कमालीचा धंदेवाईक झाला आहे, त्याचा फटका आम्हालाही बसत आहे. महिन्याला लाख रुपये पगार देऊ करत असूनही तरुण सायकिएट्रिस्ट मुलं-मुली मिळत नाहीत. त्यांचे दुसरे दु:ख आहे ते सरकारी मेंटल हॉस्पिटलमधील रुग्णांविषयीचे. काही रुग्ण तिथं दहा-पंधरा वर्षं खितपत पडलेले असतात. त्यांच्यासाठी तिथं सायकिएट्रिस्ट असतात, काउन्सिलरसुद्धा असतात, पण सरकारी बेपर्वाई या रुग्णांना तिथे सडवत असते. एक पेशंट त्यांनी चेन्नई मनोरुग्णालायातून आणला आणि त्याला बरे करून दोन महिन्यांत घरच्यांना भेटवलंसुद्धा.

इतकी वर्षं या क्षेत्रात काम करूनदेखील डॉ. वाटवानी यांची रुग्णांविषयीची संवेदनशीलता आणि सह-अनुभूती शाबूत आहे. रस्त्यावरील एका मनोरुग्णाला हे जग कसे दिसत असेल, त्याची इच्छा काय असेल हे ते 'एका रस्त्यावर भटकणाऱ्या निनावी स्किझोफ्रेनिक रुग्णाचे गाणे..' या शीर्षकाच्या कवितेत लिहितात. एका मनोविकारतज्ज्ञाच्या ठायी अशा प्रकारची संवेदनशीलता ही एक अचंबित करणारीच गोष्ट आहे. एखाद्या मनोरुग्णाला रस्त्यावर बघून त्यांचं मन आजही हेलावतं आणि ते सहजपणे म्हणतात, या व्यक्ती त्यांचा कोणताही दोष नसताना अशा रस्त्यावर का असाव्यात? त्या इथे असताच कामा नयेत! आणि त्या रुग्णाला रुग्णालयात दाखल करून त्याच्या उपचारांची आणि कुटुंबियांबरोबर पुनर्मिलनाची जबादारी घेतात. दोन हजार सतराचा मानसिक आरोग्य कायदा रस्त्यावरील मनोरुग्णांसह सर्वच मनोरुग्णांचे उपचारांचे अधिकार, मानवाधिकार आणि रुग्णाची प्रतिष्ठा या संबंधीच्या सरकारच्या जबाबदाऱ्या अधोरेखित करतो. परंतु ज्या वेळेला या पैकी, कायदा जाऊ दे, पण विचारांचादेखील समाजमनाला गंध नव्हता त्या वेळेपासून म्हणजे १९८८ सालापासून डॉ. वाटवानी काम करत आहेत. कायद्याचे क्षितिजावरील आगमन हे नेहमीच उशिरा होत असते. सह्रदयता आणि उत्स्फूर्तपणे केलेल्या कामाच्या पाऊलवाटेचे रस्ता 'रुंदीकरण' आणि 'अधिकृतीकरण' कायद्याच्या साहाय्याने केले जाते.

'श्रद्धा' केंद्रातून दिल्लीमधल्या श्रीमंत घरातला डॉक्टर मुलगा, जे. जे. आर्ट स्कूलमधले शिक्षक, लष्करामध्ये भाऊ असलेला एक रुग्ण आणि अन्य हजारो मनोरुग्ण बरे होऊन पुन्हा त्यांच्या कुटुंबात परतले आहेत. त्यांनी आयुष्याची नवीन सुरुवात केली. 'श्रद्धा'चे काम वाढावयास हवे याची त्यांना जाणीव आहे. त्याचबरोबर इतरांनी देखील हे काम चालू करावे असे त्यांना वाटते. संवेदनशीलता आणि समाजाविषयी बांधिलकी असणारा कोणीही हे काम करू शकतो. ते गमतीने म्हणतात, हे काही रॉकेट सायन्स नाही. परंतु त्याचबरोबर या प्रश्नाच्या मुळाशी जाण्याची आवश्यकता ते व्यक्त करतात.





रॅमन मॅगासेस पुरस्का विजेत्यांसह डॉ. वाटवानी

ही माणसे अशी रस्त्यावर येतातच कशी? या बाबतीत डॉ. वाटवानी म्हणतात, आपल्या कुटुंबातील व्यक्तीला असा आजार होऊ शकतो, हेच मान्य केले जाते नाही आणि लक्षात आले तरी मान्य करून मोकळेपणाने डॉक्टरांकडे जाण्याऐवजी हा आजार लपवण्याकडे लोकांचा अधिक कल असतो. त्यामुळे उपचारांना उशीर होतो आणि आजार अधिक गुंतागुंतीच्या अवस्थेत पोहोचतो. भारतीय समाजाचा मानसिक आजारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आधुनिक उपचार आणि मूल्ये यांच्याशी आजही सुसंगत असा नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे मानसिक आजार, त्यावरील उपचार, त्यांची कारणे याबद्दल पुरेशी जनजागृती नाही. मानसिक आजार मेंदूमधील रासायनिक बदलांमुळेही होतात. याची माहितीच अनेकांना नसते. त्यामुळे या आजारासाठी बाबा-बुवांकडे जाण्याचा, लिंबू-गंडेदोरे बांधण्याचा मार्गदेखील स्वीकारला जातो. मानसिक आजाराबद्दलचे गैरसमज आणि अंधश्रद्धा या सगळ्याला खतपाणी घालतात.

डॉक्टर वाटवानी यांच्यासारख्या व्यक्तीचे कार्य मानसिक आरोग्य क्षेत्रातल्या केवळ एका क्षेत्राला मोठे करत नाही, तर संपूर्ण मानसिक आरोग्य क्षेत्राकडे झालेले दुर्लक्ष आणि या क्षेत्रातील कामाची गरज समाजासाठी अधोरेखित करत असते... माणुसकीचा स्तर समाजासाठी उंचावत असते... संपूर्ण समाजालाच एक वेगळे परिमाण देणारे असते... आणि म्हणून या भरतभूमीवर असे अनेक भरत असायला हवे आहेत, हीच तर आपली सगळ्यांची इच्छा...

डॉक्टर वाटवाणी यांचे प्रेरणास्थान आहेत बाबा आमटे. महान समाजसेवकांचे काम हे रिलेच्या शर्यतीसारखे असते. त्यांचे कार्य बघून इतर अनेक जण प्रेरणा घेतात आणि स्वतःचे काम सुरू करतात. पुन्हा हे काम मोठे होते आणि त्यातून पुढच्या फळीतील कार्यकर्ते प्रेरणा घेत राहतात. रिलेच्या शर्यतीतील बॅटम पुढच्या समाजसेवकाकडे दिला जातो. बॅटम घेण्यासाठी नवीन खेळाडू येत राहतातच. या नवीन खेळाडूंसाठी स्थळ, काळ,भाषा असे कुठलेच अडथळे नसतात. प्रेरणा हाच त्यांचा एक बॅटम ठरतो. हा रिले शर्यतीचा प्रवास असाच अव्याहत सुरू राहणार आहे... माणसाच्या अस्तित्वापर्यंत... डॉ. वाटवानी यांच्या सारख्यांची एवढीच इच्छा असावी, की तंत्रज्ञानाच्या आणि व्हॉट्स ॲपच्या या युगात हा प्रवास अजून जलद व्हावा..... (उत्तरार्ध)

**वाचकांना आवाहन :** आपल्या शहरांतील रस्त्यावर आपणास मनोरुग्ण आढळून आल्यास श्रद्धा पुनर्वसन केंद्र, कर्जत यांच्याशी खालील क्रमांकावर सल्ला व मार्गदर्शनासाठी संपर्क करावा.

ध्रुव बडेकर (७२६३८०१३८४) अथवा

सचिन म्हस्के (८६९८२५९२०४)

**– प्रा. डॉ. अनिल वर्तक,**

उपाध्यक्ष, 'सा' पुणे.

९५०३७१०८५९

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAKAL**
**Pune**

**OCTOBER 2019**


सकाळ

...ालचे शतक
...रुद्ध दुसऱ्या कसोटी
गुरुवारी पहिल्या दिवशी
...ीर मयांक आगरवालने
१३

कचऱ्याचे ढीग
हटविण्याचे आव्हान

सुटीवर जाण्याआधीच
काळाचा घाला

प्रशासनावर अवलंबून
राहण्यात अर्थच नाही
४

पुणे, शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०१९ — किंमत ₹ ५ ● आजचा अंक (फॅमिली डॉक्टर पुस्तिका): पुणे शहर : पाने २८ (१४+१०+४ पानी सकाळ एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड पुरवणी), पिंपरी-चिंचवड : पाने २२ (१४+८),


# मनोरुग्णांसाठी सरकारकडून प्रयत्न आवश्यक

## डॉ. भरत वाटवाणी यांची अपेक्षा; जीवनगौरव पुरस्काराचे वितरण

**पुणे, ता. १० :** "देशाच्या कोनाकोपऱ्यातील विविध रस्त्यांवर फिरणारे लाखो मनोरुग्ण हे आजही उपेक्षित व वंचितच राहिले असून, त्यांच्या उपचार व पुनर्वसनासाठी सरकारकडून मोठ्या प्रमाणात प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे मत श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे संस्थापक, रॅमन मॅगसेसे पुरस्काराचे मानकरी आणि ज्येष्ठ मनोविकार तज्ज्ञ डॉ. भरत वाटवाणी यांनी केले.

मनोदय मेंटल हेल्थ फोरम, कर्वे समाज सेवा संस्था, पुणेच्या वतीने डॉ. वाटवाणी यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. मनोविकारतज्ज्ञ डॉ. उल्हास लुकतुके, कर्वे समाज सेवा संस्थेचे कार्याध्यक्ष सदानंद देशपांडे, डॉ. महेश ठाकूर, चेतन दिवाण, डॉ. सुप्रकाश चौधरी, डॉ. संजय कुमावत या वेळी उपस्थित होते.



**पुणे : डॉ. भरत वाटवाणी यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना डॉ. देवानंद शिंदे.**

डॉ. वाटवाणी म्हणाले, "श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून आपण आजपर्यंत रस्त्यावर फिरणाऱ्या आठ हजारांहून जास्त मनोरुग्णांवर उपचार केले. त्यांना स्वगृही सोडून पुनर्वसन केले असले, तरी आजही असे अनेक रुग्ण रस्त्यांवर भटकत आहेत. देशातील तरुणांनी व विशेषतः समाजकार्याचे शिक्षण घेणाऱ्या तरुणांनी यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे."

डॉ. लुकतुके म्हणाले, "डॉ. वाटवाणी यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून सुरू केलेले असे हे उल्लेखनीय कार्य आहे. समाजकार्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या या कार्यास हातभार लावावा." शर्मिला सईद यांनी सूत्रसंचालन केले. स्मिता लोंढे यांनी आभार मानले.


लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १४+८+४+CNX/८ = ३४, किंमत : ₹ ५.००
पुणे, शनिवार, दि. १२ ऑक्टोबर २०१९


# मनोरुग्ण पुनर्वसनासाठी व्हावे शासनस्तरावर काम

## भारत वाटवाणी : जीवनगौरव पुरस्कार प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** रस्त्यावर फिरणारे लाखो मनोरुग्ण आजही उपेक्षित व वंचितच राहिले आहेत. त्यांच्या उपचार व पुनर्वसनासाठी शासकीय पातळीवरुन मोठ्या प्रमाणात हालचाली होणे आवश्यक असल्याचे मत श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे संस्थापक व रॅमन मॅगसेसे पुरस्काराचे मानकरी डॉ. भरत वाटवाणी यांनी केले.

मनोदय मेंटल हेल्थ फोरम, कर्वे समाजसेवा संस्था पुणेच्यावतीने डॉ. वाटवाणी यांना जीवनगौरव पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे व ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. उल्हास लुकतुके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कर्वे समाजसेवा संस्थेचे अध्यक्ष सदानंद देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली, संस्थेचे प्र. संचालक डॉ. महेश ठाकूर, मेंटल हेल्थ फोरमचे कार्याध्यक्ष प्रा. चेतन दिवाण, फोरमचे सल्लागार डॉ. सुप्रकाश चौधरी व डॉ. संजय कुमावत यांच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा पार पडला.

डॉ. भरत वाटवाणी यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून कार्य सुरु केलेले आहे. समाजकार्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या या कार्यास हातभार लावावा. समाजामध्ये अशा रुग्णाच्या उपचार व पुनर्वसनासाठी लोकजागृती करण्याचे काम करावे, असे आवाहन डॉ. उल्हास लुकतुके यांनी केले.

डॉ. महेश ठाकूर, प्रा. चेतन दिवाण, डॉ. सुप्रकाश चौधरी, डॉ. संजय कुमावत यांनी मनोगते व्यक्त केले. शर्मिला सईद यांनी सूत्रसंचालन केले. स्मिता लोंढे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्विततेसाठी वैशाली अद्वैता, नंदा वायंगणकर, रुपाली खेडकर, सीमा पोलाया, अपर्णा सांगलीकर, सत्यपाल लोने, क्रांती खैरमोडे, इम्रान सय्यद, जगदीश बोरुडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**KESARI**
**Pune**

**OCTOBER 2019**


वर्ष : १३९

Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

# केसरी

राष्ट्रीय ठेवा

• अंक २७८ • पृष्ठे : १० • चार रुपये • शुक्रवार ११ ऑक्टोबर २०१९, पुणे C (शहर आवृत्ती)


## रस्त्यांवरील मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी शासकीय पातळीवर हालचाली व्हाव्यात

पुणे : देशाच्या कानाकोपऱ्यात विविध रस्त्यांवर फिरणारे लाखो मनोरुग्ण हे आजही उपेक्षित व वंचितच राहिलेले असून, त्यांच्या उपचार व पुनर्वसनासाठी शासकीय पातळीवरून मोठ्या प्रमाणात हालचाली होणे आवश्यक असल्याचे मत श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे संस्थापक व ज्येष्ठ मनोविकार तज्ज्ञ डॉ. भरत वाटवाणी यांनी व्यक्त केले.

मनोदय मेंटल हेल्थ फोरम, कर्वे समाज सेवा संस्थेच्यावतीने देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार डॉ. वाटवाणी यांना देऊन गौरविण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व ज्येष्ठ मनोविकार तज्ज्ञ डॉ. उल्हास लुकतुके यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले. याप्रसंगी कर्वे समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष सदानंद देशपांडे, डॉ. महेश ठाकूर, प्रा. चेतन दिवाण, डॉ. सुप्रकाश चौधरी उपस्थित होते.

डॉ. वाटवाणी पुढे म्हणाले, श्रद्धा पुनर्वसन केंद्राने आतापर्यंत आठ हजारांहून अधिक मनोरुग्णांवर उपचार करून त्यांचे स्वगृही पुनर्वसन केले असून, आजही अनेक मनोरुग्ण रस्त्यांवर आहेत.

या मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न तर व्हावेतच, पण देशातील तरुणांनी व समाजकार्याचे शिक्षण घेणाऱ्या तरुणांनी यासंबंधी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही डॉ. वाटवाणी यांनी केले.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**MAHARASHTRA TIMES**
**Mumbai**

**FEBRUARY 2020**

www.maharashtratimes.com

मटा +TOI : पुण्यात नंबर १

# महाराष्ट्र टाइम्स

पुणे । मंगळवार, ११ फेब्रुवारी २०२० । पाने १८ (पुणे प्लससह) । शहर आवृत्ती । ₹ ५.००

# देशात १० लाख बेघर मनोरुग्ण

## डॉ. भरत वटवानी यांची माहिती; 'बेदखल' पुस्तकाचे प्रकाशन


म. टा. प्रतिनिधी, पुणे

'देशात वीस लाख लोक बेघर आहेत. त्यापैकी पन्नास टक्के म्हणजे दहा लाख लोक मनोरुग्ण आहेत. यातील केवळ आठ हजार जणांचे आतापर्यंत पुनर्वसन झाले आहे,' अशी माहिती भटक्या मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी अथक कार्य करणारे मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वटवानी यांनी सोमवारी दिली. 'मानसिक आजार बरा होऊ शकतो, यावर लोकांचा विश्वास बसत आहे. अंधश्रद्धा दूर होत आहे,' असे त्यांनी सांगितले.

डॉ. वटवानी यांच्या 'अनसीन, अनहर्ड, अनसेड' या मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद ज्येष्ठ पत्रकार आनंद आगाशे यांनी केला असून 'मेनका प्रकाशना'च्या वतीने 'बेदखल' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ मनोविकासतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या हस्ते झाले. नाडकर्णी यांनी डॉ. भरत आणि डॉ. स्मिता वटवानी यांच्याशी संवाद साधला. पत्रकार संघात झालेल्या कार्यक्रमाला आनंद आगाशे, पी. एम. शहा फाउंडेशनचे चेतन गांधी उपस्थित होते.

'रस्त्याच्या कडेला बसलेला मुलगा नारळाच्या करवंटीमधून गटारातील पाणी पिताना आम्ही पाहिला आणि धक्का बसला. आम्ही कसलाही विचार न करता त्याला घेऊन दवाखान्यात आलो. त्याच्यावर उपचार केले. दोन आठवड्यांनी तो इंग्लिशमध्ये बोलू लागला. तो उच्चशिक्षित होता. मानसिक रुग्णांसाठी कोणतीच संस्था काम करत नसल्याचे लक्षात आले आणि हा आजार कोणालाही होऊ शकतो, हे समजल्याने आम्ही हडबडून जागे झालो. तेव्हा या कामाला सुरुवात झाली,' असे वटवानी यांनी सांगितले. 'दहिसरमध्ये दवाखाना सुरू केला; पण आजूबाजूच्या लोकांनी विरोध केला. मोर्चे काढले. समाजाला तुम्ही नको असता, तेव्हा नैराश्य येते. त्या वेळी कच खाल्ली असती; तर कधी डोळ्यात डोळे घालून पाहता आले नसं मानसिक रुग्ण खूप भोळा आणि निराग असतो. ती निरागसता आपल्यातही यावी यावर वटवानी यांनी बोट ठेवले. सुजा देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

अमित रुके




मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वटवानी यांच्या 'बेदखल' पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी झाले. त्या वेळी वटवानी यांनी संवाद साधला.

### 'बेदखल'विषयी...

वटवानी दाम्पत्याने कर्जतजवळ सुरू केलेल्या 'श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशन'च्या माध्यमातून सुमारे सात हजार भटक्या मनोरुग्णांवर उपचार केले असून, त्यांची त्यांच्या कुटुंबीयांशी पुन्हा भेट घडवून आणली आहे. या कार्याची दखल घेऊन वटवानी यांना २०१८ मध्ये 'रॅमन मॅगसेसे' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'श्रद्धा फाउंडेशनचा'चा तीन दशकांतील प्रवास 'बेदखल'द्वारे शब्दबद्ध करण्यात आला असून, रस्त्यावरच्या स्किझोफ्रेनियाग्रस्त रुग्णांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी चालविलेल्या चळवळीची ही स्फूर्तिदायी गाथा आहे.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**LOKMAT**
**Pune**

**FEBRUARY 2020**


लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १२+८=सखी/४ = २४, किंमत : ₹ ४.००

पुणे, मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२०


डॉ. वटवानी यांचा सवाल : आनंद आगाशेलिखित 'बेदखल' पुस्तकाचे प्रकाशन

# आत्ममग्न समाज कधी जागा होणार ?

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : समाजात आजही अनेक लोक वंचित, उपेक्षित आहेत. आपण स्वत:च्याच कोशात इतके अडकलो आहोत, की इतरांचे दु:ख आपल्याला दिसतच नाही. समाजात कमालीची असमानता आहे. सामाजिक बांधिलकी हा आयुष्याचा भाग असला पाहिजे. आत्ममग्न समाज कधी जागा होणार, असा सवाल करत स्किझोफ्रिनिया रुग्णांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत मॅगसेसे पुरस्कारविजेते डॉ. भरत वटवानी यांनी उपस्थितांना अंतर्मुख केले.

डॉ. वटवानी यांच्या 'अनसीन अनहर्ड, अनसेड' या मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद ज्येष्ठ संपादक आनंद आगाशे यांनी 'बेदखल' नावाने केला आहे. मेनका प्रकाशनातर्फे सोमवारी या पुस्तकाचे प्रकाशन झाले. आगाशे, डॉ. वटवानी, डॉ. स्मिता वटवानी या वेळी उपस्थित होते. डॉ. आनंद नाडकर्णी यांनी वटवानी दाम्पत्याशी संवाद साधला.




'बेदखल' पुस्तकाच्या प्रकाशनाप्रसंगी (डावीकडून) डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. स्मिता वटवानी आणि डॉ. भरत वटवानी.

> बाबा आमटे यांना प्रत्यक्ष पाहिल्यावर देवाला भेटल्याची प्रचिती आली आणि वडील भेटल्याचा भास झाला. त्यांचे काम थक्क करणारे होते. त्याक्षणी बाबा माझे प्रेरणास्थान बनले. मोठी स्वप्ने पाहण्याची हिंमत त्यांनी मला दिली. त्यांच्याकडून काम करण्याची ऊर्जा मिळाली. नैराश्य येते तेव्हा बाबांची आठवण आणि कविता साथ देतात. मानसिक आजार बरा होऊ शकतो, यावर लोकांचा विश्वास बसतो आहे. चौकटीबाहेर पडून काम करण्यात खरे आव्हान आहे. मानसिक रुग्ण खूप भोळा, निरागस असतो. ती निरागसता आपल्यातही यावी, असे मनोमन वाटत राहते.
>
> \- डॉ. भरत वटवानी

भारतात सुमारे २० लाख लोक बेघर आणि निराधार आहेत. त्यांपैकी ५० टक्के लोक मनोरुग्ण आहेत. यापैकी आपण केवळ ८,००० लोकांचे पुनर्वसन करु शकलो. आणखी किती लांबचा पल्ला गाठायचा आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

वटवानी म्हणाले, "मी आणि स्मिताने दवाखाना सुरु करुन काही दिवसच झाले होते. एक मनोरुग्ण तरुण रस्त्याच्या कडेला बसलेला दिसला. तो स्वत:शी बोलत होता, बाजूच्या गटारातील पाणी पीत होता. आम्ही त्याला घेऊन दवाखान्यात आलो. त्याच्यावर उपचार केले. दोन आठवड्यांनी तो व्यवस्थित बोलू लागला. तो पदवीधर होता. वडिलांना पत्र लिहिल्यावर ते हैदराबादहून विमानाने त्याला घ्यायला आले. मानसिक आजार कोणालाही होऊ शकतो, हे त्या वेळी लक्षात आले आणि मनोरुग्णांसाठी काम सुरु करण्याचे ठरविले. सुरुवातीला दहिसरमध्ये जागा घेऊन दवाखाना सुरु केला. मात्र, आजूबाजूच्या लोकांनी विरोध केला, मोर्चे काढले. समाजाला तुम्ही नको असता, तेव्हा नैराश्य येते." त्या वेळी खच खाल्ली असती तर कधीच मनोरुग्णांच्या डोळ्यांत डोळे घालून पाहता आले नसते, डॉ. वटवानी म्हणाले.

**MAHARASHTRA**
**News**


**MARATHI**

**SAKAL**
**Pune**

**FEBRUARY 2020**

पुणे । मुंबई । कोल्हापूर । नाशिक । औरंगाबाद । सोलापूर । नागपूर । सातारा । जळगाव । नांदेड । अकोला येथून प्रसिद्ध

SakalNews | @SakalMediaNews | www.esakal.com | Call Centre : 9225800800



अनेकांना कॉपीस मदत
उद्धव ठाकरे यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत अनेकांना कॉपी करण्यास मदत केल्याचा 'गौप्यस्फोट' केला.
५

# सकाळ

जीवनपट पडद्यावर
इन्फोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्ती आणि त्यांच्या पत्नी सुधा मूर्ती यांचे जीवन लवकरच रुपेरी पडद्यावर येणार आहे.
७



पुणे, मंगळवार, ११ फेब्रुवारी २०२० | किंमत ₹ ५ ● आजचा अंक : पुणे शहर : पाने २० (१०+१०), पिंपरी-चिंचवड : पाने १८ (१०+८)

# समाजानेच आता मनोरुग्णांजवळ पोचायला हवे

## मानसोपचार तज्ज्ञ डॉ. भरत वटवानी यांची अपेक्षा; 'बेदखल' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे, ता. १० :** कोट्यवधी लोक गरीब आहेत. लाखो लोक गंभीर मानसिक आजाराने पछाडलेले आहेत. आम्ही काही हजार मनोरुग्णांपर्यंत पोचलो; परंतु लाखो लोकांपर्यंत कुणीही पोचलेले नाही. त्यामुळेच आता समाजाने अशा कामांसाठी पुढाकार घेतला पाहिजे, अशी अपेक्षा मॅगसेसे पुरस्कार विजेते मानसोपचार तज्ज्ञ डॉ. भरत वटवानी यांनी केले.

डॉ. वटवानी यांनी लिहिलेल्या 'अनसीन, अनहर्ड, अनसेड' या इंग्रजी पुस्तकाचे 'बेदखल' या नावाने अनुवाद झाला असून,त्याचे आज प्रकाशन झाले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी डॉ. आनंद नाडकर्णी यांनी डॉ. भरत आणि त्यांच्या पत्नी डॉ. स्मिता यांच्याशी संवाद साधला. मनोरुग्णांना पुन्हा सामान्य करण्यासाठी खूपच असतो. त्यातून अनेक तरुण आमच्याशी जोडले गेले. हे काम मोठे होण्यात त्यांचेही योगदान महत्त्वाचे आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

वटवानी म्हणाले, "दहिसर येथे जागा घेतली त्या वेळी खूप विरोध झाला. आमचे काम बंद करण्यासाठी आंदोलन झाले; पण आम्ही थांबलो नाही. काम सुरू ठेवले. रस्त्यावरील मनोरुग्णांना आधार देत राहिलो."

बाबा आमटे यांचा आशीर्वाद मिळाला. काम मोठे करण्यात त्यांची प्रेरणाही आहे, असे सांगताना डॉ. भरत वटवानी म्हणाले, "आनंदवनात गेलो. तिथे जे काही पाहिले, त्यानंतर डोळ्यातले अश्रू थांबतच नव्हते, एवढं मोठे काम त्यांनी केले. नंतर हेमलकसा येथे गेलो. त्या वेळी




**पत्रकार भवन, नवी पेठ : डॉ. भरत वटवानी यांनी लिहिलेल्या 'बेदखल' या अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी झाले. याप्रसंगी बोलताना डॉ. वटवानी. शेजारी डॉ. स्मिता वटवानी व डॉ. आनंद नाडकर्णी.**

वेळी बाबांनी मला सांगितले, की छोटे काही करू नको, मोठा विचार करा. तोच विचार केला आणि कर्जतचे काम ही स्थिती खूप वाईट असते; पण ते बरे होऊन त्यांच्या कुटुंबात जातात, तेव्हा त्यांचाही आनंद मोठा असतो. आणि गटारीचे पाणी पिणाऱ्या एका मनोरुग्ण माणसाने आम्हाला हे काम करण्याची प्रेरणा दिली. त्याचे वडील जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी होते. तोही शिकलेला होता. याचा अर्थ मानसिक आजार जडू शकतो, याचा विचार कुणी करीत नाही, असे त्यांनी सांगितले. स्मिता वटनानी म्हणाल्या, "कर्जतमध्ये मोकळी जागा घेतली. तिथे रुग्णांवर उपचार करता आले आणि कामही मोठे झाले."

या पुस्तकाचा अनुवाद आनंद आगाशे यांनी केला आहे.

डॉ. नाडकर्णी म्हणाले, "आपण डॉ. प्रकाश आमटे, डॉ. भरत वटवानी होऊ शकत नाही; पण आपण आपल्या कोषात आणि भूमिकांमध्ये रमलेले असतो. या कोषातून बाहेर

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAKAL**
**Nasik**

**FEBRUARY 2020**




राहुल आवारेला ब्राँझ
रिपेजेसमधून ब्राँझपदकाची लढत खेळण्याची संधी मिळालेल्या महाराष्ट्राच्या मराठमोळ्या राहुल आवारेने ब्राँझपदक मिळविले. १२

सकाळ

न्यायसंस्था पुरोगामी, सक्रिय
सर्वोच्च न्यायालयाने कायमच सक्रिय आणि पुरोगामी भूमिका निभावली आहे, असे कौतुकोद्गार राष्ट्रपती कोविंद यांनी काढले. ११

■ नाशिक, सोमवार, २४ फेब्रुवारी २०२०

किंमत ₹ ४ ● पाने १८ (१२+६)


# देशात रस्त्यांवर दहा लाख व्यक्ती बेवारस

## डॉ. वाटवाणी : मानसिक रुग्णांना उपचाराची गरज, आखीव धोरणाचा अभाव

सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. २३ : आज देशभरातील रस्त्यांवर दहा लाख व्यक्ती बेवारस जीवन जगत असून, त्यांना उपचाराची गरज आहे. तमिळनाडू सरकारमार्फत प्रत्येक जिल्ह्यातून पाच मनोरुग्ण उपचारासाठी 'श्रद्धा' स्वयंसेवी संस्थेकडे पाठविले जाऊ लागले आहेत. महाराष्ट्रात मानसिक आजारांवर जागरूकता निर्माण होण्यास मनोरुग्णांना प्रभावी उपचार उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने ठोस धोरण आखण्याची गरज आहे, असे मत मॅगसेसे पुरस्कारप्राप्त डॉ. भरत वाटवाणी यांनी 'सकाळ'शी बोलताना व्यक्त केले.**

आयएमए हॉल : इंडियन मेडिकल असोसिएशन, नाशिक शाखेतर्फे रविवारी झालेल्या 'रिफ्रेशकॉन-२०२०'मध्ये सहभागी राज्यभरातील डॉक्टर.

डॉ. वाटवाणी म्हणाले, की मानसिक आजार ही जागतिक समस्या असून, प्रगत देशांमध्येही प्रमाण वाढत चालले आहे. 'श्रद्धा' संस्थेशी आज १४ शासकीय मनोचिकित्सक रुग्णालये, ४३ स्वयंसेवी संस्था जोडल्या गेल्या आहेत. आज देशभरातील रस्त्यांवर दहा लाख व्यक्ती बेवारस जीवन जगत असून, त्यांना उपचाराची गरज आहे. त्यांच्या मदतीसाठी प्रत्येक शहरात स्वयंसेवी संस्थांचे कार्य उभे राहावे. आमची संस्था अशा व्यक्तींचे समुपदेशन करताना, त्यांच्या कुटुंबाशी भेट घडविण्याचे काम कुशलपणे करू शकते. त्यामुळे आता अशा व्यक्तींवर प्रभावी उपचार करणाऱ्या व्यक्ती, संस्थांनी पुढे येण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.

### आयएमएतर्फे कार्यशाळा

शालिमार येथील आयएमए सभागृहात इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) नाशिक शाखेतर्फे दोनदिवसीय 'रिफ्रेशकॉन-२०२०' कार्यशाळा होत आहे. कार्यशाळेत डॉ. भारत मोटवाणी, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. हरीश शेट्टी, आयएमए नाशिक शाखेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत देवरे, उपाध्यक्ष डॉ. हेमंत सोननीस, सचिव डॉ. विशाल गुंजाळ, माजी अध्यक्ष डॉ. आवेश पलोड, डॉ. किरण शिंदे, डॉ. विशाल पवार आदी उपस्थित होते. डॉ. वाटवाणी यांनी सादरीकरणातून आपल्या संस्थेचे कार्य, वाटचाल उलगडून सांगितली. बदलत्या जीवनमानामुळे मानसिक आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळे प्रत्येक सात व्यक्तींमागे एक मानसिक रुग्ण आहे.

वाढत चाललेल्या मानसिक आराजांचा धोका ओळखत वेळीच मानसिक स्वास्थ्य सुधरविण्यासाठी प्रयत्न होण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. हरीश शेट्टी यांनी सांगितले. डॉ. देवरे यांनी प्रास्ताविकात 'सुदृढ समाजासाठी, सुदृढ डॉक्टर' या संकल्पनेवर आधारित राबविलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी डॉ. लाला फिलिप्स यांनी 'कर व डॉक्टर' या विषयावर, डॉ. हिमेश गांधी यांनी 'प्रोस्ट्रेट कॅन्सर व रोबोटिक शस्त्रक्रियेची भूमिका', डॉ. तुषार चौकसी यांनी 'मोबाईल व अन्य गॅजेटचा उपयोग' याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. दिनेश किश्ती, डॉ. प्रशांत पाचोरे, गुंजन कुलकर्णी आणि डॉ. मदन कटारिया यांनीही सहभागी डॉक्टरांशी संवाद साधला.

### 'श्रद्धा' संस्थेमार्फत डॉ. वाटवाणींचे कार्य

डॉ. भरत वाटवाणी यांना २०१८ मध्ये मॅगसेसे पुरस्कार मिळाला असून, अनेक हरवलेल्या मानसिक रुग्णांना त्यांनी रस्त्यावरून शोधून घरी सोडणे, उपचार करणे व त्यांना आधार देण्याचे कार्य केले आहे. हे कार्य ते श्रद्धा स्वयंसेवी संस्थेमार्फत करतात. १९८८ पासून त्यांचे कार्य सुरू असून, आठ हजारांहून अधिक रस्त्यावर फिरणाऱ्या मनोरुग्णांना त्यांनी कुटुंबीयांमध्ये परत पाठविले आहे.

### अपघातांपेक्षा आत्महत्यांचे वाढते प्रमाण घातक : डॉ. शेट्टी

देशाच्या लोकसंख्येपैकी २० कोटी व्यक्तींना कुठल्या न कुठल्या स्वरूपाचा मानसिक आजार आहे, तर उपचारार्थ उपलब्ध मानसोपचारतज्ज्ञांची संख्या अवघी सहा हजार आहे. विभक्त कुटुंबपद्धतीसह बदललेल्या जीवनमानामुळे मानसिक आजारांचे प्रमाण वाढत आहे. अपघातांमध्ये मृत पावणाऱ्या व्यक्तींपेक्षाही अधिक आत्महत्या करणाऱ्या व्यक्तींची संख्या झालेली असल्याचे डॉ. हरीश शेट्टी यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या तुलनेत गृहिणी, चाकरमान्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे. या आव्हानाला तोंड देण्यासाठी मानसिक स्वास्थ्य योजना राबविण्याची आवश्यकता आहे. तसेच मानसिक आजारांच्या जनजागृती व प्रभावी उपचारासाठी प्रशासकीय स्तरावर जिल्हापातळीवर आरोग्याधिकाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**PUDHARI Aurangabad**

**MARCH 2020**


पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

औरंगाबाद

रविवार । दि. १५ मार्च २०२० । वर्ष ४, अंक ६८


# सोयगावच्या बेपत्ता तरुणीचा वर्षानंतर शोध

## बंगळुरूमध्ये उपचार केल्यानंतर सेवाभावी संस्थेने केले आई-वडिलांच्या स्वाधीन

वरठाण (ता. सोयगाव, जि. औरंगाबाद), पुढारी वृत्तसेवा : येथील बेपत्ता झालेल्या एका गतिमंद २७ वर्षीय तरुणीचा शोध तब्बल एक वर्षानंतर लागल्याने कुटुंबीयांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. प्रकृती ठणठणीत झालेली मुलगी घरी आल्यानंतर तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. कर्नाटकची राजधानी बंगळुरू येथील एका सेवाभावी संस्थेने या कामी मोठी भूमिका निभावली.

वरठाण येथील २७ वर्षीय गतिमंद तरुणी एक वर्षापूर्वी गावातील बसस्थानकातून बेपत्ता झाली होती. रात्री उशिरापर्यंत ती घरी परत न आल्याने घरच्या लोकांनी तिचा परिसरासह नातेवाईकांकडे शोध घेणे सुरू केले. घरचे लोक दररोज तिचा शोध घेत होते. मात्र, चार महिने शोध घेऊनही तिचा शोध लागला नाही. गतिमंद असल्यामुळे आपल्या मुलीला साधे मराठी देखील बोलता येत नाही. त्यामुळे तिचा शोध लागणे आता कठीण आहे, असे समजून घरच्या लोकांनी तिचा शोध घेणे बंद केले. दरम्यान, ही तरुणी फिरत-फिरत चार महिन्यांपूर्वी कर्नाटकमधील बंगळुरूच्या रेल्वेस्थानकावर श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्या सदस्यांना आढळून आली. तिची चौकशी केल्यानंतर ती गतिमंद असल्याचे संस्थेच्या सदस्यांच्या लक्षात आले. त्यानंतर तिला त्यांनी संस्थेच्या कर्जत येथील मनोरुग्ण चिकित्सालयात दाखल केले. या ठिकाणी तिच्यावर काही महिने उपचार करण्यात आले. त्यानंतर तिची मन:स्थिती सुधारली. यामुळे तिला बोलता येऊ लागले. आई-वडिलांसह गावाचे नावही आठवले. दरम्यान, या तरुणीला संस्थेच्या सदस्यांनी एका वाहनातून १४ मार्च रोजी तिच्या वरठाणगावी आणले.




वरठाण : गतिमंद तरुणीला याच वाहनातून आणण्यात आले.

**देशभरात फिरणाऱ्या निराधार मनोरुग्णांचा शोध घेत त्यांच्यावर उपचार करून त्यांना त्यांच्या आई-वडिलांच्या स्वाधीन करण्याचे सामाजिक काम गेल्या अनेक वर्षांपासून श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशन ही सेवाभावी संस्था करत आहे. या कामासाठी ही संस्था कुठलेही शुल्क आकारत नाही. वरठाण येथे ज्या वाहनातून तरुणीला आणण्यात आले, त्यात मराठवाड्यातील जालना, परभणी, परतूरसह विदर्भातील अमरावती आणि वाशिम जिल्ह्यांतील बरे झालेले अनेक तरुण-तरुणी होत्या, अशी माहिती गावकऱ्यांनी दिली.**


**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAKAL**
**Mumbai**

**MARCH 2023**

मुंबई । पुणे । कोल्हापूर । नाशिक । छत्रपती संभाजीनगर । सोलापूर । नागपूर । सातारा । जळगाव । नांदेड । अकोला । सांगली । अहमदनगर येथून प्रसिद्ध
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com



**धैर्यशील भाजपमध्ये**
पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या उपस्थितीत मंगळवारी भाजपमध्ये प्रवेश केला.
वृत्त : ५

सकाळ

**वानखेडेवर पुतळा**
सचिन तेंडुलकरच्या ५०व्या वाढदिवसानिमित्त एमसीएने वानखेडे स्टेडियम येथे त्याचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे.
वृत्त : ९

मुंबई, बुधवार, १ मार्च २०२३
किंमत ₹ ५ ● आजचा अंक

वेध — नितीन पाटील

# मनोरुग्णांचे 'श्रद्धा'स्थान!

**माणसांवरील नितांत श्रद्धेतून सेवेचा मार्ग स्वीकारलेल्या डॉ. भरत वाटवानी आणि डॉ. स्मिता वाटवानी या डॉक्टर दाम्पत्याने मनोरुग्णांची नुसती सेवाच केली नाही, तर देशभरातील हजारो मनोरुणांना सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग मिळवून दिला आहे. हजारो मनोरुग्णांच्या वेदनांवर मायेची फुंकर घालून त्यांच्या आयुष्यात आनंद पेरण्याचे काम श्रद्धा फाऊंडेशनच्या माध्यमातून करीत असून, कर्जत येथील हे केंद्र मनोरुग्णांचे 'श्रद्धा'स्थानच बनले आहे.**

डॉ. मोटवानी यांचा जन्म कोलकात्यातील. घरची प्रचंड गरिबी, त्यातच लहानपणी वडिलांचे छत्र हरपले. पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांनी मुंबईची वाट धरली. कसेबसे काम करून ते शिकले आणि मानसोपचारतज्ज्ञ म्हणून डॉक्टरी मिळवली. पुढे त्यांचे लग्नही मानसोपचारतज्ज्ञ असलेल्या स्मिता यांच्याबरोबर झाले. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांनी चार दशकांपूर्वी बोरिवलीत एका भाड्याच्या जागेत क्लिनिक सुरू केले, परंतु त्यांचा पिंड केवळ दवाखाना चालवून अर्थार्जन करण्यापुरताच मर्यादित नव्हता.

१९८८ मधील गोष्ट. एक दिवस दुपारच्या वेळी दवाखान्यातील काम संपवून डॉ. भरत आणि डॉ. स्मिता जेवणासाठी बोरिवलीतीलच शेजारच्या एका हॉटेलमध्ये गेले. अचानक त्यांचे लक्ष रस्त्याच्या कडेने वाहणाऱ्या गटाराकडे गेले. तेथे एक मनोरुग्ण तरुण नारळाच्या करवंटीने गटारातील पाणी पीत असल्याचे त्यांनी पाहिले. तोच प्रसंग 'श्रद्धा फाऊंडेशन'ला जन्म देणारा ठरला. गटारातील पाणी पिणाऱ्या मनोरुग्णाला पाहून दोघेही प्रचंड अस्वस्थ झाले. ते त्याच्याजवळ गेले. त्याच्या डोक्यावर मायेचा हात ठेवून त्याला दवाखान्यात नेले. स्वच्छ केले, नवीन कपडे दिले, पोटभर खायला दिले आणि त्याच्यावर इलाज सुरू केला. पुढील काही दिवसांतच तो मनोरुग्ण त्या अवस्थेतून बऱ्यापैकी बाहेर आला. डॉक्टरांच्या लक्षात आले, की तो उत्तम इंग्रजी बोलतोय. चौकशी करताना डॉक्टरांना



कर्जत येथील श्रद्धा फाऊंडेशनचे मनोरुग्ण उपचार व पुनर्वसन केंद्र.

कळले, की तो उच्च विद्याविभूषित बी.एस्सी., डी.एम.एल.टी. पदवीप्राप्त कुशाग्र बुद्धिमत्तेचा होता. फक्त डोक्यावर परिणाम झाल्याने तो मजल दरमजल करत आंध्र प्रदेशातून मुंबईत पोहोचला होता. त्याचे वडीलही आंध्र प्रदेशमध्ये शासकीय सेवेत अधिकारी होते. डॉक्टरांनी त्याच्याकडून पत्ता घेत आंध्र प्रदेशमधील त्याच्या आई-वडिलांशी संपर्क साधला. ते त्वरित विमानाने मुंबईत आले. त्या माऊलीने आपल्या मुलाला मिठीत घेतल्यानंतर तिच्या चेहऱ्यावरील आनंद आणि व्यक्त केलेली श्रद्धापूर्वक सेवेसाठीची कृतज्ञता डॉक्टर दाम्पत्याला हत्तीचे बळ देऊन गेली.

पुढे डॉक्टरांनी त्यांच्या क्लिनिकमधील दोन बेड खास मनोरुग्णांसाठीच राखीव ठेवले. एक दिवस जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थ्यांची डॉक्टरांशी भेट झाली. तेव्हा त्यांनी डॉक्टरांना सांगितले, की त्यांचे एक प्रोफेसर मनोरुग्ण होऊन रस्त्यावर भटकत आहेत. डॉक्टरांनी त्वरित त्यांचा शोध घेतला. त्यांना आपल्या दवाखान्यात आणले. उपचार सुरू झाला. आपल्या गुरूंना भेटण्यासाठी अनेक विद्यार्थी डॉक्टरांच्या क्लिनिकमध्ये येत होते. प्रोफेसर पूर्ण बरे झाले. पुन्हा ते सेवेत रुजू झाले. तोपर्यंत डॉक्टरांच्या सेवा कार्याचा विस्तार होत होता. जागा कमी पडत होती, पण प्रश्न पैशांचा होता! म्हणून डॉक्टर वाटवानी करीत असलेल्या कार्यास हातभार लावण्यासाठी त्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी 'श्रद्धा फाऊंडेशन'च्या मदतीसाठी जहांगीर आर्ट गॅलरीत चित्रांचे प्रदर्शन भरवले. तिथून मिळालेल्या मदतीतून डॉक्टरांनी १९९७ मध्ये दहिसर कांदरपाडा येथे एका जुन्या इमारतीत वीस बेडचे 'मनोरुग्ण उपचार व पुनर्वसन केंद्र' सुरू केले. व्रत सेवेचे असले तरी मार्ग खडतरच होता. तेथील लोकांनी डॉक्टरांनी सुरू केलेल्या या केंद्राला प्रखर विरोध करण्यास सुरुवात केली. पत्रकबाजी सुरू झाली, मोर्चे निघाले, आंदोलने झाली, अखेर प्रकरण न्यायालयात गेले. न्यायालयाने समर्पित भावनेने करीत असलेल्या सेवेच्या बाजूने निकाल दिला.

रस्त्यावर, रेल्वे- बस स्थानक, मैदाने, बाजारपेठा अशा अनेक ठिकाणी फिरणाऱ्या, बसलेल्या, झोपलेल्या मनोरुग्णाला विश्वास देऊन त्यांना आपल्या पुनर्वसन केंद्रात आणले जाते. त्यांच्यावर उपचार करून बरे झालेल्या रुग्णांना त्यांच्या घरापर्यंत पोहोचवण्याचे काम या डॉक्टर दाम्पत्याचे सहकारी करीत आहेत.

एकदा डॉ. भरत आणि डॉ. स्मिता वर्धा येथे मनोरुग्णांना सोडण्यास गेले असताना त्यांनी बाबा आमटे यांची भेट घेतली. बाबांकडून समाजसेवेची प्रेरणा घेऊन पुनर्वसन केंद्रासाठी मोठी जागा शोधण्यास त्यांनी सुरुवात केली. अखेर रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील वेनगाव येथे त्यांनी साडेसहा एकर प्रशस्त जागेत 'श्रद्धा फाऊंडेशन'चे मनोरुग्ण उपचार व पुनर्वसन केंद्र सुरू केले. २००६ मध्ये डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते त्या पुनर्वसन केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले.

कर्जत येथील मनोरुग्ण उपचार व पुनर्वसन केंद्र केवळ मुंबई व लगतच्या जिल्ह्यात आढळणाऱ्या मनोरुग्णांसाठी सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग दाखवणारा दीपस्तंभच नाही, तर माणूसपण हरवलेल्यांना माणसात आणणारा आधारवड ठरले आहे. आज कर्जत येथील केंद्रात डॉक्टर, नर्स, सोशल वर्कर आणि इतर मदतनीस असे मिळून सुमारे ५० जण मनोरुग्णांच्या सेवेत कार्यरत आहेत. तेथे आजही १२० रुग्ण उपचार घेत आहेत. २००६ पासून आजवर तब्बल ९५०० मनोरुग्णांना पूर्णतः बरे करून त्यांना त्यांच्या मायेच्या माणसांकडे पोहोचवण्याचे फार मोठे काम डॉ. वाटवानी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे. देशभरातील अगदी कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत जवळजवळ सर्वच राज्यांमध्ये 'श्रद्धा फाऊंडेशन'चे अविरत कार्य सुरू आहे. या देवदूताची ख्याती केवळ आपल्या देशातच नव्हे, तर सातासमुद्रापलीकडे पोहोचली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या 'मॅगसेसे पुरस्कारा'ने २०१८ मध्ये डॉ. भरत वाटवानी यांना गौरवण्यात आले आहे. बोरिवलीत सुरू झालेला हा सेवेचा यज्ञ संपूर्ण देशभर फिरत मनोरुग्णांच्या सेवेत कार्यरत आहे. २०१९ मध्ये एका वर्षात १११४; तर लॉकडाऊनचा काळ वगळता २०२२ मध्ये केवळ एका वर्षात १०३० मनोरुग्णांना पूर्णतः बरे करून सुखरूप त्यांच्या घरी पोहोचवले यातच श्रद्धा फाऊंडेशनच्या कार्याची महती दडलेली आहे. वुई-टुगेदर फाऊंडेशनची धान्य बँक श्रद्धा फाऊंडेशनला धान्य पुरवून त्यांच्या कार्यात खारीचा वाटा उचलत आहे. त्याचबरोबर काही सामाजिक संस्था/ व्यक्तीदेखील या संस्थेच्या कार्याला हातभार लावत आहेत.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)
np.nitin100@gmail.com

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAKAL**
**Yavatmal**

**APRIL 2023**

सकाळ
यवतमाळ
मंगळवार, ४ एप्रिल २०२३
SakalNews
@SakalMediaNews
www.esakal.com

# TODAY

## ३१ बेघर पोहोचतील राज्याबाहेरील आपल्या घरी

### रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वाटवाणी यांनी साधला संवाद

▸ सकाळ वृत्तसेवा

यवतमाळ, ता. ३ : रस्त्यावर भटकणाऱ्या व उपेक्षेचे जीवन जगणाऱ्या बेघर मनोरुग्णांना नंदादीप फाउंडेशनमुळे हक्काचा निवारा मिळाला आहे. भगीरथ पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी आलेले रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते तथा श्रद्धा फाउंडेशनचे डॉ. भरत वाटवाणी यांनी सोमवारी (ता. तीन) येथील बेघर निवारा केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी निवारा केंद्रातील व्यक्तींसोबत संवाद साधत विचारपूस केली. तसेच बरे झालेल्या ३१ बेघरांना राज्याबाहेर असलेल्या त्यांच्या निवासस्थानी पोहोचविण्याचा संकल्प केला.

नंदादीप फाउंडेशन गेल्या सहा ते सात वर्षापासून रस्त्यावर भटकणाऱ्या मनोरुग्णांसाठी राबत आहे. यवतमाळ नगरपालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी माधुरी मडावी यांच्या पुढाकारातून निवारा केंद्राला जागा मिळाली. गेल्या वर्षी १४ एप्रिलपासून सुरू झालेल्या निवारा केंद्रात २२३ मनोरुग्णांना निवारा मिळाला. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्रीकांत मेश्राम यांच्या औषधोपचारामुळे आतापर्यंत बरे झालेल्या ८६ व्यक्तींना देशभरातील विविध राज्यांत त्यांच्या घरी पोहोचवून देण्यात आले आहे. विशेष म्हणजे संदीप शिंदे यांच्या एका हाकेला डॉ. मेश्राम यांच्यासह अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. प्रशांत कसारे, डॉ. अमर सुरजुसे, डॉ. कविता बोरकर, डॉ. प्रवीण राखुंडे धावून जातात. सामाजिक जाणीव असलेल्या दात्यांचीही मदत मिळते. रस्त्यावर आयुष्याची वाट चुकलेल्या रुग्णांना निवारा केंद्रात आणले. त्यावेळी त्यांना कोणत्याही प्रकारचे भान नव्हते. मात्र, संदीप व नंदिनी शिंदे या दाम्पत्याने मनोरुग्णांचा मनोभावे स्वीकार करून त्यांची सेवा केली. डॉ. भरत मोटवाणी यांनी प्रत्यक्ष या केंद्राला भेट देत दीडशे बांधवांची पाहणी केली. कुणावर कोणते उपचार सुरू आहेत. औषधोपचारांची माहिती जाणून घेतली. नेपाळपासूनचे बेघर निवारा केंद्रावर असल्याचे बघून डॉ. मोटवाणी भाऊक झालेत. ठणठणीत बरे झालेल्या ३१ जणांना त्यांच्या घरी पोहोचविण्यासाठी कर्जत येथील श्रद्धा फाउंडेशन पदरात घेत असल्याचा शब्द दिला.



**यवतमाळ : बेघर निवारा केंद्रातील व्यक्तींसोबत संवाद साधताना रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वाटवाणी.**

### सेवाभावी कार्याचा गौरव

▪ यवतमाळ येथील ज्येष्ठ नागरिक भवनात रविवारी (ता.दोन) डॉ. भरत मोटवाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत भगीरथ पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. अध्यक्षस्थानी समाजसेवक बळवंत चिंतावार होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रशांत चक्करवार, डॉ. मनोज पांडे आदी मान्यवर उपस्थित होते. आर्णी तालुक्यातील मातोश्री सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रमाचे खुशाल नागपुरे यांना भगीरथ पुरस्कार २०२३ने सन्मानित करण्यात आले. संकल्प फाउंडेशन, तेजस्विनी सेवा समिती, ओवी ट्रस्टचा विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

MAHARASHTRA
News

MARATHI

LOKMAT
Mumbai

MAY 2023

***
मुंबई । मंगळवार
३०.५.२०२३
किंमत : ₹ ५ ▪ वर्ष : २६ अंक : ३० ▪ पृष्ठे : १२+४= १६
आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ६८६२३/१९९८
www.lokmat.com
epaper.lokmat.com

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

कर्जतच्या पुनर्वसन केंद्राचा आधार : दोन दिवसांत २१ रुग्ण घरी परतले

# ३५ वर्षांत देशभरातील ९,३६० मनोरुग्णांची कुटुंबीयांशी भेट



बिहारमधील दहा रुग्णांना त्यांच्या मूळ गावी घेऊन जात असताना श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे स्वयंसेवक.

नामदेव मोरे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** कर्जतमधील श्रद्धा पुनर्वसन केंद्र देशभरातील मनोरुग्णांसाठी आधार ठरत आहे. रस्त्यावर भटकणाऱ्या रुग्णांवर उपचार करून त्यांच्या कुटुंबीयांशी भेट घडवून आणली जात आहे. दोन दिवसांमध्ये केंद्रातील २१ रुग्णांना बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगालसह जळगावमधील त्यांच्या मूळ घरी पाठविण्यात आले आहे. ३५ वर्षांत तब्बल ९,३६० रुग्णांची त्यांच्या कुटुंबीयांशी भेट घडवून आणण्यात आली आहे.

मनोरुग्ण मोठ्या संख्येने आढळू लागले आहेत. उपचार करून त्यांची कुटुंबीयांशी भेट घडवून आणण्याचे काम १९८८ पासून सामाजिक कार्यकर्ते डॉ. भरत वाटवाणी व डॉ. स्मिता वाटवाणी करत आहेत. संस्थेच्या कर्जत मधील केंद्रात नियमित १२५ ते १५० रुग्णांवर उपचार केले जात आहेत. उपचार पूर्ण झालेल्या १० रुग्णांना रविवारी बिहारमधील त्यांच्या मूळ गावी पाठविले. उत्तर प्रदेशमधील ६ रुग्णांचीही परिवाराची भेट घडवून आणली. सोमवारी पश्चिम बंगालमधील ४ व जळगावमधील एका रुग्णास त्याच्या मूळ घरी पाठविण्यात आले.

**कुटुंबीयांशी भेट घडवून आणलेले रुग्ण**



गावी पाठविल्यानंतरही रुग्णाच्या संपर्कात राहून त्यांना औषधे पाठविली जात आहेत.

संस्थेने आतापर्यंत ३५ वर्षांत तब्बल ९,३६० रुग्णांना त्यांच्या परिवाराशी भेट घडवून आणली आहे. इराणचा १ व नेपाळच्या ११५ रुग्णांवर आतापर्यंत उपचार केले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | : २,०८० | झारखंड | : ३११ |
| बिहार | : १,१३७ | कर्नाटक | : ३५६ |
| उत्तर प्रदेश | : १,४१२ | केरळ | : ५५ |
| आंध्र प्रदेश | : ४८७ | मध्य प्रदेश | : ७६३ |
| अंदमान निकोबार | : १ | मणिपूर | : २ |
| अरुणाचल प्रदेश | : ३ | मिझोराम | : १ |
| आसाम | : १३८ | नागालँड | : ४ |
| छत्तीसगड | : २७० | ओडिशा | : ३६४ |
| दादरा नगर हवेली | : २ | पाँडेचेरी | : ४ |
| दमण दीव | : ३ | पंजाब | : १०३ |
| दिल्ली | : ६१ | राजस्थान | : २४३ |
| गोवा | : १३ | तमिळनाडू | : २५७ |
| गुजरात | : २७२ | तेलंगणा | : १२४ |
| हरयाणा | : ९६ | त्रिपुरा | : १४ |
| हिमाचल प्रदेश | : २० | उत्तराखंड | : ४० |
| जम्मू कश्मीर | : ८ | पश्चिम बंगाल | : ५८६ |

रुग्णांच्या घरापर्यंत संस्थेचे समाजसेवक रुग्णाच्या सोबत जातात.

BANGLADESH REUNION COVERAGE – 1

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**MAHARASHTRA TIMES Mumbai**

**JULY 2023**


रविवार

www.maharashtratimes.com

मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र

महाराष्ट्र टाइम्स

www.matagold.in

मुंबई । रविवार, २३ जुलै २०२३ । पाने १४ + संवाद । शहर आवृत्ती ** । ₹ ५.०० किंवा ८.०० द टाइम्स ऑफ इंडियासहित वर्ष : १३ अंक : ३०


# २१ वर्षांनी मनोरुग्णाची कुटुंबाशी पुनर्भेट


शर्मिला कलगुटकर

sharmila.kalgutkar@timesgroup.com


## भारत-बांगलादेशाच्या सीमा ओलांडून मानवता जिंकली



**मुंबई :** मानसिक व्याधी असलेल्या काही व्यक्ती घरापासून, कुटुंबापासून दुरावतात. कधी आजारपणामुळे तर कधी विस्मृतीमुळे त्यांना परतीची वाट गवसत नाही. अशाच हरवलेल्या मनोरुग्णांना आधार देऊन त्यांचे पुर्नवसन करणाऱ्या मॅगेसेसे विजेत्या डॉ. भारत वाटवानी यांच्या 'श्रद्धा फाऊंडेशन' या संस्थेने बांग्लादेशहून आलेल्या एका रुग्णाला त्याचे कुटुंब पुन्हा मिळवून दिले. शनिवारी त्याची कुटुंबाकडे सुखरूप पाठवणी करण्यात आली. तब्बल २१ वर्षांनी हा रुग्ण त्याच्या कुटुंबाकडे परतला आहे. जून महिन्यामध्ये भारत-बांग्लादेश सीमारेषेपर्यंत जाऊनही तांत्रिक कारणामुळे या रुग्णाला पुन्हा भारतात आणावे लागले होते. तरीही 'श्रद्धा पाऊंडेशन'च्या टीमने पाठपुरावा करत त्याला परत पाठवले आहे.

चार वर्षांपूर्वी कर्जतमध्ये रस्त्यावर विमनस्क अवस्थेमध्ये भटकत असलेल्या या (पान ५वर)


# २१ वर्षांनी मनोरुग्णाची कुटुंबाशी पुनर्भेट


(पान एकवरून) रुग्णाला 'श्रद्धा फाऊंडेशन'च्या आरोग्यदूतांनी केंद्रामध्ये आणले. तिथे त्याची काळजी घेण्यासह वैद्यकीय उपचारही सुरू झाले. तो थोडा स्थिरावल्यावर त्याच्याकडे कुटुंबासंदर्भात विचारणा करण्यात आली. मात्र, त्याला नीट सांगता येत नव्हते. भाषेचा अडसर होता. संस्थेतील बंगाली भाषा समजून शकणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनाही त्याच्या उच्चाराचे आकलन होत नव्हते. गिरीश कुलकर्णी यांच्या स्नेहालय या संस्थेने आयोजित केलेल्या एका सद्‌भावना रॅलीमध्ये काही आरोग्यदूत बांगलादेश येथे गेले होते. या देशातील काही विद्यार्थ्यांना त्यांनी त्यावेळी भारतात निमंत्रित केले. हे विद्यार्थी जेव्हा भारतात आले, तेव्हा 'श्रद्धा फाऊंडेशन'च्या कार्यकर्त्यांनी त्यांना व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून जोडून दिले. त्यावेळी हा रुग्ण बांग्लादेशमधील असल्याचे लक्षात आले. या विद्यार्थ्यांनी पुन्हा मायदेशी गेल्यानंतर त्याच्या पालकांचा शोध घेतला.

२००२मध्ये स्क्रिझोफ्रेनियाबाधित असलेला हा रुग्ण घर सोडून निघून गेला होता. त्याची पुन्हा मायदेशी पाठवण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर, सैन्यदलात अनेक वर्षे सेवा दिलेल्या त्याच्या वडिलांनी आवश्यक सर्व कागदपत्रे भारत तसेच बांगलादेशातील यंत्रणांना पाठवली. डॉ. स्वराली कोंडविलकर, सामाजिक कार्यकर्ता नितीश शर्मा, रूपा टेकचंदानी, डेनिट म्याथु, समाधान पालकर, धुव्र बडेकर यांनी डॉ. भरत वाटवानी यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू केले. २७ जूनला त्याला भारत बांगलादेश सीमारेषेपर्यंत डॉ. स्वराली आणि नितीश शर्मा घेऊन गेले. मात्र देशाबाहेर जाण्याचा परवाना नसल्यामुळे तेथील यंत्रणांनी अडवले. या रुग्णाची करूण कहाणी ऐकून त्यांचे मन हेलावले. मात्र प्रक्रिया शिल्लक असल्याने त्याला परत मुंबईत घेऊन येण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याच्या भेटीसाठी डोळ्यात प्राण आणून वाट पाहणाऱ्या त्याच्या कुटुंबाची अस्वस्थता पुन्हा वाढली.

रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलिस विभाग, सह प्रादेशिक परदेशी नागरिक नोंदणी अधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्यामुळे प्रक्रिया वेगाने पूर्ण झाली आणि देशाबाहेर जाण्याचा परवाना मिळाला. न्यायालयानेही या व्यक्तीवर गुन्हा दाखल नसून मानसिक रुग्ण असल्याने त्याला त्याच्या देशात जाण्याचा मार्ग खुला केला. 'श्रद्धा'च्या टीमने त्याला भारत-बांग्लादेश सीमारेषेवर नेऊन त्याच्या कुटुंबीयाकडे सुपूर्द केले. आजपर्यंत या संस्थेने दहा हजारांहून अधिक मनोरुग्णांचे पुनर्वसन आणि त्यांना कुटुंबाकडे सुखरूप सोडले आहे. 'हरवलेल्या, एकाकी फिरणाऱ्या माणसांना आपण समजून घेतले पाहिजे. त्यांच्या वेदनेवर उपाय शोधायला हवा', असे डॉ. भारत वाटवानी यांनी 'मटा'ला सांगितले.

BANGLADESH REUNION COVERAGE – 2

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**LOKMAT Mumbai**

**JULY 2023**

★★★
मुंबई । सोमवार
२४.७.२०२३
किंमत : ₹ ५ ▪ वर्ष : २६ अंक : ८५ ▪ पृष्ठे : १२+४ = १६
आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ६८६२३/१९९८
www.lokmat.com
epaper.lokmat.com

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

कुटुंबीयांना अश्रू अनावर : श्रद्धा फाउंडेशनच्या प्रयत्नाला यश

# ‘तो’ २१ वर्षांनंतर कुटुंबीयांना भेटला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** कर्जत परिसरामध्ये २०१९ मध्ये सापडलेल्या मनोरुग्णावर श्रद्धा फाउंडेशन या सामाजिक संस्थेने यशस्वी उपचार केले आहेत. एमडी रहमान असे या तरुणाचे नाव असून, तो मूळचा बांगलादेशमधील रहिवासी आहे. २१ वर्षांनंतर त्याच्या कुटुंबीयांशी भेट घडविण्यात संस्थेला यश आले आहे. दोन दशकानंतर मुलगा सापडल्यामुळे आईवडिलांना अश्रू अनावर झाले आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. भरत वाटवाणी १९८८ पासून मनोरुग्णांवर उपचार करण्याचे काम करत आहेत. कर्जतमधील श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून मनोरुग्णांवर उपचार करून त्यांना त्यांच्या घरी पाठविण्यात येत आहे. २०१९ मध्ये कर्जतमधील रस्त्यांवर एक तरुण आढळला होता. त्याच्यावरही संस्थेने उपचार सुरू केले. उपचारानंतर त्याचे नाव एमडी रहमान असून, तो बांगलादेशमधील रहिवासी असल्याचे समजले. अहमदनगरमधील सामाजिक कार्यकर्ते गिरीश कुलकर्णी यांनी सद्भावना यात्रा काढल्यानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये बांगलादेशी शिष्टमंडळाला अहमदनगरला कार्यक्रमामध्ये आमंत्रित केले होते. यावेळी तेथे उपस्थित असलेल्या श्रद्धाच्या स्वयंसेवकांनी बांगलादेशमधील सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांशी संवाद साधून माहिती दिली. सर्वांच्या प्रयत्नाने त्याच्या कुटुंबीयांचा शोध लावण्यात यश आले.



मनोरुग्णावर उपचार करून त्याला बांगलादेश सीमेवर घेऊन गेलेले श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे पथक.

## सरकारी परवानग्या मिळवून पाठविले मायदेशी

श्रद्धाच्या पथकाने सर्व औपचारिकता पूर्ण करून सरकारी परवानग्या मिळवून रहमानला भारत-बांगलादेश सीमेवर नेऊन त्याच्या आई-वडिलांच्या ताब्यात दिले. २१ वर्षांनंतर मुलगा भेटल्यामुळे त्याच्या आईवडील व नातेवाइकांना अश्रू आवरता आले नाहीत. कुटुंबीयांशी भेट घडवून आणण्यात संस्थेच्या डी मॅथ्यू, डॉ. रूपा टेकचंदानी, स्वराजी कोंडविलकर, नितीश शर्मा, समाधान पालकर, हरीश शेट्टी व इतरांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

BANGLADESH
REUNION
COVERAGE – 3

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAMNA**
**Mumbai**

**JULY 2023**

वर्ष : ३५ अंक : १८१ | पृष्ठे १० | मूल्य : ५.०० रुपये | ★★ शहर आवृत्ती | संस्थापक संपादक : बाळ ठाकरे
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना

# २१ वर्षांनी झाली मनोरुग्णाची कुटुंबीयांबरोबर पुनर्भेट


## श्रद्धा फाऊंडेशन बनली हिंदुस्थान-बांगलादेशमधील दुवा

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) – कर्जतच्या रस्त्यावर सापडलेल्या बांगलादेशी मनोरुग्णाला उपचारानंतर पुन्हा २१ वर्षांनंतर मायदेशी पाठवून कुटुंबीयांचे पुनर्मिलन घडवण्याचे काम मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भारत वाटवानी यांच्या श्रद्धा फाऊंडेशनने केले आहे. मनोरुग्णांसाठी तळमळीने काम करणारी फाऊंडेशन दोन्ही देशांमधील मानवी दुवा बनली.

डॉ. भारत वाटवानी यांच्या श्रद्धा फाऊंडेशनकडून रस्त्यावर भटकणार्‍या मनोरुग्णांची सेवा करून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार केले जातात. आतापर्यंत १० हजारांहून अधिक रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. चार वर्षांपूर्वी कर्जतच्या रस्त्यावर फाऊंडेशनच्या आरोग्यदूतांना मोहम्मद रेहमान ऊर्फ मोती सापडला. त्याला केंद्रात आणून वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले. मात्र, त्याला काहीही नीट सांगता येत नव्हते. त्याची बंगाली भाषाही कोणाला नीट कळत नव्हती. गिरीश कुलकर्णी यांच्या स्नेहालय संस्थेच्यावतीने बांगलादेशात आयोजित केलेल्या रॅलीत काही आरोग्यदूत गेले होते. बांगलादेशातील काही विद्यार्थ्यांना हिंदुस्थानात आमंत्रित करण्यात आले. यावेळी या बंगाली विद्यार्थ्यांच्या मदतीने व्हिडिओ कॉल करून त्याच्या पालकांचा शोध सुरू करण्यात आला. त्यावेळी हा रुग्ण बांगलादेशातला असल्याचे निष्पन्न झाले. या विद्यार्थ्यांनी मायदेशी परतून तिथे मोतीच्या पालकांचा शोध घेतला.

### स्क्रिझोफ्रेनिया आजाराने त्रस्त

बांगलादेशातून २००२ साली गायब झालेला हा रुग्ण सीमा ओलांडून हिंदुस्थानात कसा आला ते एक मोठे गूढ आहे. मात्र, स्क्रिझोफ्रेनिया आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णावर उपचार करून त्याला पुन्हा मायदेशात त्यांच्या कुटुंबीयांकडे पाठवण्याचे शिवधनुष्य श्रद्धा फाऊंडेशनने समर्थपणे पेलवले.



### लष्करी कर्मचाऱ्याचा मुलगा

मोतीचे वडील बांगलादेशी लष्करातून निवृत्त कर्मचारी असून त्यांच्याशी संपर्क झाल्यावर कागदोपत्री कार्यवाही वेगाने सुरू झाली. २७ जूनला हिंदुस्थान–बांगलादेश सीमेवर फाऊंडेशनच्या मनोरुग्णतज्ज्ञ डॉ. स्वराली कोंडविलकर आणि नितीश शर्मा या व्यक्तीला घेऊन गेले. मात्र, देशाबाहेर लागणारा परवाना नसल्यामुळे त्याला घेऊन पुन्हा मुंबईला यावे लागले. रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलीस विभाग, सहप्रादेशिक परदेशी नागरिक नोंदणी अधिकार्‍यांनी केलेल्या सहकार्यामुळे परवान्याची प्रक्रिया वेगाने झाली आणि मोतीला २१ वर्षांनी पुन्हा आपल्या कुटुंबीयांना भेटता आले.

BANGLADESH
REUNION
COVERAGE – 4

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**DARSHAN POLICE TIMES**

**JULY 2023**


जन ग्रामीण पत्रकार संघाचे मुखपत्र

गुन्हेगारी विश्वाचा कर्दनकाळ!

# दर्शन पोलीस टाइम्स

मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे एकमेव साप्ताहिक

Post Reg. No: DHL/619/2022-2024

Website: www.dpolicetime.com | संपादक - युवराज देवरे मो.7588007576 | Email - dpolicetime1@gmail.com

* कार्यक्षेत्र - महाराष्ट्र, गुजराथ, मध्यप्रदेश, गोवा, कर्नाटक * वर्ष - १० वे * अंक नं. २६ * सोमवार दि. २४ जुलै २०२३ * पाने - ६ * किंमत - ५/-



**प्रतिनिधी नेमणे आहे**

साप्ता.दर्शन पोलीस टाइमसाठी संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यात जिल्हा, तालुका शहर प्रतिनिधी तसेच ग्रामीण भागात गाव तेथे (वार्ताहर) नेमणे आहेत. इच्छुकांनी संपर्क साधावा.

**संपादक - युवराज देवरे**
7588 00 7576


## तब्बल २१ वर्षानी बांग्लादेशीय मनोरुग्णाची त्याच्या कुटुंबाशी पुनर्भेट

**श्रध्दा फाउंडेशनच्या टिमची कामगिरी**


दर्शन पोलीस टाइम्स
जयेश जाधव




**कर्जत** - मानसिक व्याधी असलेल्या काही व्यक्ती घरापासून, कुटुंबापासून दुरावतात. कधी आजारपणामुळे तर कधी विस्मृतीमुळे त्यांना परतीची वाट गवसत नाही. अशाच हरवलेल्या मनोरुग्णांना आधार देऊन त्यांचे पुर्नवसन करणाऱ्या मॅगेसेसे विजेत्या डॉ. भारत वाटवानी यांच्या श्रद्धा फाऊंडेशन या संस्थेने बांग्लादेशहून आलेल्या एका रुग्णाला त्याचे कुटुंब पुन्हा मिळवून दिले. शनिवारी त्याची कुटुंबाकडे सुखरूप पाठवणी करण्यात आली. तब्बल २१ वर्षांनी हा रुग्ण त्याच्या कुटुंबाकडे परतला आहे. जून महिन्यामध्ये भारत-बांग्लादेश सीमारेषेपर्यंत जाऊनही तांत्रिक कारणामुळे या रुग्णाला पुन्हा भारतात आणावे लागले होते. तरीही श्रद्धा पाऊंडेशनच्या टीमने पाठपुरावा करत त्याला परत पाठवले आहे.चार वर्षांपूर्वी कर्जतमध्ये रस्त्यावर विमनस्क अवस्थेमध्ये भटकत असलेल्या या रुग्णाला श्रद्धा फाऊंडेशनच्या आरोग्यदूतांनी केंद्रामध्ये आणले. तिथे त्याची काळजी घेण्यासह वैद्यकीय उपचारही सुरू झाले. तो थोड़ा स्थिरावल्यावर त्याच्याकडे कुटुंबासंदर्भात विचारणा करण्यात आली. मात्र, त्याला नीट सांगता येत नव्हते. भाषेचा अडसर होता. संस्थेतील बंगाली भाषा समजून शकणाऱ्या सामाजिक कार्यकत्यांनाही त्याच्या उच्चाराचे आकलन होत नव्हते. गिरीश कुलकर्णी यांच्या स्नेहालय या संस्थेने आयोजित केलेल्या एका सद्भावना रॅलीमध्ये काही आरोग्यदूत बांगलादेश येथे गेले होते. या देशातील काही विद्यार्थ्यांना त्यांनी त्यावेळी भारतात निमंत्रित केले. हे विद्यार्थी जेव्हा भारतात आले, तेव्हा श्रद्धा फाऊंडेशनच्या कार्यकत्यांनी त्यांना व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून जोडून दिले. त्यावेळी हा रुग्ण बांग्लादेशमधील असल्याचे लक्षात आले. या विद्यार्थ्यांनी पुन्हा मायदेशी गेल्यानंतर त्याच्या पालकांचा शोध घेतला.

२००२मध्ये स्क्रिझोफ्रेनियाबाधित असलेला हा रुग्ण घर सोडून निघून गेला होता. त्याची पुन्हा मायदेशी पाठवण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर, सैन्यदलात अनेक वर्षे सेवा दिलेल्या त्याच्या वडिलांनी आवश्यक सर्व कागदपत्रे भारत तसेच बांगलादेशातील यंत्रणांना पाठवली. डॉ. स्वराली कोंडविलकर, सामाजिक कार्यकर्ता नितीश शर्मा, रूपा टेकचंदानी, डेनिट म्याथु, समाधान पालकर, धुव बडेकर यांनी डॉ. भरत वाटवानी यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू केले. २७ जूनला त्याला भारत बांगलादेश सीमारेषेपर्यंत डॉ. स्वराली आणि नितीश शर्मा घेऊन गेले. मात्र देशाबाहेर जाण्याचा परवाना नसल्यामुळे तेथील यंत्रणांनी अडवले. या रुग्णाची करूण कहाणी ऐकून त्यांचे मन हेलावले. मात्र प्रक्रिया शिल्लक असल्याने त्याला परत मुंबईत घेऊन येण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याच्या भेटीसाठी डोळ्यात प्राण आणून वाट पाहणाऱ्या त्याच्या कुटुंबाची अस्वस्थता पुन्हा वाढली.

रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलिस विभाग, सह प्रादेशिक परदेशी नागरिक नोंदणी अधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्यामुळे प्रक्रिया वेगाने पूर्ण झाली आणि देशाबाहेर जाण्याचा परवाना मिळाला. न्यायालयानेही या व्यक्तीवर गुन्हा दाखल केला नसून मानसिक रुग्ण असल्याने त्याला त्याच्या देशात जाण्याचा मार्ग खुला केला. श्रद्धाच्या टीमने त्याला भारत-बांग्लादेश सीमारेषेवर नेऊन त्याच्या कुटुंबीयाकडे सुपूर्द केले. आजपर्यंत या संस्थेने दहा हजारांहून अधिक मनोरुग्णांचे पुनर्वसन आणि त्यांना कुटुंबाकडे सुखरूप सोडले आहे. हरवलेल्या, एकाकी फिरणाऱ्या माणसांना आपण समजून घेतले पाहिजे. त्यांच्या वेदनेवर उपाय शोधायला हवा, असे डॉ. भारत वाटवानी यांनी पत्रकाराजवळ सांगितले.

BANGLADESH REUNION COVERAGE – 5

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**KONKAN SAKAL Thane**

**JULY 2023**

THANE | Monday, 24 July 2023 | YEAR: 38, ISSUE: 106 PRICE RS. 2

ठाणे | सोमवार, दि. २४ जुलै २०२३ | MARATHI DAILY KONKAN SAKAL | • पाने ८ • किंमत २ रुपये

नाबाद ३७ वर्ष ३८ व्या वर्षात पदार्पण

दैनिक कोकण सकाळ

आपला आवाज, आपली शक्ति

संपादकः राजाराम माने
व्यव. संपादकः कादंबरी बने

## श्रध्दा फाउंडेशनच्या टिमची कामगिरी

# तब्बल २१ वर्षांनी बांग्लादेशी मनोरुग्णाची त्याच्या कुटुंबाशी भेट



**कर्जत** : मानसिक व्याधी असलेल्या काही व्यक्ती घरापासून, कुटुंबापासून दुरावतात. कधी आजारपणामुळे तर कधी विस्मृतीमुळे त्यांना परतीची वाट गवसत नाही. अशाच हरवलेल्या मनोरुग्णांना आधार देऊन त्यांचे पुर्नवसन करणाऱ्या मॅगेसेसे विजेत्या डॉ. भारत वाटवानी यांच्या 'श्रद्धा फाऊंडेशन' या संस्थेने बांग्लादेशहून आलेल्या एका रुग्णाला त्याचे कुटुंब पुन्हा मिळवून दिले. शनिवारी त्याची कुटुंबाकडे सुखरूप पाठवणी करण्यात आली. तब्बल २१ वर्षांनी हा रुग्ण त्याच्या कुटुंबाकडे परतला आहे. जून महिन्यामध्ये भारत-बांग्लादेश सीमारेषेपर्यंत जाऊनही तांत्रिक कारणामुळे या रुग्णाला पुन्हा भारतात आणावे लागले होते. तरीही 'श्रद्धा पाऊंडेशन'च्या टीमने पाठपुरावा करत त्याला परत पाठवले आहे.

चार वर्षांपूर्वी कर्जतमध्ये रस्त्यावर विमनस्क अवस्थेमध्ये भटकत असलेल्या या रुग्णाला श्रद्धा फाऊंडेशन'च्या आरोग्यदूतांनी केंद्रामध्ये आणले. तिथे त्याची काळजी घेण्यासह वैद्यकीय उपचारही सुरू झाले. तो थोड़ा स्थिरावल्यावर त्याच्याकडे कुटुंबासंदर्भात विचारणा करण्यात आली. मात्र, त्याला नीट सांगता येत नव्हते. भाषेचा अडसर होता. संस्थेतील बंगाली भाषा समजून शकणाऱ्या सामाजिक कार्यकत्यांनाही त्याच्या उच्चाराचे आकलन होत नव्हते. गिरीश कुलकर्णी यांच्या स्नेहालय या संस्थेने आयोजित केलेल्या एका सद्भावना रॅलीमध्ये काही आरोग्यदूत बांगलादेश येथे गेले होते. या देशातील काही विद्यार्थ्यांना त्यांनी त्यावेळी भारतात निमंत्रित केले. हे विद्यार्थी जेव्हा भारतात आले, तेव्हा 'श्रद्धा फाऊंडेशन'च्या कार्यकत्यांनी त्यांना व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून जोडून दिले. त्यावेळी हा रुग्ण बांग्लादेशमधील असल्याचे लक्षात आले. या विद्यार्थ्यांनी पुन्हा मायदेशी गेल्यानंतर त्याच्या पालकांचा शोध घेतला.

२००२मध्ये स्क्रिझोफ्रेनियाबाधित असलेला हा रुग्ण घर सोडून निघून गेला होता. त्याची पुन्हा मायदेशी पाठवण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर, सैन्यदलात अनेक वर्षे सेवा दिलेल्या त्याच्या वडिलांनी आवश्यक सर्व कागदपत्रे भारत तसेच बांगलादेशातील यंत्रणांना पाठवली. डॉ. स्वराली कोंडविलकर, सामाजिक कार्यकर्ता नितीश शर्मा, रूपा टेकचंदानी, डेनिट म्याथु, समाधान पालकर, धुव बडेकर यांनी डॉ. भरत वाटवानी यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू केले. २७ जूनला त्याला भारत बांगलादेश सीमारेषेपर्यंत डॉ. स्वराली आणि नितीश शर्मा घेऊन गेले. मात्र देशाबाहेर जाण्याचा परवाना नसल्यामुळे तेथील यंत्रणांनी अडवले. या रुग्णाची करूण कहाणी ऐकून त्यांचे मन हेलावले. मात्र प्रक्रिया शिल्लक असल्याने त्याला परत मुंबईत घेऊन येण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याच्या भेटीसाठी डोळ्यात प्राण आणून वाट पाहणाऱ्या त्याच्या कुटुंबाची अस्वस्थता पुन्हा वाढली.

रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलिस विभाग, सह प्रादेशिक परदेशी नागरिक नोंदणी अधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्यामुळे प्रक्रिया वेगाने पूर्ण झाली आणि देशाबाहेर जाण्याचा परवाना मिळाला. न्यायालयानेही या व्यक्तीवर गुन्हा दाखल केला नसून मानसिक रुग्ण असल्याने त्याला त्याच्या देशात जाण्याचा मार्ग खुला केला. 'श्रद्धा'च्या टीमने त्याला भारत-बांग्लादेश सीमारेषेवर नेऊन त्याच्या कुटुंबीयाकडे सुपूर्द केले. आजपर्यंत या संस्थेने दहा हजारांहून अधिक मनोरुग्णांचे पुनर्वसन आणि त्यांना कुटुंबाकडे सुखरूप सोडले आहे. 'हरवलेल्या, एकाकी फिरणाऱ्या माणसांना आपण समजून घेतले पाहिजे. त्यांच्या वेदनेवर उपाय शोधायला हवा', असे डॉ. भारत वाटवानी यांनी सांगितले.

BANGLADESH REUNION COVERAGE – 6

MAHARASHTRA News

MARATHI

AAPLE SAMRAJYA Raigad

JULY 2023

■ मुंबई ■ रायगड ■ ठाणे ■ पालघर येथून एकाच दिवशी प्रकाशित होणारे दैनिक

# आपले साम्राज्य

RNI NO. MAHMAR/2016/67569

संपादिका : सौ. सीमा प्रमोद मोरे

■ वर्ष ७वे ■ अंक क्र. १५७ ■ रायगड ■ बुधवार २६ जुलै २०२३ ■ पाने : ८ ■ किंमत : २रू.

## तब्बल 21 वर्षानी बांग्लादेशीय मनोरुग्णाची त्याच्या कुटुंबाशी पुनर्भेट, कर्जत श्रध्दा फाउंडेशनच्या टिमची कामगिरी

आपले साम्राज्य

कर्जत (जयेश जाधव) : मानसिक व्याधी असलेल्या काही व्यक्ती घरापासून, कुटुंबापासून दुरावतात. कधी आजारपणामुळे तर कधी विस्मृतीमुळे त्यांना परतीची वाट गवसत नाही. अशाच हरवलेल्या मनोरुग्णांना आधार देऊन त्यांचे पुर्नवसन करणाऱ्या मॅगेसेसे विजेत्या डॉ. भारत वाटवानी यांच्या 'श्रद्धा फाऊंडेशन' या संस्थेने बांग्लादेशहून आलेल्या एका रुग्णाला त्याचे कुटुंब पुन्हा मिळवून दिले. शनिवारी त्याची कुटुंबाकडे सुखरूप पाठवणी करण्यात आली. तब्बल २१ वर्षांनी हा रुग्ण त्याच्या कुटुंबाकडे परतला आहे. जून महिन्यामध्ये भारत--बांग्लादेश सीमारेषेपर्यंत जाऊनही तांत्रिक कारणामुळे या रुग्णाला पुन्हा भारतात आणावे लागले होते. तरीही 'श्रद्धा पाऊंडेशन'च्या टीमने पाठपुरावा करत त्याला परत पाठवले आहे .चार वर्षांपूर्वी कर्जतमध्ये रस्त्यावर विमनस्क अवस्थेमध्ये भटकत असलेल्या या रुग्णाला श्रद्धा फाऊंडेशन'च्या आरोग्यदूतांनी केंद्रामध्ये आणले. तिथे त्याची काळजी घेण्यासह वैद्यकीय उपचारही सुरू झाले. तो थोडा स्थिरावल्यावर



त्याच्याकडे कुटुंबासंदर्भात विचारणा करण्यात आली. मात्र, त्याला नीट सांगता येत नव्हते. भाषेचा अडसर होता. संस्थेतील बंगाली भाषा समजून शकणाऱ्या सामाजिक कार्यकत्यांनाही त्याच्या उच्चाराचे आकलन होत नव्हते. गिरीश कुलकर्णी यांच्या स्नेहालय या संस्थेने आयोजित केलेल्या एका सद्भावना रॅलीमध्ये काही आरोग्यदूत बांगलादेश येथे गेले होते. या देशातील काही विद्याथ्यांना त्यांनी त्यावेळी भारतात निमंत्रित केले. हे विद्यार्थी जेव्हा भारतात आले, तेव्हा 'श्रद्धा फाऊंडेशन'च्या कार्यकत्यांनी त्यांना व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून जोडून दिले. त्यावेळी हा रुग्ण बांग्लादेशमधील असल्याचे लक्षात आले. या विद्यार्थ्यांनी पुन्हा मायदेशी गेल्यानंतर त्याच्या पालकांचा शोध घेतला. २००२मध्ये स्क्रिझोफ्रेनियाबाधित असलेला हा रुग्ण घर सोडून निघून गेला होता. त्याची पुन्हा मायदेशी पाठवण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर, सैन्यदलात अनेक वर्षे सेवा दिलेल्या त्याच्या वडिलांनी आवश्यक सर्व कागदपत्रे भारत तसेच बांगलादेशातील यंत्रणांना पाठवली. डॉ. स्वराली कोंडविलकर, सामाजिक कार्यकर्ता नितीश शर्मा, रूपा टेकचंदानी, डेनिट म्याथु, समाधान पालकर, धुव बडेकर यांनी डॉ. भरत वाटवानी यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू केले. २७ जूनला त्याला भारत बांगलादेश सीमारेषेपर्यंत डॉ. स्वराली आणि नितीश शर्मा घेऊन गेले. मात्र देशाबाहेर जाण्याचा परवाना नसल्यामुळे तेथील यंत्रणांनी अडवले. या रुग्णाची करूण कहाणी ऐकून त्यांचे मन हेलावले. मात्र प्रक्रिया शिल्लक असल्याने त्याला परत मुंबईत घेऊन येण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याच्या भेटीसाठी डोळ्यात प्राण आणून वाट पाहणाऱ्या त्याच्या कुटुंबाची अस्वस्थता पुन्हा वाढली. रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलिस विभाग, सह प्रादेशिक परदेशी नागरिक नोंदणी अधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्यामुळे प्रक्रिया वेगाने पूर्ण झाली आणि देशाबाहेर जाण्याचा परवाना मिळाला. न्यायालयानेही या व्यक्तीवर गुन्हा दाखल केला नसून मानसिक रुग्ण असल्याने त्याला त्याच्या देशात जाण्याचा मार्ग खुला केला. 'श्रद्धा'च्या टीमने त्याला भारत-बांग्लादेश सीमारेषेवर नेऊन त्याच्या कुटुंबीयाकडे सुपूर्द केले. आजपर्यंत या संस्थेने दहा हजारांहून अधिक मनोरुग्णांचे पुनर्वसन आणि त्यांना कुटुंबाकडे सुखरूप सोडले आहे. 'हरवलेल्या, एकाकी फिरणाऱ्या माणसांना आपण समजून घेतले पाहिजे. त्यांच्या वेदनेवर उपाय शोधायला हवा', असे डॉ. भारत वाटवानी यांनी 'पत्रकाराजवळ सांगितले.

BANGLADESH
REUNION
COVERAGE - 7

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SURYODAY**
**Konkan**

**OCTOBER 2023**

दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र **सूर्योदय**

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)

कोकण || वर्ष १ ला || अंक ३२५ || शुक्रवार दि.२७ ऑक्टोबर २०२३ || RNI No.MAHMAR/2014/54581 ||

# डॉ. स्वराली कोंडवीलकर नवदुर्गा सन्मान २०२३ पुरस्काराने सन्मानित

कर्जत :- जयेश जाधव

सामाजिक, शासकीय, पोलीस, वैद्यकीय सह विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १८ महिलांचा रायगड जिल्हा पोलिस दलाच्या वतीने नवदुर्गा सन्मान २०२३ अंतर्गत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते सदर पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन नागोठणे येथे करण्यात आले.यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील कर्जत येथील श्रध्दा फाऊंडेशनमधील डॉ. स्वराली कोंडवीलकर यांना रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते नवदुर्गा पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलिस अधीक्षक अतुल झेंडे, रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांची प्रमुख उपस्थित होती. डॉ.स्वराली कोंडवीलकर या मनसोपचारतज्ज्ञ आहेत. त्यांनी ग्रँट मेडिकल कॉलेज, जे जे हॉस्पिटल मुंबई मधून एमबीबीएस केले असून राष्ट्रीय प्रख्यात असलेल्या निम्हान्स, बंगलोरमधून, मानसोपचारात एम.डी केले आहे. त्यानी फेब्रुवारी २०२२ मध्ये श्रध्दा पुनर्वसन फाउंडेशनमध्ये सहयोगी मानसोपचारतज्ज्ञ म्हणून सहभागी झाल्या. तेव्हापासून १५४३ भटक्या, मानसिक आजारी, रस्त्याच्या कडेला असलेल्या निराधारांच्या पुनर्वसनात सहभागी झाल्या आहे, या १५४३ रुग्णापैकी, ४३९ महिला रुग्ण होत्या. भारत आणि शेजारील राष्ट्राची लांबी आणि रुंदी ओलांडून, या रुग्ण महिलांचा बचाव ()करणे, उपचार करणे आणि त्यांच्या हरवलेल्या कुटुंबांसोबत त्यांना पुन्हा एकत्र करण्याचे काम डॉ. स्वरालीनी केले आहे त्याच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व थरातून अभिनंदन होत आहे.







Dr Swarali Kondwilkar,
Associate Psychiatrist
Of Shraddha,
Being Felicitated
By the Raigad District Police

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**SAKAL**
**Nagpur**

**FEBRUARY 2024**

सकाळ रविवार today

नागपूर | रविवार, १८ फेब्रुवारी, २०२४ | SakalNews | SakalMediaNews | www.esakal.com

# अशोक वनात बेघरांना मिळणार मायेची ऊब


## ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व डॉ. भरत वाटवाणी यांच्यात करार

**केवल जीवनतारे :**
सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. १७ : जगी ज्याचे कोणी नाही अशा व्यक्ती फुटपाथ, रस्त्यावर, देवळाच्या पायऱ्यावर, वृक्षाच्या, फुटपाथच्या आडोशाला पडून असतात. मिळेल ते खातात, नाहीतर उपाशी. एक दिवस येथेच त्यांचा मृत्यू होतो. पुढे पोलिसांच्या मदतीने रुग्णालयांत मृतदेह नेला जातो व बेवारस म्हणूनच अंत्यविधी होतात. मात्र आता उपराजधानीत बेवारस व्यक्तींना वर्धा मार्गावरील अशोक वन येथे हक्काचा निवारा मिळणार आहे.



डॉ. प्रकाश आमटे



डॉ. भरत वाटवानी

बेवारस, कुष्ठरुग्ण यांना मायेची उब देणारे ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व बेवारस मनोरुग्णांची सेवा करणारे डॉ. भरत वाटवाणी यांच्यात आज अशोक वन येथे याबाबत एक करार होणार आहे. यातून बेवारसांसाठी निवारा उभारणार आहे. विशेष म्हणजे या दोन्ही समाजसेवकांना समाजसेवेसाठी प्रतिष्ठेचा "मॅगसेसे" पुरस्कार मिळालेला आहे.

**दर महिन्यात पाच ते सहा बेवारस**

दर महिन्यात पाच ते सात निराधार, बेवारस व्यक्तींना पोलिसांमार्फत मेडिकलमध्ये दाखल करण्यात येते. मात्र उपचारातून बरे झाल्यानंतर त्यांना नेण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. अशावेळी मेडिकलच हेच त्यांचे घर बनते. पण बरे झाल्यानंतर वॉर्डात खाट उपलब्ध होत नाही. अशावेळी त्यांच्या राहण्याचा प्रश्न येतो. हा प्रश्न अशोक वनात निवारा तयार झाल्यानंतर सुटणार आहे, असा विश्वास येथील वैद्यकीय सामाजिक अधीक्षकांनी व्यक्त केला.

### बेवारसांसाठी निवारा

उपराजधानीत महापालिका आयुक्त तुकाराम मुंढे असताना शहरातील रस्त्यावर फिरणाऱ्या बेवारस व्यक्तींसाठी निवारा तयार करण्यात आला होता. शहरात १२६२ क्षमता असलेले निवारा केंद्र तयार झाले, मात्र निवारा केंद्र सध्या रिकामे दिसते. जे दिसतात, ते राहात नाहीत. त्यांच्याकडे लक्ष देणारे नसल्याने निघून जातात. त्यावेळच्या नोंदीनुसार शहराच्या विविध भागात बाराशेवर बेवारस व्यक्ती असतील असा अंदाज होता.

> अशोक वन आणि श्रद्धा संस्थेच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या या सेवाभावी उपक्रमाला उपराजधानीतील मानसोपचार तज्ज्ञांकडून मदत केली जाणार आहे. शहरातील मानसोपचार तज्ज्ञ येथील बेवारस व्यक्तींवर उपचारासाठी दर दिवसाला अशोक वन येथे भेट देतील. सायकियाट्रीक असोसिएशनच्या वतीने तसे वेळापत्रक तयार करण्यात येईल. या उपक्रमात सेवा करण्याची संधी मिळणार आहे, हे आमचे भाग्य.
> **- डॉ. निखिल पांडे,** मानसोपचार तज्ज्ञ, नागपूर.

**MAHARASHTRA**
**News**

**LOKMAT**
**Karad**

**JANUARY 2025**

लोकमत

Karad - 12.01.2025

# देशाला कुटुंब समजून काम करावे

## भारत वाटवाणी : घारेवाडी येथे युवा हृदय संमेलनाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कऱ्हाड : 'भारतात २०११ च्या जनगणनेनुसार १८ लाख बेघर आहेत. ही भारताची खरी वस्तूस्थिती आहे. याचे एक कारण म्हणजे मनोरुग्ण हे आहे. मी आजवर सुमारे ११ हजार मनोरुग्णांचे पुनर्वसन त्यांच्या घरी नातलगांबरोबर केले आहे. हे काम मी आनंदाने माझ्या स्वार्थासाठी म्हणजेच आनंदासाठी करतो. खरंतर प्रत्येकाने देशाला कुटुंब समजून काम केले पाहिजे,' असे प्रतिपादन रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भारत वाटवाणी यांनी केले.

कऱ्हाड तालुक्यातील घारेवाडी येथे शिवम प्रतिष्ठानतर्फे आयोजित बलशाली युवा हृदय संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी 'सहृदयी समाजाचे मानसशास्त्र' या विषयावर ते बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त सनदी अधिकारी इंद्रजीत देशमुख, दत्तात्रय पवार, विश्वनाथ खोत, दत्तात्रय देसाई, चंद्रकांत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.



घारेवाडी येथे शिवम प्रतिष्ठानतर्फे शुक्रवारी आयोजित बलशाली युवा हृदय संमेलनाचे उद्घाटन डॉ. भारत वाटवाणी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आले. यावेळी इंद्रजीत देशमुख, मधुकर सावंत, राहुल पाटील उपस्थित होते.

डॉ. वाटवाणी म्हणाले, 'मनोरुणांचे काम करत असताना दयेपेक्षा सहानुभूतीची जास्त गरज असते. त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करण्याची आवश्यकता असते. 'हरवले आभाळ जयांचे हो त्यांचा सोबती, सापडेना वाट ज्यांना हो त्यांचा सारथी' अशी भूमिका आपण प्रत्येकाने बजावली पाहिजे. वैफल्यग्रस्त, नैराश्यग्रस्त, मनोरुग्णांना पुन्हा नव्याने जीवन जगण्यास समर्थ करणे, त्यांच्या नातलगांसोबत भावनात्मक पुनर्मिलन घडवून आणणे यामध्ये खूप मोठे आत्मिक समाधान मिळते. ते अनुभवले पाहिजे. त्यामुळे खूप मोठे समाधान मिळत असते.'

उद्योजक मधुकर सावंत यांनी स्वागत केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष राहुल पाटील यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला युवक, युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी उपक्रमांना प्रतिसादही दिला.




उंडाळे, ता. कऱ्हाड येथे मंगळवारी डॉ. भरत वतवाणी यांना स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार प्रदान करताना माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत. यावेळी अॅड. उदयसिंह पाटील, अॅड. विजयसिंह पाटील, प्रा. गणपतराव कणसे आदी उपस्थित होते.

# आपल्यातील देशप्रेम भावना कमी होऊ देऊ नका : वतवाणी

## उंडाळेत स्वातंत्र्य संग्रामसैनिक मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

उंडाळे : 'कोणताही माणूस भविष्यात आपले स्मारक व्हावे, पूजा व्हावी म्हणून काम करत नाही, तर तो चुकीला विरोध करत चांगल्याची कास धरत चालत राहतो. वाटेत त्याला अनेक अडचणी येतात, त्यावर तो मात करतो. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, महात्मा गांधी यांनी हेच केले. स्वातंत्र्यसेनानी दादा उंडाळकर हे देखील त्याच मार्गावरून चालले. म्हणून आज त्यांच्या कार्याचा गौरव होतोय. त्यांच्या त्यागाचे स्मरण आपण ठेवले पाहिजे. आपल्यातील देशप्रेमाची भावना कमी होऊ देऊ नका,' असे भावनिक आवाहन रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ. भरत वतवाणी यांनी केले.

उंडाळे (ता. कऱ्हाड) येथे मंगळवारी स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर यांच्या ५१ व्या स्मृतिदिनानिमित्त ४३ वा स्वातंत्र्यसंग्रामसैनिक मेळावा व माजी सैनिक मेळावा आयोजित केला होता. त्यात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भरत वतवाणी बोलत होते. माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत अध्यक्षस्थानी होते. यावेळी सुधीर सावंत यांच्या हस्ते डॉ. भरत वतवाणी यांना स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

यावेळी अॅड. उदयसिंह पाटील, रोहित पाटील, लक्ष्मण देसाई, अनिल मोहिते, शहाजी शेवाळे, प्रकाश पाटील, उपसभापती संभाजी काकडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. माजी खासदार सुधीर सावंत म्हणाले, उंडाळे ही स्वातंत्र सैनिकांची पंढरी आहे, तर सातारा जिल्हा हा माजी सैनिकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.' प्रा. धनाजी काटकर यांनी प्रास्ताविक केले. स्वागत अॅड. विजयसिंह पाटील यांनी केले.

### पण त्यांचे काय?

आज आमच्या 'श्रद्धा' संस्थेच्या वतीने ११ हजारावर मनोरुग्णांवर उपचार करून त्यांना घरी पोहोचवले आहे. आम्ही फार मोठे काम केले असे आम्हाला अजिबात वाटत नाही. कारण भारतात १० लाखांवर मनोरुग्ण आजही रस्त्यावर फिरतात. त्यांचे काय? हा खरा प्रश्न आहे. अनेकांनी या कामासाठी पुढे येण्याची गरज डॉ. भरत वतवाणी यांनी व्यक्त केली.

**MAHARASHTRA**
**News**

**NAVRASHTRA**
**Pune**

**FEBRUARY 2025**

**Transferred from Nepal NGO**

पश्चिम महाराष्ट्र

पत्रसमूह संस्थापक : स्व. श्री. रामगोपाल माहेश्वरी

# नवराष्ट्र

नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र

पुणे, गुरुवार, ६ फेब्रुवारी २०२५ | www.navarashtra.com | /navarashtra

# वीस वर्षांपासून बेपत्ता व्यक्तीला मिळाले कुटुंब

## रिहॅबिलिटेशन फाउंडेशनची माणुसकी ; पदाधिकाऱ्यांनी नेपाळमधून थेट डोंगरसोनीत आणून घडविली भेट

**तासगाव,** (वा.) वीस वर्षांपूर्वी घरातून बेपत्ता झालेले डोंगरसोनी (ता. तासगाव) येथील तुकाराम शिंदे चक्क नेपाळमध्ये सापडले. सोमवारी रिहबिलिटेशन फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना डोंगरसोनीत आणून कुटुंबीयांशी भेट घडवून आणली. या भेटीने कुटुंबीयांना सुखद धक्का बसला.

तुकाराम शिंदे यांचा डोंगरसोनी गावात सलून व्यवसाय होता. त्यांना पत्नी आणि एक मुलगा आहे. सुमारे २० वर्षांपूर्वी त्यांना मानसिक आजार झाला होता. याच आजाराने ते गाव सोडून गेले. त्यांच्या कुटुंबीयांनी अनेक वर्ष शोध घेतला. मात्र कोठेच शोध लागला नाही. पोलिसांनीदेखील शोध घेण्याचा प्रयत्न केला. अखेर कुटुंबीयांनी शिंदे परत येतील, ही अशा सोडून दिली होती. मात्र अनपेक्षितपणे शिंदे यांच्या पत्नी आणि मुलाला सोमवारी शिंदे यांच्या घरी आगमन झाल्यामुळे सुखद धक्का बसला.



### सामाजिक संस्थेत आढळले

रिहबिलिटेशन फाउंडेशन संस्था मानसिकदृष्ट्या आजारी असणाऱ्या रुग्णांसाठी काम करतात. या संस्थेचे पदाधिकारी काही दिवसांपूर्वी नेपाळ येथील काही रुग्णांना सोडण्यासाठी नेपाळला गेले होते. यावेळी तेथे अशाच प्रकारे काम करणाऱ्या एका सामाजिक संस्थेत मराठी भाषिक असणारे शिंदे आढळून आले.

### कुटुंबीयांना सुखद धक्का बसला

अधिक तपास केल्यानंतर शिंदे यांचे मूळ गाव डोंगरसोनी असल्याचे समजले. त्यानंतर संस्थेचे अजय रणमुरे आणि मनीषा भराडिया हे तुकाराम शिंदे यांना घेऊन थेट त्यांच्या घरी दाखल झाले. तब्बल वीस वर्षांनंतर शिंने घरी परतल्याने कुटुंबीयांना सुखद धक्का बसला. यावेळी माजी उपसरपंच किशोर कोडग, माजी पंचायत समिती सदस्य दिनकर झांबरे, रघुनाथ झांबरे सर्जेराव झांबरे त्यांचे कुटुंबीय यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

**MAHARASHTRA**
**News**

**LOKMAT**
**Tasgaon**

**FEBRUARY 2025**

Transferred from Nepal NGO


लोकमत

मस्ट READ

# वीस वर्षांपूर्वी बेपत्ता वृद्ध नेपाळमधून घरी परतला

लोकमत न्यूज नेटवर्क

**तासगाव :** वीस वर्षांपूर्वी मानसिक रुग्ण झालेल्या डोंगरसोनी (ता. तासगाव) येथील तुकाराम शिंदे ही व्यक्ती घरातून बेपत्ता झाली. तब्बल २० वर्षानंतर सोमवारी रिहबिलिटेशन फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी थेट डोंगरसोनीत आणून शिंदे यांच्या घरी त्यांच्या कुटुंबीयांना भेटवले. कुटुंबीयांना सुखद धक्का दिला. वीस वर्षांपूर्वी गावातून बेपत्ता झालेले शिंदे चक्क नेपाळमध्ये सापडले होते.



तुकाराम शिंदे यांचा डोंगरसोनी गावात सलून व्यवसाय होता. त्यांना पत्नी आणि एक मुलगा आहे. सुमारे २० वर्षांपूर्वी त्यांना मानसिक आजार झाला होता. याच आजाराने ते गाव सोडून गेले. त्यांच्या कुटुंबीयांनी अनेक वर्ष शोध घेतला. मात्र कोठेच शोध लागला नाही. पोलिसांनीदेखील शोध घेण्याचा प्रयत्न केला. अखेर कुटुंबीयांनी शिंदे परत येतील, ही आशा सोडून दिली होती. मात्र अनपेक्षितपणे शिंदे यांच्या पत्नी आणि मुलाला सोमवारी शिंदे यांच्या घरी आगमन झाल्यामुळे सुखद धक्का बसला. मानसिकदृष्ट्या आजारी असणाऱ्या रुग्णांसाठी काम करणारे श्रद्धा रिहबिलिटेशन फाउंडेशन या संस्थेचे पदाधिकारी काही दिवसांपूर्वी नेपाळ येथील काही रुग्णांना सोडण्यासाठी नेपाळला गेले होते. यावेळी तेथे अशाच प्रकारे काम करणाऱ्या एका सामाजिक संस्थेत मराठी भाषिक असणारे शिंदे आढळून आले. त्यानंतर शिंदेंना घेऊन हे संस्थेचे पदाधिकारी मुंबई येथे आले. अधिक तपास केल्यानंतर शिंदे यांचे मूळ गाव डोंगरसोनी असल्याचे समजले. त्यानंतर संस्थेचे अजय रणमुरे आणि मनीषा भराडिया हे तुकाराम शिंदे यांना घेऊन थेट त्यांच्या घरी दाखल झाले. यावेळी माजी उपसरपंच किशोर कोडग, माजी पंचायत समिती सदस्य दिनकर झांबरे, रघुनाथ झांबरे सर्जेराव झांबरे त्यांचे कुटुंबीय यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

**MAHARASHTRA**
**News**

**LOKMAT**
**Tasgaon**

**FEBRUARY 2025**

Transferred from Nepal NGO


# तरुण भारत संवाद

सांगली

www.tarunbharat.com

पाने १२+४ ✦ ₹ ६.०० | शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी २०२५ | बेळगाव • गोवा • मुंबई • सिंधुदुर्ग • र


## तब्बल वीस वर्षांनी झाली कुटुंबाची भेट

### डोंगरसोनीतील बेपत्ता व्यक्ती नेपाळमधून थेट गावात दाखल, कुटुंबाला सुखद धक्का

वार्ताहर
सावळज

सुमारे वीस वर्षांपूर्वी मानसिक रुग्ण झालेल्या तासगाव तालुक्यातील डोंगरसोनी येथील तुकाराम महादेव शिंदे ही व्यक्ती घरातून बेपत्ता झाली होती. तब्बल वीस वर्षानंतर श्रद्धा रिहॅबिलिटेशन फौंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी थेट नेपाळमधून डोंगरसोनीत आणून शिंदे यांच्या घरी त्यांच्या कुटुंबीयांना भेट घडवून आणली. अनपेक्षितपणे भेटीने कुटुंबीयांना सुखद धक्का दिला. वीस वर्षांपूर्वी गावातून बेपत्ता झालेले शिंदे नेपाळमधील एका सामाजिक संस्थेत सापडले होते.

तुकाराम शिंदे यांचा गावात सलून व्यवसाय होता. त्यांना पत्नी आणि एक मुलगा आहे. सुमारे २० वर्षांपूर्वी त्यांना मानसिक आजार झाला होता. ते गाव सोडून गेले. त्यांच्या कुटुंबीयांनी शोध घेतला मात्र त्यांचा शोध लागला नाही. मात्र अनपेक्षितपणे




**सावळज : बेपत्ता तुकाराम शिंदे यांची कुटुंबांची भेट घडवून आणल्याने ग्रामपंचायत व शिंदे कुटुंबाच्यावतीने श्रद्धा रिहबिलिटेशनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला.**

शिंदे यांच्या पत्नी आणि मुलाला सोमवारी शिंदे यांचे घरी आगमन झाल्यामुळे सुखद धक्का बसला.

**श्रद्धा रिहॅबिलिटेशनचे माणुसकीचे दर्शन**

मानसिकदृष्ट्या आजारी रुग्णांसाठी काम करणारे डॉ. भारत वाटवणी यांच्या श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशन या संस्थेचे पदाधिकारी काही दिवसापूर्वी नेपाळ येथील काही रुग्णांना सोडण्यासाठी गेले होते. यावेळी तेथे अशाच प्रकारे काम करणाऱ्या सामाजिक संस्थेत मराठी भाषिक असणारे शिंदे आढळले. शिंदेंना घेऊन हे संस्थेचे पदाधिकारी मुंबई येथे आले. तपास केल्यानंतर शिंदे यांचे मूळ गाव डोंगरसोनी असल्याचे समजले. संस्थेचे अजय रणसरे आणि मनीषा मराडीया हे शिंदे यांना घेऊन थेट त्यांच्या घरी दाखल झाले. वीस वर्षांनंतर तुकाराम शिंदे मिळुन आल्याने शिंदे कुटुंबीय भावूक झाले. ग्रामपंचायतीने फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी उपसरपंच किशोर कोडग, दिनकर झांबरे, रघुनाथ झांबरे, सर्जेराव झांबरे, शिंदे कुटुंबीय यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

**MAHARASHTRA**
**News**

**EKYA**
**Karad**

**FEBRUARY 2025**

# ऐक्य

## स्वा. दादा उंडाळकर पुरस्कार डॉ. भरत वतवाणी यांना जाहीर

### उंडाळेत मंगळवारी स्वातंत्र्य सैनिक व माजी सैनिक मेळाव्यात वितरण

### ॲड.उदयसिंह पाटील, प्रा. कणसे यांची माहिती

▲कराड, दि. १४ : स्वातंत्र्यसेनानी दादा उंडाळकर स्मारक समितीच्या वतीने देण्यात येणारा या वर्षीचा स्वातंत्र्यसेनानी दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार मानसोपचार तज्ञ डॉ.भरत वतवाणी यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती दादा उंडाळकर स्मारक समितीचे विश्वस्त ॲड.उदयसिंह पाटील-उंडाळकर, विश्वस्त प्रा.गणपतराव कणसे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उंडाळे, ता.कराड येथील स्वातंत्र्यसेनानी दादा उंडाळकर स्मारक समितीच्यावतीने स्वा.दादा उंडाळकर यांच्या ५१ व्या स्मृतिदिनानिमित्त ४२ वे स्वातंत्र्य संग्राम सैनिक अधिवेशन व माजी सैनिक मेळावा मंगळवार दि.१८ रोजी आयोजित करण्यात आला आहे. माजी खा. बिग्रेडिअर सुधीर सावंत (निवृत्त) यांच्या हस्ते सदर पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, शाल,



पत्रकार परिषदेत माहिती देताना ॲड.उदयसिंह पाटील-उंडाळकर, शेजारी प्रा.गणपतराव कणसे.

श्रीफळ, असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

प्रा.कणसे म्हणाले, मंगळवार, दि.१८ रोजी दुपारी २ वाजता स्वा. से. दादा उंडाळकर स्मारक मंदिर, उंडाळे येथे पुरस्काराचे वितरण होणार आहे. डॉ. भरत वतवाणी यांचे रस्त्याने फिरणाऱ्या मनोरूग्णांच्या बाबतीत मोठे कार्य आहे. त्यांनी आजपर्यंत तब्बल सात हजार रूग्णांवर उपचार करून त्यांना त्यांच्या घरी पाठवले आहे. वतवाणी यांचा जन्म कोलकता येथील, तर त्यांचे शिक्षण मुंबई येथे झाले. १९८८ पासून त्यांनी मनोरूग्णांसाठी श्रध्दा पुनवर्सन केंद्र स्थापन केले. आज कर्जत येथे हे केंद्र सुरू असून येथे १२० मनोरुग्ण उपचार घेत आहेत. या कार्याची दखल घेवून सन २०१८ मध्ये फिलीपाईन सरकारने त्यांचा 'रॅमन मॅगसेसे' पुरस्काराने गौरव केला आहे. या योगदानाबद्धल वतवाणी यांचा या वर्षीचा स्वा. से. दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असून या पुरस्काराने आतापर्यंत विविध क्षेत्रातील २९ मान्यवरांना सन्मानित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

माजी मंत्री स्व. विलासराव पाटील-उंडाळकर यांनी वडील स्वा.से. दादा उंडाळकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय स्वातंत्र्यसैनिकांचे अधिवेशन व समाजप्रबोधन कार्यक्रम सुरू केले होते. १९७५ पासून ही परंपरा सुरू आहे. उंडाळकर यांच्या पश्चात स्मारक समितीने ॲड. उदयसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा सुरू ठेवली असल्याचे त्यांनी सांगितले.

सदर राष्ट्रीय कार्यक्रमास स्वातंत्र्यसैनिक, स्वातंत्र्यसैनिकांचे वारसदार, माजी सैनिक उपस्थित राहणार असून तालुक्यातील शेतकरी, माजी सैनिक, युवक, महिला यांना मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन स्वा. दादा उंडाळकर स्मारक समितीच्यावतीने ॲड.उदयसिंह पाटील यांनी केले.

---

## स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार डॉ.भरत वतवाणी यांना जाहीर

### दि. 18 रोजी उंडाळे येथे स्वातंत्र्य सैनिक अधिवेशन व माजी सैनिक मेळाव्यात पुरस्काराचे समारंभपूर्वक वितरण


**कराड (लक्ष्मीपुत्र)**

उंडाळे (ता. कराड) येथील स्वातंत्र्य सेनानी दादा उंडाळकर स्मारक समितीच्या वतीने स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर यांच्या 51 व्या स्मृतीदिनानिमित्त 42 वे स्वातंत्र्य संग्राम सैनिक अधिवेशन व माजी सैनिक मेळावा मंगळवार दि. 18 फेब्रुवारी रोजी होत आहे.

अधिवेशनात यावर्षीचा मानाचा स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त मानसोपचार तज्ञ डॉ भरत वतवाणी यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार निवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे. 51 हजार रूपये रोख, स्मृतीचिन्ह, मानपत्र, शाळ, श्रीफळ असे पुरस्कारचे स्वरूप आहे.

दादा उंडाळकर स्मारक समितीचे विश्वस्त व रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. उदयसिंह पाटील व व्यवस्थापकीय विश्वस्त प्रा.गणपतराव कणसे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.यावेळी प्रा.धनाजीराव काटकर, यांची उपस्थिती होती.

मंगळवार दि. 18 रोजी दुपारी दोन वाजता स्वा. दादा उंडाळकर स्मारक मंदीर उंडाळे येथे अधिवेशनात पुरस्काराचे वितरण होणार आहे.डॉ भरत वतवाणी यांचे रस्त्याने फिरणारे मनोरुग्ण यांच्या बाबतीत मोठे कार्य असून त्यांनी आजपर्यंत तब्बल 7000 रुग्णांवर



उपचार करून त्यांना त्याच्या घरी पाठवले आहे. वतवाणी यांचा जन्म कलकत्ता येथील तर त्याचे शिक्षण मुंबई येथे झाले.1988 पासून त्यांनी मनोरुग्णासाठी श्रद्धा पुनवर्सन केंद्र स्थापन केले.आज कर्जत येथे ही केंद्र सुरू असून 120 मनोरुग्ण उपचार घेत आहेत.या कार्याची दखल घेऊन सन 2018 मध्ये फिलीफाईन सरकारने त्यांचा रॅमन मॅगसेसे पुरस्काराने गौरव केला आहे.

या बरोबर त्याचे समाजकार्य सुरू असून या एकंदरीत योगदानाबद्दल श्री वतवाणी यांचा यावर्षीचा दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

माजी मंत्री स्व. विलासराव पाटील उंडाळकर यांनी वडील स्वातंत्र्य सेनानी दादा उंडाळकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राज्य स्तरीय स्वातंत्र सैनिकांचे अधिवेशन व समाजप्रबोधन कार्यक्रम सुरू केले होते. 1973 पासून ही परंपरा अखंड सुरू आहे. उंडाळकर यांच्या पश्चात स्मारक समितीने ॲड. उदयसिंह पाटील याच्या नेतृत्वाखाली ही परंपरा पुढे सुरू ठेवली आहे. स्व. विलासराव उंडाळकर यांच्यावर महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव होता.

स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर सामाजिक पुरस्काराने आत्तापर्यंत विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये स्वातंत्र सेनानी माजी राजदूत एन.जी.गोरे, सुप्रसिध्द कवी ना.धो. महानोर, स्वातंत्र्य सेनानी श्रीमती उषा मेहता, स्वा.से. गोविंदभाई श्रॉफ, सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती निलमताई देशपांडे, सामाजिक कार्यकर्ते मोहन धारीया, स्वा.से. व साहित्यिक जी.पी. प्रधान, प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर, सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे, सामाजिक कार्यकर्ते शांताराम गरूड, शिक्षण तज्ज्ञ प्राचार्य पी.बी.पाटील, स्वा.सै. प्रभाकररावजी कुंटे, न्यायमूर्ती पी.बी. सावंत, कृषीतज्ज्ञ डॉ. जयंत पाटील, पत्रकार पी. साईनाथ, प्रसिध्द वकील ॲड. उज्ज्वल निकम, डॉ. अभय बंग, जे.जे. रूग्णालयाचे नेत्रतज्ज्ञ तात्याराव लहाने, नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, अर्थशास्त्रज्ञ निळकंठ रथ, लेखक व विचारवंत डॉ. सदानंद मोरे, डॉ. प्रकाश आमटे, स्वातंत्र्य सेनानी भाई वैद्य, लेखक सुरेश व्दादशीवार, डॉ. विवेक सावंत, पद्मश्री डॉ.गणेश देवी, पद्मश्री प्रतापसिंह जाधव, अभिनेते मकरंद अनासपुरे ,अशोक जैन यांचा समावेश आहे.

सदर राष्ट्रीय कार्यक्रमास स्वातंत्र्य सैनिक, स्वातंत्र्यसैनिकांचे वारसदार, माजी सैनिक उपस्थित राहणार असून तालुक्यातील शेतकरी, माजी सैनिक, युवक, महिला यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्वा दादा उंडाळकर स्मारक समितीच्या वतीने शेवटी ऍड उदयसिंह पाटील उंडाळकर यांनी केले.

**MAHARASHTRA**
**News**

**LOKMANTHAN**
**Karad**

**FEBRUARY 2025**

लोकमंथन

असे आवाहन जिल्हा माहिती सातारा. अधिक्षक अथवा लिपिक तसेच आहे.

# स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार डॉ. भरत वतवाणी यांना जाहीर

**कराड / प्रतिनिधी :** उंडाळे, ता. कराड येथील स्वातंत्र्य सेनानी दादा उंडाळकर स्मारक समितीच्या वतीने स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर यांच्या ५१ व्या स्मृतीदिनानिमित्त ४२ वे स्वातंत्र्य संग्राम सैनिक अधिवेशन व माजी सैनिक मेळावा मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी होत आहे. अधिवेशनात यावर्षीचा मानाचा स्वातंत्र्य वीर दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त मानसोपचार तज्ञ डॉ. भरत वतवाणी यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार निवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे. ५१ हजार रूपये रोख, स्मृतीचिन्ह, मानपत्र, शाळ, श्रीफळ असे पुरस्कारचे स्वरूप आहे.

दादा उंडाळकर स्मारक समितीचे विश्वस्त व रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. उदयसिंह पाटील व व्यवस्थापकीय विश्वस्त प्रा. गणपतराव कणसे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी प्रा. धनाजीराव काटकर यांची उपस्थिती होती. मंगळवार, दि. १८ रोजी


**स्व. दादा उंडाळकर**


**डॉ. भरत वतवाणी**

दुपारी दोन वाजता स्वा. दादा उंडाळकर स्मारक मंदीर उंडाळे येथे अधिवेशनात पुरस्काराचे वितरण होणार आहे. डॉ. भरत वतवाणी यांचे रस्त्याने फिरणारे मनोरुग्ण यांच्या बाबतीत मोठे कार्य असून त्यांनी आजपर्यंत तब्बल ७००० रुग्णांवर उपचार करून त्यांना त्याच्या घरी पाठवले आहे. वतवाणी यांचा जन्म कलकत्ता येथील तर त्याचे शिक्षण मुंबई येथे झाले. सन १९८८ पासून त्यांनी मनोरुग्णासाठी श्रध्दा पुनवर्सन केंद्र स्थापन केले. आज कर्जत येथे ही केंद्र सुरू असून १२० मनोरुग्ण उपचार घेत आहेत. या कार्याची दखल घेऊन सन २०१८ मध्ये फिलीफाईन सरकारने त्यांचा रॅमन मॅगसेसे पुरस्काराने गौरव केला आहे. या बरोबर त्याचे समाजकार्य सुरू असून या एकंदरीत योगदानाबद्दल डॉ. वतवाणी यांचा यावर्षीचा दादा उंडाळकर सामाजिक पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

माजी मंत्री स्व. विलासराव पाटील उंडाळकर यांनी वडील स्वातंत्र्य सेनानी दादा उंडाळकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राज्य स्तरीय स्वातंत्र सैनिकांचे अधिवेशन व समाजप्रबोधन कार्यक्रम सुरू केले होते. सन १९७३ पासून ही परंपरा अखंड सुरू आहे. उंडाळकर यांच्या पश्चात स्मारक समितीने ॲड. उदयसिंह पाटील याच्या नेतृत्वाखाली ही परंपरा पुढे सुरू ठेवली आहे. स्व. विलासराव उंडाळकर यांच्यावर महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव होता. या राष्ट्रीय कार्यक्रमास स्वातंत्र्य सैनिक, स्वातंत्र्य सैनिकांचे वारसदार, माजी सैनिक उपस्थित राहणार आहेत. तालुक्यातील शेतकरी, माजी सैनिक, युवक, महिला यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्व. दादा उंडाळकर स्मारक समितीच्या वतीने ॲड उदयसिंह पाटील उंडाळकर यांनी केले.

C M Y K

**MAHARASHTRA**
**News**

**JANADESH**
**Raigad**

**MAY 2025**

ठाणे रायगड पालघर

झुंजार पत्रकारांचं झुंजार दैनिक

*Email : janadesh99@gmail.com

# जनादेश

विशाल जागृत

दैनिक जनादेश आता दररोज ई-पेपर स्वरुपात पाहता येईल...
https://janadesh.co
या वेब लिंकवर क्लीक करा

*वर्ष: २२ *अंक: २०३ *बुधवार २८ मे २०२५ *संपादक : कैलाश म्हापदी *कार्यकारी संपादक : जयदास मोरे *पानं: ४ *किं. २ ₹

## महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांची कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन केंद्राला सदिच्छा भेट

प्रतिनिधी

कर्जत, दि. २७ : महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास विभागाच्या मंत्री अदिती तटकरे यांनी आज संध्याकाळी कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनला सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी त्यांच्या सोबत माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, कर्जतचे तहसीलदार धनंजय जाधव, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्रद्धा संस्थेच्या वतीने ना. तटकरे यांचे पारंपरिक आरती, फुलांच्या पुष्पगुच्छांसह स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांना संस्थेच्या कार्याचा मागोवा घेणारे एक मराठी पुस्तक व विशेष माहितीपुस्तिका प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात श्रद्धा संस्थेच्या कार्यावर आधारित ९ मिनिटांच्या माहितीपटाने झाली.

श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशन ही डॉ. भरत आणि डॉ. स्मिता वाटवानी यांनी स्थापन केलेली संस्था असून, भारतातील भटक्या मानसिक रुग्ण निराधार व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी कार्यरत आहे. ''बचाव निवारा व उपचार पुनर्प्राप्ती कुटुंबीयांशी पुनर्मिलन पाठपुरावा'' या साखळीप्रणालीवर श्रद्धाचे कार्य आधारित आहे. आतापर्यंत संस्थेने देशभरातील ११,१४५ मानसिकदृष्ट्या आजारी निराधार व्यक्तींना त्यांच्या कुटुंबांशी पुन्हा एकत्र केले आहे, त्यात ३,३५१ महिला व १५ माता-बाल प्रकरणांचा समावेश आहे.



संस्थेच्या कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता लाभली असून, डॉ. भरत वाटवानी यांना २०१८ मध्ये रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याच कार्याच्या गौरवार्थ, त्यांना २०२५ च्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राष्ट्रपती भवनातील विशेष स्नेहभोजनासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

मंत्र्यांनी केंद्राचा सविस्तर दौरा करत ६.५ एकरांच्या परिसरात विकसित केलेल्या हरितलक्ष्य पाहिले. हा परिसर पर्यावरणप्रेमी व वृक्षारोपण कार्यासाठी प्रसिद्ध असलेल्या विजय कुमार कट्टी यांनी विकसित केला असून, त्याला 'ठाण्याचे वृक्षपुरुष' अशी ओळख आहे. त्यांनी या हरित परिसराच्या उपचारात्मक परिणामाची दखल घेतली.

यानंतर मा. तटकरे यांनी महिला वॉर्डला भेट दिली व तेथील रुग्णांशी संवाद साधला. त्यांनी महिला रुग्णांच्या गोपनीयतेचा आदर राखत, उपस्थित पुरुष अधिकाऱ्यांना व छायाचित्रकारांना वॉर्डमध्ये प्रवेश व फोटो न घेण्याची विनंती केली. त्यांच्या सहानुभूतीपूर्ण दृष्टिकोनामुळे उपस्थितांची मने जिंकली.

मंत्र्यांनी संस्थेच्या सुविधा, बहुभाषिक व प्रशिक्षित कर्मचारी, उपलब्ध बेड्स यांची प्रशंसा केली आणि संस्थेच्या कार्याला सकारात्मक प्रतिसाद दिला.

या भेटीमुळे श्रद्धा फाउंडेशनमधील रुग्ण व कार्यकर्ते यांना प्रोत्साहन लाभले असून, भटक्या महिला मानसिक रुग्णांसाठी अधिक प्रभावी सामाजिक बदल घडेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**MAY 2025**


दैनिक बेधडक महाराष्ट्र

RNI NO MAHMAR/2022/86108

संपादक: अभिजीत नारायण दरेकर - ९७६४९९२५२५

मंगळवार २७ मे २०२५, वर्ष ३. अंक ३३१ पान ४. रुपय ५, रायगड / महाराष्ट्र /e news


# महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनला दिली भेट



कर्जत:-जयेश जाधव

महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी काल, दि.26 मे 2025 रोजी श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या कर्जत केंद्राला महत्त्वपूर्ण भेट दिली. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, कर्जत तहसिलदार धनंजय जाधव आणि पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्यासह मान्यवरांच्या पथकासह श्रद्धा टीमने पारंपारिक आरती, पुष्पहार अर्पण करून आणि भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी, बेघर महिलांसोबत फाउंडेशनच्या प्रभावी कार्याचे तपशीलवार वर्णन करणारे खास क्युरेटेड मराठी साहित्य देवून मंत्र्यांचे हार्दिक स्वागत केले.भेटीदरम्यान, मंत्री तटकरे आणि त्यांच्या शिष्टमंडळाला श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या प्रवास आणि कामगिरीचे वर्णन करणारा नऊ मिनिटांचा माहितीपट दाखवण्यात आला. रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वाटवानी आणि डॉ. स्मिता वाटवानी यांनी स्थापन केलेली श्रद्धा ही मानसिक आरोग्य व्यावसायिकांच्या नेतृत्वाखालील एक अशासकीय सामाजिक संस्था आहे. हे संपूर्ण भारतातील भटकंती करणाऱ्या मानसिक आजारी निराधारांच्या बचाव, पुनर्वसन आणि पुनर्मिलनासाठी समर्पित आहे.आजपर्यंत, या संस्थेने 11 हजार 145 व्यक्तींचे त्यांच्या कुटुंबांसह पुनर्मिलन घडवून आणले आहे, ज्यात 3 हजार 351 महिला आणि 15 आई-बाळ प्रकरणे आहेत. फाउंडेशन बचाव, निवारा आणि उपचार, पुन:प्राप्ती, कुटुंब पुनर्मिलन, पाठपुरावा या मूल्य तत्वांवर काम करते. तसेच ही संस्था देशभरातील 40 हून अधिक शासकीय संस्था आणि 132 स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने कार्य करते.यावेळी मंत्री कु.तटकरे यांनी केंद्राच्या 6.5 एकर परिसराला देखील भेट दिली. "ठाण्याचे वृक्ष माणूस" म्हणून ओळखले जाणारे पर्यावरण तज्ञ विजयकुमार कट्टी यांनी मंत्री महोदयांना मानसिक आरोग्य पुन:प्राप्तीमध्ये हरीत, उपचारात्मक वातावरणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि केंद्राच्या पर्यावरणीय दृष्टीकोनाची सविस्तर माहिती दिली.यावेळी कु.तटकरे यांनी येथील महिला वॉर्डला भेट दिली आणि महिलांशी वैयक्तिकरित्या संवाद साधला. याप्रसंगी आपली संवेदनशीलता दाखवीत मंत्री महोदयांनी सोबत असणाऱ्या पुरुष अधिकाऱ्यांना आणि माध्यम कर्मचाऱ्यांना रुग्णांच्या गोपनीयतेचा आदर करण्याचा आणि संवेदनशील क्षेत्रात फोटो काढण्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला.श्रद्धा संस्थेच्या कामाच्या व्याप्तीबद्दल कौतुक व्यक्त करताना, मंत्री कु.तटकरे यांनी येथील पायाभूत सुविधा, बहुभाषिक आणि वैद्यकीयदृष्ट्या प्रशिक्षित कर्मचारी आणि समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी फाउंडेशनच्या समर्पण भावनेचे कौतुक केले.

महिला व बालविकास मंत्री कु.तटकरे यांच्या उपस्थितीने श्रद्धा फाऊंडेशनच्या रुग्ण आणि कर्मचारी दोघांनाही प्रेरणा मिळाली आणि या कारणासाठी मजबूत शासकीय आणि सामाजिक पाठिंब्याची आशा बळकट झाली. महिला आणि बालविकास मंत्री म्हणून, त्यांची भेट भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी निराधार महिलांच्या समस्येला मुख्य प्रवाहात आणण्याच्या दिशेने एक प्रतिकात्मक आणि धोरणात्मक पाऊल आहे.


RNI NO: MAHMAR/2022/82992

दि. २७ मे २०२५

साप्ताहिक रायगडचे वादळ

9323376122

शिवप्रेरित विचारांनी समाजातील अन्यायावर लेखणीने वार करणारे

संपादक - प्रभाकर गंगावणे | eNews | कार्यकारी संपादक - प्रथमेश कुडेकर


# श्रद्धा पुनर्वसन केंद्राला मंत्री आदिती तटकरे यांची सदिच्छा भेट

## निराधारांना नवजीवन देणाऱ्या कार्याचे कौतुक



कैलास म्हामले / कर्जत:

कर्जत तालुक्यातील वेणगाव ग्रामपंचायत हद्दीतील श्रद्धा पुनर्वसन केंद्राला सोमवार, दिनांक २६ मे रोजी सायंकाळी महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री नामदार आदिती तटकरे यांनी सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली आणि येथे उपचार घेत असलेल्या निराधार महिलांशी संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

श्रद्धा रेहॅबिलिटेशन फाउंडेशन ही संस्था रस्त्यावर फिरणाऱ्या बेवारस व मतिमंद रुग्णांना उपचार देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी गेली ३८ वर्षे कार्यरत आहे. आतापर्यंत संस्थेने ११,१४५ रुग्णांचे पुनर्वसन केले असून त्यामध्ये ३,३५१ महिला रुग्णांचा समावेश आहे.

संस्थेचे संस्थापक आणि प्रमुख मानसोपचारतज्ज्ञ डॉ. भरत वाटवानी यांना त्यांच्या सेवाभावी कार्यासाठी प्रतिष्ठित रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

संस्थेच्या कार्यसंघात सुमारे ५० सदस्य आहेत. यामध्ये डॉक्टर, नर्सेस, सोशल वर्कर्स, मेडिकल ऑफिसर्स आणि सहाय्यक कर्मचारी यांचा समावेश आहे. या कार्यात विजयकुमार कट्टी (ट्री मॅन ऑफ ठाणे) यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. संस्था देणग्यांच्या आधारे आपले कार्य चालवते.

मंत्री आदिती तटकरे यांनी महिला वॉर्डला भेट देत रुग्णांशी संवाद साधला तसेच संस्थेच्या वृक्षारोपण उपक्रमाची माहिती जाणून घेतली. त्यांनी संस्थेच्या कार्याची प्रशंसा करत सांगितले, "अशा संस्थांच्या कार्यामुळे समाजातील दुर्लक्षित घटकांना नवी उमेद मिळते. शासन स्तरावरून आवश्यक सहकार्य करण्यात येईल."

या प्रसंगी कर्जतचे तहसीलदार धनंजय जाधव, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रभाकर बोरकर, माजी जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर घारे, भाजप नेते रमेश मुंडे, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस अशोक भोपतराव, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड आदी मान्यवर उपस्थित होते.

वेणगाव ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच अश्विनी मंगेश पालकर, सदस्य जागृती शरद पालकर, वासंती जयदास पालकर, वैशाली विलास पालकर, श्वेता शरद पालकर यांनी मंत्री तटकरे यांचे स्वागत केले.

संस्थेच्या सहाय्यक मानसोपचारतज्ज्ञ डॉ. स्वराली कोंडविलकर यांनी सांगितले की, "मंत्री आदिती तटकरे यांची भेट आमच्यासाठी प्रेरणादायी ठरली आहे. त्यांच्या भेटीमुळे आम्हाला नवचैतन्य मिळाले असून महिला मनोरुग्णांसाठी आमचे कार्य आणखी व्यापक करण्याचा निर्धार आम्ही केला आहे."



**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**MAY 2025**

महाराष्ट्रामध्ये प्रत्येक ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे अधिक माहितीसाठी 8983242343

निर्भीड निष्पक्ष मराठी वृत्तपत्र

मुख्य संपादक: रघुनाथ गणपत कडू

RNI NO. MAHMUL/2023/88828

रायगड स्वाभिमान

संपादक: दिनेश चांगू मोरे | सह संपादक : अरविंद अनंता मगर | आवृत्ती संपादक : किरण लक्ष्मण मोरे

मंगळवार दिनांक २७ मे २०२५ ..|.. बातम्या जाहिरात व प्रतिनिधी नियुक्ती साठी संपर्क : ८९८३२४२३४३

# महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनला दिली भेट





महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी काल, दि.26 मे 2025 रोजी श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या कर्जत केंद्राला महत्त्वपूर्ण भेट दिली. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, कर्जत तहसिलदार धनंजय जाधव आणि पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्यासह मान्यवरांच्या पथकासह श्रद्धा टीमने पारंपारिक आरती, पुष्पहार अर्पण करून आणि भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी, बेघर महिलांसोबत फाउंडेशनच्या प्रभावी कार्याचे तपशीलवार वर्णन करणारे खास क्युरेटेड मराठी साहित्य देवून मंत्र्यांचे हार्दिक स्वागत केले.

भेटीदरम्यान, मंत्री तटकरे आणि त्यांच्या शिष्टमंडळाला श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या प्रवास आणि कामगिरीचे वर्णन करणारा नऊ मिनिटांचा माहितीपट दाखवण्यात आला. रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वाटवानी आणि डॉ. स्मिता वाटवानी यांनी स्थापन केलेली श्रद्धा ही मानसिक आरोग्य व्यावसायिकांच्या नेतृत्वाखालील एक अशासकीय सामाजिक संस्था आहे. हे संपूर्ण भारतातील भटकंती करणाऱ्या मानसिक आजारी निराधारांच्या बचाव, पुनर्वसन आणि पुनर्मिलनासाठी समर्पित आहे.

आजपर्यंत, या संस्थेने 11 हजार 145 व्यक्तींचे त्यांच्या कुटुंबांसह पुनर्मिलन घडवून आणले आहे, ज्यात 3 हजार 351 महिला आणि 15 आई-बाळ प्रकरणे आहेत. फाउंडेशन बचाव, निवारा आणि उपचार, पुनःप्राप्ती, कुटुंब पुनर्मिलन, पाठपुरावा या मूल्य तत्वांवर काम करते. तसेच ही संस्था देशभरातील 40 हून अधिक शासकीय संस्था आणि 132 स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने कार्य करते.

यावेळी मंत्री कु.तटकरे यांनी केंद्राच्या 6.5 एकर परिसराला देखील भेट दिली. "ठाण्याचे वृक्ष माणूस" म्हणून ओळखले जाणारे पर्यावरण तज्ञ विजयकुमार कट्टी यांनी मंत्री महोदयांना मानसिक आरोग्य पुनःप्राप्तीमध्ये हरीत, उपचारात्मक वातावरणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि केंद्राच्या पर्यावरणीय दृष्टीकोनाची सविस्तर माहिती दिली.

यावेळी कु.तटकरे यांनी येथील महिला वॉर्डला भेट दिली आणि महिलांशी वैयक्तिकरित्या संवाद साधला. याप्रसंगी आपली संवेदनशीलता दाखवीत मंत्री महोदयांनी सोबत असणाऱ्या पुरुष अधिकाऱ्यांना आणि माध्यम कर्मचाऱ्यांना रुग्णांच्या गोपनीयतेचा आदर करण्याचा आणि संवेदनशील क्षेत्रात फोटो काढण्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला.

श्रद्धा संस्थेच्या कामाच्या व्याप्तीबद्दल कौतुक व्यक्त करताना, मंत्री कु.तटकरे यांनी येथील पायाभूत सुविधा, बहुभाषिक आणि वैद्यकीयदृष्ट्या प्रशिक्षित कर्मचारी आणि समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी फाउंडेशनच्या समर्पण भावनेचे कौतुक केले.

महिला व बालविकास मंत्री कु.तटकरे यांच्या उपस्थितीने श्रद्धा फाऊंडेशनच्या रुग्ण आणि कर्मचारी दोघांनाही प्रेरणा मिळाली आणि या कारणासाठी मजबूत शासकीय आणि सामाजिक पाठिंब्याची आशा बळकट झाली. महिला आणि बालविकास मंत्री म्हणून, त्यांची भेट भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी निराधार महिलांच्या समस्येला मुख्य प्रवाहात आणण्याच्या दिशेने एक प्रतिकात्मक आणि धोरणात्मक पाऊल आहे.

रायगड स्वाभिमान

मंगळवार २७ मे २०२५ | बातम्या जाहिरात व प्रतिनिधी नियुक्ती साठी | संपर्क : ८९८३२४२३४३

# महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनला दिली भेट

## कर्जत मध्ये मंत्रीमहोदयांचे औक्षण करून केले यथोचित स्वागत.







**कर्जत : प्रतिनिधी.**

रायगड,दि.27:- महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी काल, दि.26 मे 2025 रोजी श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या कर्जत केंद्राला महत्त्वपूर्ण भेट दिली. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, कर्जत तहसिलदार धनंजय जाधव आणि पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्यासह मान्यवरांच्या पथकासह श्रद्धा टीमने पारंपारिक आरती, पुष्पहार अर्पण करून आणि भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी, बेघर महिलांसोबत फाउंडेशनच्या प्रभावी कार्याचे तपशीलवार वर्णन करणारे खास क्युरेटेड मराठी साहित्य देवून मंत्र्यांचे हार्दिक स्वागत केले.

भेटीदरम्यान, मंत्री तटकरे आणि त्यांच्या शिष्टमंडळाला श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या प्रवास आणि कामगिरीचे वर्णन करणारा नऊ मिनिटांचा माहितीपट दाखवण्यात आला. रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वाटवानी आणि डॉ. स्मिता वाटवानी यांनी स्थापन केलेली श्रद्धा ही मानसिक आरोग्य व्यावसायिकांच्या नेतृत्वाखालील एक अशासकीय सामाजिक संस्था आहे. हे संपूर्ण भारतातील भटकंती करणाऱ्या मानसिक आजारी निराधारांच्या बचाव, पुनर्वसन आणि पुनर्मिलनासाठी समर्पित आहे.

आजपर्यंत, या संस्थेने 11 हजार 145 व्यक्तींचे त्यांच्या कुटुंबांसह पुनर्मिलन घडवून आणले आहे, ज्यात 3 हजार 351 महिला आणि 15 आई-बाळ प्रकरणे आहेत. फाउंडेशन बचाव, निवारा आणि उपचार, पुन:प्राप्ती, कुटुंब पुनर्मिलन, पाठपुरावा या मूल्य तत्वांवर काम करते. तसेच ही संस्था देशभरातील 40 हून अधिक शासकीय संस्था आणि 132 स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने कार्य करते.

यावेळी मंत्री कु.तटकरे यांनी केंद्राच्या 6.5 एकर परिसराला देखील भेट दिली. "ठाण्याचे वृक्ष माणूस" म्हणून ओळखले जाणारे पर्यावरण तज्ञ विजयकुमार कट्टी यांनी मंत्री महोदयांना मानसिक आरोग्य पुन:प्राप्तीमध्ये हरीत, उपचारात्मक वातावरणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि केंद्राच्या पर्यावरणीय दृष्टीकोनाची सविस्तर माहिती दिली.

यावेळी कु.तटकरे यांनी येथील महिला वॉर्डला भेट दिली आणि महिलांशी वैयक्तिकरित्या संवाद साधला. याप्रसंगी आपली संवेदनशीलता दाखवीत मंत्री महोदयांनी सोबत असणाऱ्या पुरुष अधिकाऱ्यांना आणि माध्यम कर्मचाऱ्यांना रुग्णांच्या गोपनीयतेचा आदर करण्याचा आणि संवेदनशील क्षेत्रात फोटो काढण्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला.

श्रद्धा संस्थेच्या कामाच्या व्याप्तीबद्दल कौतुक व्यक्त करताना, मंत्री कु.तटकरे यांनी येथील पायाभूत सुविधा, बहुभाषिक आणि वैद्यकीयदृष्ट्या प्रशिक्षित कर्मचारी आणि समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी फाउंडेशनच्या समर्पण भावनेचे कौतुक केले.

महिला व बालविकास मंत्री कु.तटकरे यांच्या उपस्थितीने श्रद्धा फाऊंडेशनच्या रुग्ण आणि कर्मचारी दोघांनाही प्रेरणा मिळाली आणि या कारणासाठी मजबूत शासकीय आणि सामाजिक पाठिंब्याची आशा बळकट झाली. महिला आणि बालविकास मंत्री म्हणून, त्यांची भेट भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी निराधार महिलांच्या समस्येला मुख्य प्रवाहात आणण्याच्या दिशेने एक प्रतिकात्मक आणि धोरणात्मक पाऊल आहे.

00000

# महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांची कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन केंद्राला सदिच्छा भेट

कर्जत : महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास विभागाच्या माननीय मंत्री मा. अदिती तटकरे यांनी आज संध्याकाळी कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनला सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी त्यांच्या सोबत माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. सुधाकर घारे, कर्जतचे तहसीलदार श्री. धनंजय जाधव, पोलीस निरीक्षक श्री. सुरेंद्र गरड तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्रद्धा संस्थेच्या वतीने माननीय मंत्र्यांचे पारंपरिक आरती, फुलांच्या पुष्पगुच्छांसह स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांना संस्थेच्या कार्याचा मागोवा घेणारे एक मराठी पुस्तक व विशेष माहितीपुस्तिका प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात श्रद्धा संस्थेच्या कार्यावर आधारित ९ मिनिटांच्या माहितीपटाने झाली.

श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशन ही डॉ. भरत आणि डॉ. स्मिता वाटवानी यांनी स्थापन केलेली संस्था असून, भारतातील भटक्या मानसिकरुग्ण निराधार व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी कार्यरत आहे. बचाव फ निवारा व उपचार फ पुनर्प्राप्ती फ कुटुंबीयांशी पुनर्मिलन फ पाठपुरावा या साखळीप्रणालीवर श्रद्धाचे कार्य आधारित आहे. आतापर्यंत संस्थेने देशभरातील ११,१४५ मानसिकदृष्ट्या आजारी निराधार व्यक्तींना त्यांच्या कुटुंबांशी पुन्हा एकत्र केले आहे, त्यात ३,३५१ महिला व १५ माता-बाल प्रकरणांचा समावेश आहे.



संस्थेच्या कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता लाभली असून, डॉ. भरत वाटवानी यांना २०१८ मध्ये रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याच कार्याच्या गौरवार्थ, त्यांना २०२५ च्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राष्ट्रपती भवनातील विशेष स्नेहभोजनासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

मंत्र्यांनी केंद्राचा सविस्तर दौरा करत ६.५ एकरांच्या परिसरात विकसित केलेल्या हरितलक्ष्य पाहिले. हा परिसर पर्यावरणप्रेमी व वृक्षारोपण कार्यासाठी प्रसिद्ध असलेल्या श्री. विजय कुमार कट्टी यांनी विकसित केला असून, त्याला 'ठाण्याचे वृक्षपुरुष' अशी ओळख आहे. त्यांनी या हरित परिसराच्या उपचारात्मक परिणामाची दखल घेतली.

यानंतर मा. तटकरे यांनी महिला वॉर्डला भेट दिली व तेथील रुग्णांशी संवाद साधला. त्यांनी महिला रुग्णांच्या गोपनीयतेचा आदर राखत, उपस्थित पुरुष अधिकाऱ्यांना व छायाचित्रकारांना वॉर्डमध्ये प्रवेश व फोटो न घेण्याची विनंती केली. त्यांच्या सहानुभूतीपूर्ण दृष्टिकोनामुळे उपस्थितांची मने जिंकली.

मंत्र्यांनी संस्थेच्या सुविधा, बहुभाषिक व प्रशिक्षित कर्मचारी, उपलब्ध बेड्स यांची प्रशंसा केली आणि संस्थेच्या कार्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. या भेटीमुळे श्रद्धा फाउंडेशनमधील रुग्ण व कार्यकर्ते यांना प्रोत्साहन लाभले असून, भटक्या महिला मानसिक रुग्णांसाठी अधिक प्रभावी सामाजिक बदल घडेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

RNI NO. MAHMAR/2016/67569

# आपले साम्राज्य

संपादिका : सीमा प्रमोद मोरे

▪ वर्ष : १० ▪ अंक क्र. १०५ ▪ रायगड ▪ गुरूवार, २९ मे २०२५ ▪ पाने : ८ ▪ किंमत : २रू.

## महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनला दिली भेट

कर्जत (जयेश जाधव) - महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी काल, दि.26 मे 2025 रोजी श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या कर्जत केंद्राला महत्त्वपूर्ण भेट दिली. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, कर्जत तहसिलदार धनंजय जाधव आणि पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्यासह मान्यवरांच्या पथकासह श्रद्धा टीमने पारंपारिक आरती, पुष्पहार अर्पण करून आणि भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी, बेघर महिलांसोबत फाउंडेशनच्या प्रभावी कार्याचे तपशीलवार वर्णन करणारे खास क्युरेटेड मराठी साहित्य देवून मंत्र्यांचे हार्दिक स्वागत केले.

भेटीदरम्यान, मंत्री तटकरे आणि त्यांच्या शिष्टमंडळाला श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या प्रवास आणि कामगिरीचे वर्णन करणारा नऊ मिनिटांचा माहितीपट दाखवण्यात आला. रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वाटवानी आणि डॉ. स्मिता वाटवानी यांनी स्थापन केलेली श्रद्धा ही मानसिक आरोग्य व्यावसायिकांच्या नेतृत्वाखालील एक अशासकीय सामाजिक संस्था आहे. हे संपूर्ण भारतातील भटकंती करणाऱ्या मानसिक आजारी निराधारांच्या बचाव, पुनर्वसन आणि पुनर्मिलनासाठी समर्पित आहे.

आजपर्यंत, या संस्थेने 11 हजार 145 व्यक्तींचे त्यांच्या कुटुंबांसह पुनर्मिलन घडवून आणले आहे, ज्यात 3 हजार 351 महिला आणि 15 आई-



बाळ प्रकरणे आहेत. फाउंडेशन बचाव, निवारा आणि उपचार, पुन:प्राप्ती, कुटुंब पुनर्मिलन, पाठपुरावा या मूल्य तत्वांवर काम करते. तसेच ही संस्था देशभरातील 40 हून अधिक शासकीय संस्था आणि 132 स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने कार्य करते.

यावेळी मंत्री कु.तटकरे यांनी केंद्राच्या 6.5 एकर परिसराला देखील भेट दिली. "ठाण्याचे वृक्ष माणूस" म्हणून ओळखले जाणारे पर्यावरण तज्ञ विजयकुमार कट्टी यांनी मंत्री महोदयांना मानसिक आरोग्य पुन:प्राप्तीमध्ये हरीत, उपचारात्मक वातावरणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि केंद्राच्या पर्यावरणीय दृष्टीकोनाची सविस्तर माहिती दिली.

यावेळी कु.तटकरे यांनी येथील महिला वॉर्डला भेट दिली आणि महिलांशी वैयक्तिकरित्या संवाद साधला. याप्रसंगी आपली संवेदनशीलता दाखवीत मंत्री महोदयांनी सोबत असणाऱ्या पुरुष अधिकाऱ्यांना आणि माध्यम कर्मचाऱ्यांना रुग्णांच्या गोपनीयतेचा आदर करण्याचा आणि संवेदनशील क्षेत्रात फोटो काढण्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. श्रद्धा संस्थेच्या कामाच्या व्याप्तीबद्दल कौतुक व्यक्त करताना, मंत्री कु.तटकरे यांनी येथील पायाभूत सुविधा, बहुभाषिक आणि वैद्यकीयदृष्ट्या प्रशिक्षित कर्मचारी आणि समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी फाउंडेशनच्या समर्पण भावनेचे कौतुक केले.

महिला व बालविकास मंत्री कु.तटकरे यांच्या उपस्थितीने श्रद्धा फाऊंडेशनच्या रुग्ण आणि कर्मचारी दोघांनाही प्रेरणा मिळाली आणि या कारणासाठी मजबूत शासकीय आणि सामाजिक पाठिंब्याची आशा बळकट झाली. महिला आणि बालविकास मंत्री म्हणून, त्यांची भेट भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी निराधार महिलांच्या समस्येला मुख्य प्रवाहात आणण्याच्या दिशेने एक प्रतिकात्मक आणि धोरणात्मक पाऊल आहे.

# जनचक्र वार्ता

मराठी साप्ताहिक

सामान्य जनतेचा आवाज | मुख्य संपादक : श्री दिनेश रामचंद्र म्हात्रे | RNIMAHMAR53157

## श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनला आदिती तटकरे यांनी दिली भेट





**जनचक्र वार्ता:-** पेण (प्रतिनिधी) महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी काल, दि.26 मे 2025 रोजी श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या कर्जत केंद्राला महत्त्वपूर्ण भेट दिली. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, कर्जत तहसिलदार धनंजय जाधव आणि पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्यासह मान्यवरांच्या पथकासह श्रद्धा टीमने पारंपारिक आरती, पुष्पहार अर्पण करुन आणि भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी, बेघर महिलांसोबत फाउंडेशनच्या प्रभावी कार्याचे तपशीलवार वर्णन करणारे खास क्युरेटेड मराठी साहित्य देवून मंत्र्यांचे हार्दिक स्वागत केले.

भेटीदरम्यान, मंत्री तटकरे आणि त्यांच्या शिष्टमंडळाला श्रद्धा पुनर्वसन फाउंडेशनच्या प्रवास आणि कामगिरीचे वर्णन करणारा नऊ मिनिटांचा माहितीपट दाखवण्यात आला. रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वाटवानी आणि डॉ. स्मिता वाटवानी यांनी स्थापन केलेली श्रद्धा ही मानसिक आरोग्य व्यावसायिकांच्या नेतृत्वाखालील एक अशासकीय सामाजिक संस्था आहे. हे संपूर्ण भारतातील भटकंती करणाऱ्या मानसिक आजारी निराधारांच्या बचाव, पुनर्वसन आणि पुनर्मिलनासाठी समर्पित आहे.

आजपर्यंत, या संस्थेने 11 हजार 145 व्यक्तींचे त्यांच्या कुटुंबांसह पुनर्मिलन घडवून आणले आहे, ज्यात 3 हजार 351 महिला आणि 15 आई-बाळ प्रकरणे आहेत. फाउंडेशन बचाव, निवारा आणि उपचार, पुन:प्राप्ती, कुटुंब पुनर्मिलन, पाठपुरावा या मूल्य तत्वांवर काम करते. तसेच ही संस्था देशभरातील 40 हून अधिक शासकीय संस्था आणि 132 स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने कार्य करते.

यावेळी मंत्री कु.तटकरे यांनी केंद्राच्या 6.5 एकर परिसराला देखील भेट दिली. "ठाण्याचे वृक्ष माणूस" म्हणून ओळखले जाणारे पर्यावरण तज्ञ विजयकुमार कट्टी यांनी मंत्री महोदयांना मानसिक आरोग्य पुन:प्राप्तीमध्ये हरीत, उपचारात्मक वातावरणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि केंद्राच्या पर्यावरणीय दृष्टीकोनाची सविस्तर माहिती दिली.

यावेळी कु.तटकरे यांनी येथील महिला वॉर्डला भेट दिली आणि महिलांशी वैयक्तिकरित्या संवाद साधला. याप्रसंगी आपली संवेदनशीलता दाखवीत मंत्री महोदयांनी सोबत असणाऱ्या पुरुष अधिकाऱ्यांना आणि माध्यम कर्मचाऱ्यांना रुग्णांच्या गोपनीयतेचा आदर करण्याचा आणि संवेदनशील क्षेत्रात फोटो काढण्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला.

श्रद्धा संस्थेच्या कामाच्या व्याप्तीबद्दल कौतुक व्यक्त करताना, मंत्री कु.तटकरे यांनी येथील पायाभूत सुविधा, बहुभाषिक आणि वैद्यकीयदृष्ट्या प्रशिक्षित कर्मचारी आणि समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी फाउंडेशनच्या समर्पण भावनेचे कौतुक केले.

महिला व बालविकास मंत्री कु.तटकरे यांच्या उपस्थितीने श्रद्धा फाऊंडेशनच्या रुग्ण आणि कर्मचारी दोघांनाही प्रेरणा मिळाली आणि या कारणासाठी मजबूत शासकीय आणि सामाजिक पाठिंब्याची आशा बळकट झाली. महिला आणि बालविकास मंत्री म्हणून, त्यांची भेट भारतातील मानसिकदृष्ट्या आजारी निराधार महिलांच्या समस्येला मुख्य प्रवाहात आणण्याच्या दिशेने एक प्रतिकात्मक आणि धोरणात्मक पाऊल आहे.

**MAHARASHTRA**
**News**

**SAKAL**
**Pune**

**June 2025**

सकाळ

05.06.2025

# तब्बल २२ वर्षांनंतर भेटली 'माय'

## येरवडा मनोरुग्णालय, श्रद्धा फाउंडेशनच्या प्रयत्नांना यश

पुणे, ता. ५ : मुलगा, दोन मुली अशा तीन चिमुकल्यांना जन्म दिल्यानंतर मानसिक आजारामुळे कर्नाटकमधील बेल्लारी जिल्ह्यातील 'लक्ष्मी' (वय ५८) घर सोडून निघून गेली. आईच्या मायेने पोरके झालेल्या मुलांनी तिची आशा सोडली होती. आता आई या जगात नसेल या विचाराने तिच्या जपून ठेवलेल्या साडीची ते २२ वर्षे पूजा करायचे. परंतु येरवडा मनोरुग्णालय व श्रद्धा फाउंडेशनच्या प्रयत्नाने त्या भावंडांना २७ मे रोजी माय 'लक्ष्मी' पुन्हा भेटल्याने त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

मानसिक आजाराने ग्रासलेली लक्ष्मी वारंवार घर सोडून जायची. पती पेदन्ना तिला पुन्हा पुन्हा शोधून आणत होता. पण एके दिवशी ती हरवली ते कायमचीच. त्यातच तिच्या पतीचे २००६ मध्ये निधन झाले व तीन मुले पोरकी झाली. दरम्यान, कर्नाटकातून घराबाहेर पडलेली लक्ष्मी भटकत-भटकत ऑक्टोबर २०१६ मध्ये इंदापूरला पोहोचली. भिकाऱ्याच्या वेशात असलेली लक्ष्मी दिसेल त्यावर काठी उगारायची. स्थानिक पोलिसांनी शिवाजीनगर न्यायालयाच्या आदेशाने तिला येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात दाखल केले. येथे उपचार घेऊन ती बरीही झाली.

आता प्रश्न होता तिच्या घरच्यांना शोधण्याचा. पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने तिला दोन वर्षांपूर्वी येरवडा मनोरुग्णालयातून रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील श्रद्धा फाउंडेशनच्या पुनर्वसन केंद्रात पाठवण्यात आले. संस्थेतील कार्यकर्त्यांनी तिला बोलते करून मिळालेल्या माहितीनुसार तिच्या घरच्यांचा शोध घेण्यासाठी रुग्णवाहिकेने कर्नाटकातील बेल्लारी जिल्ह्यातील मुल्लार पेठगाव गाठले. तेथील लोकांना भाषेची अडचण असल्याने त्यांनी लक्ष्मीचे छायाचित्र दाखवून कुटुंबाची चौकशी केली. परंतु त्या पत्त्यावर लक्ष्मीचे कुटुंब नसल्याने ते पुन्हा परतले. दरम्यान, लक्ष्मीचा मुलगा व्यंकटेशला याबाबत माहिती मिळाली. मात्र, तो गावात येईपर्यंत फाउंडेशनचे सहकारी निघून गेले होते.

> प्रसूतीच्या काळात ताणतणाव व घरातील अज्ञानामुळे उपचार घेता आले नाही. वेळीच मानसिक आजाराचे निदान झाल्यास उपचार होऊन रुग्ण बरे होऊ शकतात. जेणेकरून कुटुंबाची व समाजाची घडी विस्कटणार नाही.
> - **डॉ. क्षमा राठोड**, वरिष्ठ मनोविकारतज्ज्ञ, येरवडा मनोरुग्णालय

> येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात दीडशे रुग्ण दीर्घकालीन वास्तव्यास आहेत. या रुग्णांना घरी सोडण्यासाठी प्रयत्न केले जातात. यासाठी रुग्णांच्या नातेवाइकांनी व समाजाने सहकार्य करण्याची गरज आहे. औषधासोबतच रुग्णांना प्रेमाची गरज असते. तरच समाजातील मानसिक आजारावर आपण मात करू शकतो.
> - **डॉ. श्रीनिवास कोलोड**, अधीक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे

### आईसाठी व्यंकटेशचा पाठपुरावा

■ आईच्या प्रेमासाठी आतुरलेल्या व्यंकटेशने चिकाटी न सोडता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून रुग्णवाहिकेवर लिहिलेल्या मोबाईल नंबरवर संस्थेत संपर्क साधला. या वेळी आई तेथे असल्याचे समजताच त्याने क्षणाचाही विलंब न करता दोन बहिणी लिंगम्मा व हनुमक्का यांच्यासह फाउंडेशनचे पुनर्वसन केंद्र गाठले. तेथे आईला पाहिल्यानंतर त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. व्यंकटेश हा स्वतःची मालवाहू गाडी चालवतो, तर हनुमक्का परिचारिका आहे.

### संस्थेचा अविरत प्रयत्न

■ परिचारिका मंगल बांगर, समाजसेविका फरीदा शेख आणि वसप्पा बिराजदार यांनी कन्नड भाषेत लक्ष्मीशी संवाद साधत तिच्या गावाचा शोध घेतला. श्रद्धा फाउंडेशनचे डॉ. भरत वाटवानी यांच्या नेतृत्वाखाली डॉ. श्रीनिवास मोरे, समाजसेविका नीलम राणा शिरसाठ, सिद्धू धुमालवार, नीलेश गाढे व सहकाऱ्यांनी त्यासाठी प्रयत्न केले. आत्तापर्यंत ७३ रुग्णांचे पुनर्वसन आम्ही राज्यासह परराज्यांत यशस्वीपणे केल्याची माहिती मोहीम समन्वयक भाऊसाहेब माने यांनी दिली.

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**LOKMAT & PUDHARI Nanded**

**JULY 2025**

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

# वर्षभरानंतर चिमुकला माता-पित्याच्या कुशीत

## बिहारची वेडसर महिला दोन मुलींसह आली होती नांदेडात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** वर्षभरापूर्वी दोन चिमुकल्या मुलींना घेऊन बाहेर पडलेली महिला वेडसरपणामुळे थेट नांदेडात पोहचली होती. वेडसरपणात नांदेडात फिरताना तिच्या पाच वर्षीय आणि तीन महिन्यांची दोन्ही मुलींचीही ताटातूट झाली. अखेर नांदेड पोलिसांनी या महिलेला शासकीय रुग्णालयात दाखल केले. एनजीओच्या मदतीने येरवडा येथेही तिच्यावर उपचार झाले. अन् आश्चर्य उपचाराला प्रतिसाद देत वेडाच्या भ्रमातून ती बाहेर आली. नंतर एनजीओच्या मदतीने दोन्ही मुलीही परत मिळाल्या अन् पतीही शोधासाठी नांदेडात धडकला.

बिहारमधील बिरबल महतो हे पत्नी आणि दोन चिमुकल्या मुलीसह राहत होते. मागील वर्षी रक्षाबंधनाला त्यांची पत्नी माहेरी जाण्यासाठी घराबाहेर पडली, परंतु नंतर ती बेपत्ता झाली. तिच्यासोबत दोन चिमुकल्या मुलीही होत्या. बिरबल यांनी सर्वत्र तिचा शोध घेतला, परंतु त्या सापडल्या नाहीत. वेडसरपणात ही महिला मुलींना घेऊन नांदेडात पोहचली. मंतादेवी असे या महिलेचे नाव आहे. नांदेडात मिळेल त्या



ठिकाणी खायचे अन् रस्त्याच्या कडेला चिमुकल्या मुलींना घेऊन रात्र काढायची, परंतु दुर्दैवाने तिच्या दोन्ही मुलींचीही ताटातूट झाली. पुढे नांदेड पोलिसांनी उपचारासाठी तिला शासकीय रुग्णालयात दाखल केले. या ठिकाणाहून सप्टेंबर २०२४ मध्ये येरवडा येथे दाखल करण्यात आले. आठ महिन्यांनी मंतादेवी यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली. त्यानंतर रायगड येथील एनजीओने श्रद्धा पुनर्वसन केंद्रात टाकण्यात आले. या ठिकाणी काही दिवस राहिल्यानंतर त्यांची स्मृती परत आली. त्यांनी आपल्या दोन्ही मुली नांदेडात हरविल्याचे सांगितले. श्रद्धा फाउंडेशनने पोलिसांच्या मदतीने नांदेडात मुलींचा शोध घेतला. सुदैवाने या दोन्ही मुली शिशुगृहात आढळून आल्या. दोन्ही मुलींना पाहताच मंतादेवींनी हंबरडा फोडला. दुसरीकडे एनजीओने बिहारमधील त्यांच्या पतीशीही संपर्क केला होता.

### महिलेने फोडला हंबरडा

बिरबल महतो रोजंदारी करतात, परंतु जेव्हापासून पत्नी आणि मुली हरविल्या, तेव्हापासून ते त्यांच्या शोधात भटकत होते. नांदेडात शिशुगृहात ज्यावेळी त्यांनी मुलींना पाहिले, तेव्हा त्यांच्या पत्नीच्या आनंदाला पारावार उरला नाही. वर्षभरानंतर त्यांनी आपल्या दोन्ही मुलींना मिठी मारली. श्रद्धा फाउंडेशन आणि महाराष्ट्रातील लोकांना ते देवदूतच मानत आहेत, अशी प्रतिक्रिया श्रध्दा फाउंडेशनच्या डॉ. प्रथमेश हेमनानी यांनी दिली.

### नांदेड पोलिसांचे कौतुक

ताटातूट झालेल्या या कुटुंबाची पुन्हा भेट घडवून आणण्यात श्रद्धा फाउंडेशनने महत्त्वाची भूमिका पार पाडली. मंतोदेवीवर उपचार आणि बिरबल महतो यांचा शोध घेतला, तसेच नांदेड पोलिसांची भूमिकाही महत्त्वाची आहे. पोलिसांनी बेवारस सापडलेल्या मुलींच्या नोंदी घेऊन शिशुगृहात पाठविले. त्यामुळे आई आणि बाप मुलींना पुन्हा भेटू शकला.

पुढारी

# ‘श्रद्धा’ आणि ‘सबुरी’मुळे विखुरलेले बिहारी कुटुंब एकत्र !

## आधी पती आणि पत्नीची भेट; मग नांदेडमधून मुलींचाही मिळाला ताबा

महेश राजे

**नांदेड :** दुसऱ्या बाळंतपणानंतर मनःस्थिती बिघडलेल्या अवस्थेत चुकीच्या रेल्वेत बसून एक महिला वर्षभरापूर्वी थेट नांदेड रेल्वेस्थानकावर उतरली. ओटीत एक महिन्याचे बाळ आणि बोटाला पाच वर्षांची मुलगी... तिला मराठी कळेना... इथे कुणाला बिहारी समजेना... दोन दिवस रेल्वेस्थानकात उपाशी फिरल्यानंतर एका सहृद्याने पोलिसांना खबर दिली. त्यांनी माय-लेकींना ताब्यात घेतले. महिलेला येरवडा (पुणे) येथे पाठवले तर मुलींना येथेच शिशुगृहात दाखल केले. दोन महिन्यांपूर्वी या प्रकरणात 'श्रद्धा' नामक एका स्वयंसेवी संस्थेचा प्रवेश झाला. त्यांचे प्रयत्न आणि 'सबुरी'तून चार दिशांना विखुरलेले हे दुःखी कुटुंब बुधवारी (दि.९) आनंदाचे डोही डुबले.

या प्रकरणातील मंटादेवी (ममतादेवी) बिरबल महंतो (वय ४०) ही महिला चंपारण (बिहार) येथील मूळ रहिवासी. परिस्थिती दारिद्र्यरेषेखालील. पती बिरबल मजुरी करुन कुटुंबाचा गाडा हाकतो. जवळचे नातेवाईक म्हणजे एक काका परंतु त्यांचे कुटुंब विभक्त. मंटादेवीचे गतवर्षी साधारण जून महिन्यात दुसरे बाळंतपण झाले. गोंडस मुलगी झाली. तिचे नाव संतोषी ठेवले. पहिली मुलगी शीतल (वय ५, आता ६). बाळंतपणानंतर ममतादेवीची मनःस्थिती बिघडली. थोडक्यात तिच्या मेंदूवर परिणाम झाला. त्या स्थितीत माहेरी जाते असे पतीला सांगून ती घरून निघाली. एका रेल्वेत बसली. दुर्दैवाने ती रेल्वे चुकीची निघाली आणि ममतादेवी दोन चिमुकल्यांसह थेट नांदेडला येऊन पोहोचली.

पत्नी माहेरी पोहोचली नसल्याचे लक्षात येताच पती बिरबल याने पंचक्रोशी पिंजून काढली, परंतु काहीच पत्ता लागला नाही. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्याच्या शोधकार्याला मर्यादा आल्या. इकडे ममतादेवी एक महिन्याची चिमुकली व पाच वर्षांची शीतलसह नांदेड रेल्वे स्थानक परिसरात भटकत होती. दोन-तीन दिवस झाले. तिची भाषा कोणाला कळत नव्हती, तिला हिंदी सुद्धा येत नव्हते आणि इकडे कोणाला तिची भाषा कळेना. अखेर एका सुहृद्याला या माय-लेकींची दया आली आणि त्याने पोलिसांना दूरध्वनीवर खबर दिली. पोलिसांनी वेळेचे गांभीर्य ओळखत तातडी केली. माय-लेकींना ताब्यात घेत शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर प्रथमोपचार केले.

नंतर स्थानिक डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ममतादेवीला येरवडा (जि. पुणे) .../पान २ वर

पुढारी विशेष

### माणुसकी जिवंत आहे !

ममतादेवीची खबर पोलिसांना प्रथम एका अनामिकाने दिली. एरवी पाषाणहृदयी अशी पोलिसांची हेटाळणी केली जाते; पण वर्षभरापूर्वी नांदेड पोलिसांची माणुसकी ममतादेवीने अनुभवली. तिच्या मुलींचे ज्या शिशुगृहात पालन-पोषण झाले तिथेही माणुसकी नांदत होती. 'श्रद्धा' संस्थेने हे प्रकरण अत्यंत सबुरीने हाताळले. त्यांच्यातील माणुसकीमुळे गेल्या २३ वर्षांत वेडाच्या भरात हरवलेल्या ११ हजार जणांना कुटुंबाच्या स्वाधीन केले गेले आहे. या संस्थेने ममतादेवी व तिच्या परिवाराला आवश्यक त्या वस्तुंसह पाटण्याला रवाना करतानाही माणुसकीचे सर्व उपचार पाळले.

पान १ वरून

### ‘श्रद्धा’ आणि ‘सबुरी’मुळे...

येथील वेड्यांच्या इस्पितळात पाठवून देण्यात आले तर मुलींपैकी संतोषीला लोहा (जि. नांदेड) येथील सावित्रीबाई शिशुगृहात दाखल केले गेले. नाव माहिती नसल्याने शिशुगृहाने तिला राखी असे नाव दिले. आणि मोठी शीतल हिला लोहा येथीलच नरसाबाई महिला मंडळाच्या शिशुगृहात दाखल करण्यात आले. येथेच शीतलला बाराखडी, पाढे इंग्रजीतून शिकवण्यास सुरुवात झाली होती. दोघींचेही पोषण चांगले झाले. इकडे आई लेकरांविना तळमळत होती, तिच्या भावना संबंधितांना कळत होत्या, परंतु नाईलाज होता. येरवडा येथे तिच्यावर चांगल्या पद्धतीने उपचार झाले. रुग्णालय व्यवस्थापनाने नंतर कर्जत (जि. रायगड) येथील डॉ. भरत वटवानी या तरुण मानसोपचार तज्ज्ञाने स्थापन केलेल्या श्रद्धा पुनर्वसन केंद्राकडे हे प्रकरण सुपूर्द केले. या संस्थेने ममतादेवीची भाषा जाणणाऱ्या दुभाषाला शोधून त्या माध्यमातून त्यांचे मूळ गाव चंपारण शोधून काढले. ममतादेवीला घेऊन तिथे एक पथक पाठवून तिच्या पतीचा शोध घेतला. तेव्हा त्याने पत्नी व मुलींच्या शोधात मोठा परिसर पिंजून काढल्याचे समोर आले. पती-पत्नीची भेट हृदयस्पर्शी होती, असे या संस्थेचे सदस्य डॉ. प्रथमेश हेमवानी यांनी येथे सांगितले. याच पथकाने पती बिरबल व पत्नी ममतादेवीला घेऊन नांदेड गाठले. ममतादेवी-बिरबल यांच्यासह 'श्रद्धा'च्या पथकातील सदस्य डॉ. हेमवानी व श्रीमती नीलम शिरसाट हे नांदेड येथील बालकल्याण समितीचे अध्यक्ष ॲड.रजवंतसिंघ, सदस्या रेखा तोरणेकर, संगीता कांबळे, किशोर नावंदे यांच्यासह लोहा येथे पोहोचले. तिथे आई-वडिलांची दोन कन्यांसोबत भेट झाली. दोघांनाही अत्यानंद झाला. एकमेकांना कडकडून मिठ्या मारुन झाल्या. कुटुंबाचा चौकोन पूर्ण झाला आणि चौघेही आनंदात बुडून गेले. बुधवारी हा सर्व लवाजमा नांदेडला आला आणि गुरुवारी (दि. १०) गुरुपौर्णिमेच्या दिवशी चौघांनाही पाटणा येथे जाणाऱ्या रेल्वेत बसवूनच 'श्रद्धा'चे पथक कर्जतला परतले.

**MAHARASHTRA**
**News**

**MARATHI**

**PUNYA NAGARI**
**Raigad**

**JULY 2025**

Raigad

पुण्य नगरी

12/07/2025

# ताटातूट झालेल्या बिहारी कुटुंबाची प्रदीर्घ कालावधीनंतर भेट

## कर्जतच्या सामाजिक केंद्राचे मोलाचे कार्य

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील धाकटे वेणगाव येथे असणाऱ्या श्रद्धा फाऊंडेशनने ताटातूट झालेले पती, पत्नी आणि त्यांच्या दोन मुलींची सुमारे वर्षभरानंतर गुरुपौर्णिमेच्या दिवशी भेट घडवून त्यांना एकत्रित आणण्याचे अभूतपूर्व कार्य केले.



वर्षभरापूर्वी कर्जत तालुक्यातील मॅगसेसे अवॉर्डविजेते डॉ. भरत वाटवाणी यांच्या श्रद्धा पुनर्वसन केंद्रात आणण्यात आलेल्या आई आणि मुलगी यांची त्या महिलेची दुसरी मुलगी आणि पती यांच्यासोबत भेट घडवून आणण्याचे मोलाचे कार्य फाऊंडेशनच्या पथकाने केले. श्रद्धा पुनर्वसन केंद्रात एका महिलेवर उपचार केले जात असताना, त्या महिलेची भाषा समजून घेण्यासाठी दुभाषींची मदत घेण्यात आली आणि त्यानंतर एकमेकांपासून ताटातूट झालेले संपूर्ण कुटुंब एकत्र आले. गुरुपौर्णिमेच्या दिवशी श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या डॉक्टरांनी नांदेड येथे जाऊन या कुटुंबाची भेट घडवून आणली आणि त्यांना आपल्या मूळगावी बिहार राज्यात पाठवण्यात आले. बिहारमधील ममतादेवी ही महिला महाराष्ट्रातील नांदेड येथे आढळून आल्यानंतर त्या महिलेला रायगड जिल्ह्यातील कर्जतजवळ असलेल्या श्रद्धा पुनर्वसन केंद्रात पाठवण्यात आले होते. तेथे त्या महिलेने एका कन्येला जन्म दिला. त्यांची दुसरी मुलगी संतोषी ही नांदेड जिल्ह्यातील एका शिशुगृहात शिक्षण घेत असल्याची दुवा मिळताच या संस्थेने ममतादेवीची भाषा जाणणाऱ्या दुभाषीला शोधून त्या माध्यमातून त्यांचे मूळगाव शोधून काढले. ममतादेवीला घेऊन श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे एक पथक नांदेड येथे पाठवून तिच्या पतीचा शोध घेण्यात आला. तेव्हा त्याने पत्नी व मुलींच्या शोधात मोठा परिसर पिंजून काढल्याचे समोर आले आणि दुभाषी यांच्या माध्यमातून अनेक मुद्दे शोधल्यावर अखेर केंद्राच्या पथकाला ताटातुटीची उकल करण्यात यश आले.

**MAHARASHTRA News**

**MARATHI**

**ETV BHARAT**

**JULY 2025**

ETV भारत Maharashtra

# वेडसर महिलेचं आयुष्य पुन्हा फुललं... पोलीस आणि एनजीओनं दाखवली माणुसकी, पती-पत्नी अन् दोन चिमुकल्या मुलींची 11 महिन्यांनी झाली भेट

*वर्षभरापूर्वी एक महिला बिहारमधून हरवली आणि नांदेडमध्ये आली. वेडसर असलेल्या महिलेला नांदेड पोलीस आणि रायगडच्या एका एनजीओनं सुखरूप कुटुंबाच्या स्वाधीन केलं आहे.*




*नांदेड रेल्वे स्टेशन (Etv Bharat File Photo)*

By ETV Bharat Marathi Team

Published : July 11, 2025 at 5:57 PM IST

**नांदेड** : थोडीशी दया, सहानुभूती आणि वेळ दिला तर एखाद्याचं आयुष्य कसं बदलू शकतं, हे या घटनेनं सिद्ध करून दाखवलं आहे. नांदेड पोलीस आणि कर्जतच्या एका एनजीओनं समाजात माणुसकी अजूनही शिल्लक आहे, हे आपल्या कृतीतून दाखवून दिलं आहे. या दोघांनी संकटात सापडलेल्या एका अनोळखी वेडसर महिलेला मदतीचा हात दिला. तिचं आयुष्य पूर्ववत करण्यासाठी धडपड केली. ही घटना केवळ भावनिकच नाही, तर समाजाला सकारात्मक संदेश देणारी आहे. खरं तर, एक महिला दोन चिमुकल्या मुलींसह बिहारच्या चंपारण जिल्ह्यातून हरवली आणि थेट नांदेडमध्ये आली. नांदेडमध्ये आल्यावर तिच्या दोन्ही मुलीदेखील हरवल्या. यानंतर 11 महिन्यांचा काळ लोटला. चित्रपटात शोभेल अशा या घटनेत पुढे काय घडलं? वेडसर महिलेला तिच्या दोन मुली आणि पती कसा भेटला? हे आपण इथं सविस्तर जाणून घेणार आहोत.

**संपूर्ण घटना काय?** - सुमारे एक वर्षापूर्वीची गोष्ट आहे. एक महिला बिहारमधून माहेरी रक्षाबंधनासाठी जाते म्हणून दोन लहान मुलींना घेऊन अचानक बेपत्ता झाली आणि थेट नांदेड शहरात आली. मानसिक अस्वस्थतेमुळे ती कोणालाही काही सांगू शकत नव्हती. तिच्यासोबत 5 वर्षांची एक आणि 3 महिन्यांची एक अशा दोन मुली होत्या. पण काही दिवसांतच या दोन्ही मुलीदेखील तिच्याजवळून हरवल्या. वेडसर असलेली ही महिला अन्न आणि आधारावाचून नांदेडच्या रस्त्यांवर भटकत होती. पण एकेदिवशी नांदेड पोलिसांच्या सतर्कतेमुळं ही महिला त्यांच्या नजरेस पडली. तिची अवस्था पाहून पोलिसांनी तिला तत्काळ शासकीय रुग्णालयात दाखल केलं. तिथं तिच्यावर मानसिक आजाराचे उपचार सुरू झाले. एका सामाजिक संस्थेच्या (NGO) मदतीनं तिच्यावर व्यवस्थित उपचार करण्यात आले आणि हळूहळू ती वेडसरपणातून बाहेर यायला लागली. उपचारांनंतर महिलेला तिची ओळख सांगता आली. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आणि NGO नं तिच्या कुटुंबाचा शोध सुरू केला. या प्रयत्नांना यश आलं आणि तिच्या हरवलेल्या दोन्ही मुली (5 वर्षांची आणि 3 महिन्यांची) नांदेडच्या एका शिशुगृहात सापडल्या. यात सर्वाधिक आश्चर्याची गोष्ट म्हणजे एनजीओ आणि पोलिसांना महिलेच्या पतीलादेखील शोधून काढण्यात यश आलं. पती नांदेडमध्ये आला आणि कुटुंबाला घेऊन बिहारच्या दिशेनं रवाना झाला.

**नांदेड पोलीस आणि श्रद्धा फाऊंडेशनचं कौतुकास्पद कार्य** : या घटनेतील महिला बेपत्ता झाल्यानंतर पतीनं तिचा सर्वत्र शोध घेतला. पण ना पत्नी भेटली ना मुली. महिला नांदेडला पोहोचली होती. इथं पोहोचल्यावर तिच्याजवळून दोन्ही मुली हरवल्या. या कारणानं महिलेचा वेडसरपणा अधिक उग्र झाला. नांदेड पोलिसांनी तिला आधी शासकीय रुग्णालय आणि पुढे सप्टेंबर 2024 मध्ये पुण्यातील येरवडा इथं मानसोपचार रुग्णालयात दाखल केलं. 8 महिन्यांनी महिलेची तब्येत सुधारल्यावर तिला रायगड येथील एनजीओ श्रद्धा पुनर्वसन केंद्रात दाखल केलं. हळूहळू तिची स्मृती परत यायला लागली. तिच्या दोन मुली हरवल्याचं तिनं सांगितलं. श्रद्धा फाउंडेशननं तत्काळ नांदेडमध्ये शोध घेतला अन् नशिबानं या दोन्ही मुली नांदेडमधील एका शिशुगृहात सापडल्या. सोबतच पोलिसांनी महिलेच्या पतीलाही शोधून काढलं, तो देखील बिहारमधून नांदेडला आला. अशाप्रकारे नांदेड पोलीस आणि एनजीओच्या कौतुकास्पद कार्यामुळे 11 महिन्यांनंतर महिलेला तिच्या दोन्ही मुलींसह तिचा पती मिळाला.

**महाराष्ट्रातील लोक देवदूत** : या संपूर्ण घटनेबाबत रायगडच्या कर्जत येथील श्रद्धा फाउंडेशनचे डॉ. प्रथमेश हेमनाणी यांनी सांगितलं, "महिलेचा पती रोजंदारी करून आपली अन् कुटुंबाची गुजराण करायचा. पण जेव्हापासून त्याची पत्नी अन् मुली हरवल्या तेव्हापासून फक्त त्यांचा शोध हे एकमेव काम त्यानं केलं. नांदेडच्या शिशुगृहात जेव्हा त्यांनी मुलीला पहिलं तेव्हा पती-पत्नीच्या आनंदाला पारावर उरला नव्हता. सुमारे वर्षभरानं त्यांनी आपल्या मुलींना मिठी मारली होती. श्रद्धा फाउंडेशन आणि महाराष्ट्रातील लोकांना ते माणूस नव्हे तर देवदूत समजत आहेत.

**महिला दोन मुली आणि पतीसह बिहारला रवाना** : खरं तर, या कुटुंबाला एकत्र आणण्यात श्रद्धा फाउंडेशनचं महत्वाचं योगदान आहे. त्यांनीच या महिलेच्या पतीचा शोध लावला अन् तिथून पुढे मुलींचाही शोध लावला. त्यामुळे ते कौतुकास पात्र आहेतच. पण नांदेड पोलीसही तितक्याच कौतुकास पात्र आहेत. कारण बेवारस सापडलेल्या महिलेला त्यांनी योग्य ठिकाणी पाठवलं. त्यामुळेच एक आई आपल्या दोन्ही मुलींना पुन्हा भेटू शकली. त्यामुळे या सगळ्यांचं लोक कौतुक करत आहेत. नुकतेच हे कुटुंब नांदेडहून रेल्वेनं बिहारच्या दिशेनं रवाना झालं आहे.